म. ग्रं. सं. ठाणे

विषय

सन

लेखक के. रा. केळकर

पुस्तकाचें नांव

ालय क्रमांक

ठाणे.

८९

कोट

सं. क्र. १०७

( जगद्धितेच्छूंत प्रसिद्ध झालेली कादंबरी )

# सिंधूबाई

किंवा

## आजकालचीं सद्गुणी माणसें.

हें पुस्तक

रा. रा. केशव रामचंद्र केळकर ऊर्फ

शांतिब्रह्म.

यांनीं

तयार केलें तें,

रावजी श्रीधर गोंधळेकर

यांनीं आपले

'जगद्धितेच्छु' छापखान्यांत छापिलें.

पुणें

सन १८९० ई०

आवृत्ति १ ली.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क ग्रंथकर्त्यानें आपणाकडे ठेविले आहेत.

किंमत १४ आणे.

१०१

# प्रस्तावना.

ही कादंबरी जगद्वितेच्छु वर्तमानपत्रांत थोडथोडी प्रसिद्ध होत आली असून, तिचा पूर्वार्ध पूर्ण होऊन उत्तरार्धाला सुरुवात झाली आहे. ही कादंबरी पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यास मराठी ग्रंथसमूहांत एक चांगल्या प्रकारचें वाचनीय व मनोरंजक पुस्तक होईल अशी इच्छा बहुत मित्रांनीं पत्रद्वारें व प्रत्यक्ष कळविल्यावरून हल्लीं हा पूर्वार्ध वाचकांस नजर करीत आहों. या कादंबरींत आपल्याला कोणत्या प्रकारचीं सद्गुणी माणसें आजकाल पाहिजेत, व कशा प्रकारचीं माणसें देशहितास व देशाच्या कल्याणास उपयोगीं पडतील याचें विवेचन उत्तम आलेलें असून त्यांतील प्रत्येक स्थलें फारच मनोरम अशीं उतरलीं आहेत. कादंबरीची भाषा अगदीं साधी, विवेचन अल्पविस्तारबह्वर्थ, वर्णनशैली अगदीं हुबेहुब आणि रचनाहेतु व्यक्त होण्यास बिलकूल प्रयास न पडण्यासारखी, व कथानकाची मांडणी हीं प्रशंसनीय आहेत; असे अभिप्राय अनेक मित्रांकडून मिळाले आहेत.

ह्या सर्व अनुकूल गोष्टीवरून आम्हीं या पुस्तकाच्या पूर्वार्धाच्या पहिल्या आवृत्तीचा हक्क त्याचे कर्ते सिद्ध शांतिब्रह्म उर्फ केशव रामचंद्र केळकर यांचेपासून घेतला आहे; तेव्हां त्यांच्या हातून लिहिलेलें, व आजपर्यंत वाचकांपुढें भागशः आलेलें असें दरील पुस्तक कसें काय उतरलें असेल याचा नि-

णीय वाचकांस सहज करितां येण्यासारखा आहे. ह्यापेक्षां या पुस्तकाबद्दल जास्त शिफारस करण्याचें कारण नाहीं.

हें पुस्तक वाचकांस आवडून त्यांस योग्य आश्रय मिळाल्यास याचा उत्तरार्ध ज्यांत तात्या रामोशाचें चरित्र म्हणून लिहिलें आहे तोहि प्रसिद्ध करण्याची आम्हाला उमेद येईल.

# सिंधूबाई.

## किंवा

## आजकालचीं सद्गुणी माणसें.

सुमारें ५००० वर्षांपूर्वी सिंध देश मुळीं नसून त्या जागेवर समुद्र होता. याच्या खुणा आज स्पष्ट दिसत आहेत. सिंध देशांत जो दगड आढळतो, तो सर्व चुनखडा आहे, यावरून तो समुद्रांतील कीटकांपासून झालेला, शिपा, शंख, कवड्या वगैरेंपैकींच आहे असें शोधक लोक ह्मणतात. ह्याचप्रमाणें आज मितीस मातीमध्यें बारीक शंख, कवड्या वगैरे जलचर प्राण्यांचीं घरें पुष्कळ सांपडतात.

सिंधू नद हें अटक नदीस नांव पडण्याचेंही कारण वरील गोष्टीस बळकटी आणतें. अटक जेव्हां समुद्र हटलेल्या मैदानांतून वाहूं लागली, तेव्हां तिला सिंधू न ह्मणावें तर काय ? ही मागली स्थिति झाली. पुढें हळूहळू ह्या मार्गीं वस्ती होऊं लागली तेव्हां मीर लोकांचें प्राबल्य झालें. पुढें कालांतरानें इंग्रजी अंमलामुळें मीर लोकांचा कांहीं जोर न चालून सिंधांतील अंमल इंग्रज सरकारचे हातीं आला. इंग्रज सरकारानें हा प्रांत मुंबई इलाख्यांत मोडून जमिनीची मोजणी, शेतीची पहाणी वगैरे कामें करण्यास मुंबईहून एंजिनीअर, ओव्हरसीअर, मोजणीदार वगैरे कामगार आणले.

णीय वाचकांस सहज करितां येण्यासारखा आहे. ह्यापेक्षां या पुस्तकाबद्दल जास्त शिफारस करण्याचें कारण नाहीं.

हें पुस्तक वाचकांस आवडून त्यांस योग्य आश्रय मिळाल्यास याचा उत्तरार्ध ज्यांत तात्या रामोशाचें चरित्र म्हणून लिहिलें आहे तोहि प्रसिद्ध करण्याची आम्हाला उमेद येईल.

ही दक्षिणी मंडळी प्रथम कराचीस येऊन तेथून कांहीं सक्करेस, कांहीं सिंध हैद्राबादेस व कांहीं शिकारपुरास रवाना झाली. तरी १०० जणांचें काम कराचीस असल्यामुळें तितके लोक तेथें राहिले. या मंडळीमध्यें २५।३० गृहस्थांच्या नांवांची एक सांखळी होती व ही सगळी सांखळी रामबागगाडी-खान्यांत रहात असे. सांखळीची कल्पना एकाएकीं वाचकांच्या मनांत येणार नाहीं. ह्मणून अर्धीमुर्धी सांखळी मी येथें दाखल करतों—१ केशव रामचंद्र २ रामचंद्र विष्णु. ३ विष्णु गणपत. ४ गणपत नरहर. ५ नरहर विनायक. ६ विनायक बापूजी. ७ बापूजी बळवंत, ८ बळवंत कृष्णाजी ९ कृष्णाजी विठ्ठल, १० विठ्ठल श्रीपत ११ श्रीपत विसोबा १२ विसोबा तान्हाजी इ०.

या सांखळीमध्यें विनायक बापूजी ह्मणून एक ब्राह्मण एंजिनीअर होता. या गृहस्थानें सतत ४ वर्षें सिंधांत या जाग्यावर काम केल्यावर वरील अधिकाऱ्याची इतराजी झाल्यामुळें आपल्या नोकरीचा त्यानें राजीनामा देतेवेळीं वरील अंमलदारास त्याची दया येऊन त्यानें त्यास तसें न करण्यास सांगितलें, पण त्या गृहस्थानें जें एकदां मनांत आणलें तें केलेंच. या वेळीं कराची व सक्कर हीं दोन शहरें भरभराटीस येत असल्यामुळें दोन्ही ठिकाणीं सरकारी व सावकारी इमारती बांधण्याचें काम जारीनें सुरू होतें. व मजुऱ्याचीं कामें करणारांची फारच अवश्यकता होती. एंजिनीअरचें काम शिकलेले ठेकेदार त्यावेळीं फार

कमी असल्यामुळें मोठमोठ्या इमारतींचें काम धनाढ्य व्यापाऱ्यांसही घेण्याचें जोखीम पतकरतां येईना. तेव्हां विनायकरावाचें सहजच पिकलें. त्यांनीं कित्येक व्यापारी जमवून एक मंडळी काढली, व सर्व कामें आपल्या देखरेखीखालीं ते खुशाल पतकरूं लागले. त्यांत व्यापाऱ्यांसही फायदा झाला व विनायकरावही लाखोपती लौकरच बनले. या वेळीं त्यांचें कुटुंब निवर्तल्यामुळें त्यांस फार दुःख झालें. तरी पैसा असल्यावर लग्न होण्यास कांहीं हरकत नाहीं व तशांत त्यांचें वयही ३० वर्षांहून अधिक नव्हतें ह्मणून हे तावडतोब पुण्यास जाऊन मोठी व सुरेख मुलगी पाहून तिच्याशीं ह्यांनीं लग्न केलें. वर्षभर कुटुंबास माहेरीं ठेवून हे पुढें कराचीस सहकुटुंब राहूं लागले. यांचें कुटुंब सगुणाबाई थोड्या बहुत शिकलेल्या असून पुढेंही पतीच्या सहवासानें त्यांचा बराच अभ्यास झाला.

त्यांस ऋतु प्राप्त होऊन ४ महिने झाले नाहींत तोंच त्या गरोदर झाल्या. विनायकरावांस पहिल्या कुटुंबापासून कांहीं अपत्य नव्हतें ह्मणून मुलगा व्हावा अशी दोघांसही इच्छा होती, पण सगुणाबाई ऐन हिंवाळ्यांत कन्या-रत्न प्रसवल्या. तिचें नांव त्यांनीं सिंधू असें ठेविलें. विनायकराव सुरेख असून सगुणाबाईही लावण्यवती असल्यामुळें झालेली कन्या फार सुरेख व्हावयाचीच. तशी सिंधू मातापितरांपेक्षां सुरेख झाली. सिंध देशांत सिंधुनदी वाहते ह्मणून यांनीं गंगा, भागीरथी, कृष्णा, यमुना, वगैरे

नद्यांचें नांव आपल्या कन्येस न ठेवतां तिचें नांव सिंधूबाई ठेविलें. सिंधूबाईच्या जन्माचे सुमारास इंग्रज सरकारचें पाऊल बलुचिस्थानांत शिरकलें असल्यामुळें सिबी ह्मणून तिकडे एक शहर वसूं लागलें होतें त्यांत कित्येक कामांचे ठेके विनायकरावास मिळून त्यांनीं सिंधांत जें द्रव्य संपादन केलें तें ९ लाखपर्यंत वाढलें होतें.

अर्थात् कराचीस हे गृहस्थ श्रीमंतांत मोडले जाऊं लागले. अशा समयीं दुष्ट मृत्यूनें त्यांजवर घाला घातला. विनायकराव ज्या दिवशीं निवर्तले त्याच दिवशीं सिंधूबाईस ७ वा महिना लागला.

विनायकरावाच्या दुखण्यामध्यें त्यांचे बंधू पुण्याहून समाचारास ह्मणून आले होते ते तेथेंच राहिले व लौकरच त्यांनीं सर्व कामाची माहिती करून घेतली. या गृहस्थाचें लग्न झालें होतें. पण ऐन तारुण्यांत यांचें कुटुंब निवर्तलें होतें व पुन्हां लग्न करण्याचा यांस योग आला नाहीं.

योग कां आला नाहीं याचें कारण असें होतें कीं, त्यांचें कुटुंब निवर्तल्याबरोबर यांनीं वर्तमानपत्रांत पुढील जाहिरात दिली.

मी खालीं सही करणार या लेखद्वारें प्रसिद्ध करतों ऐसा जे. माझें कुटुंब निवर्तल्यामुळें मीं पुनर्विवाह करण्याचा निश्चय केला आहे. ज्या कोणास मला साह्य करणें असेल त्यांनीं विधवा मुलींचा शोध करून मला कळवावें. माझें वय ३० वर्षांचें असून मजपाशीं

जिनगी, वरदार सुद्धां सुमारें ३ हजार रुपयांची आहे. घराचें भाडें व व्याज वगैरे मिळून वीस रुपये दरमहाचें माझें उत्पन्न आहे. मला विधवा-विवाह करण्याची जरी हौस आहे तरी जी विधवा मी वरणार ती पुनर्विवाहोत्तेजक मंडळीचे आश्रयास नसून सासरीं किंवा माहेरीं असलेली असावी. ऋतु प्राप्त होण्यापूर्वी पतिवियोग झालेली मात्र सकेशा मी वरीन.

| | |
|---|---|
| पुणें, तारीख १९ मे १८७२ | सही आणि पत्ता **गणपत बापूजी गवत्यामारुतीनजिक.** |

ही जाहिरात प्रसिद्ध झाल्याबरोबर यांस बऱ्याच मंडळींचीं पत्रें आलीं. त्या पत्रांत यांच्या विचारांबद्दल आभार दर्शित होऊन मुलींचीही माहिती असे.

एके दिवशीं एक पत्र मुंबईहून आलें त्यांत असलेला मजकूर पाहून या गृहस्थास अत्यानंद झाला व हे लागलेच मुंबईस येण्यास निघाले.

## मुंबईच्या पत्राची नक्कल.

राजमान्य राजश्री गणपत बापूजी यांस शिरसाष्टांग नमस्कार विनंति विशेष.—इंदुप्रकाशाच्या गतांकीं आपल्या सहीची जाहिरात पाहून अत्यंत आनंद झाला आहे. तो पत्रीं सादर करतां येत नाहीं. आपल्या देशाचें हित करण्यासाठीं जी मंडळी निपजत आहे त्या मंडळीचा व जुन्या मंडळीचा प्रत्येक बाबतींत मतभेद असायाचाच असा जणू आपल्या देशा-

स्त्र शास्त्रच आहे कीं काय कोण जाणें. जी गोष्ट स-शास्त्र असून व्यवहारास अत्युत्तम असते, तीसुद्धां न-व्या सुधारकांचे हातीं जातांच ती अशास्त्र व व्यवहा-रास अत्यंत नीच अशी जुने लोक समजूं लागतात, व त्याप्रमाणें त्या गोष्टी विरुद्ध आपापलीं मतें देऊन घ-रावर त्या गोष्टीचा उलट उहापोह होतो. पुनर्विवाह या कालास अत्यंत इष्ट असून तो न होण्याबद्दल जु-न्या विद्वानांचा ग्रह झालेला आहे, व यामुळें त्याचें माहात्म्य नष्ट झालें तरी आपल्या सारखे उदार लोक जर पुढें येतील तर शेंपन्नास वर्षांत ती चाल जारीनें सुरू होईल अशी उमेद आहे.

असो. येथें एक विधवा असून तिचा पति तिच्या लग्नानंतर २९ वे दिवशीं वारला असून तिचें वय ह-ल्लीं अवघें १३।१४ वर्षांचें आहे. ही लग्न झाल्यापासून आजपावेतों माहेरींच आहे. नाकाडोळ्यांनीं दहा बा-यकांसारखी असून या मुलीचा मराठी अभ्यास ४ थ्या इयत्तेपर्यंत झाला आहे. स्वयंपाकपाणी, झाडसा-रव, शिवणेंविणणें, वगैरे गृहकृत्यांत हिची टापटीप उत्तम गृहिणीसारखी आहे असें माझ्या अनुभवास आलें आहे. आपल्या जाहिरातीप्रमाणें बहुतेक गुण आपल्यास आढळतील अशी उमेद आहे. जर आप-ल्यास सवड असेल तर एक वेळ मुंबईस येऊन प्रत्य-क्ष वधू पाहून जाणें. अगर आपला कोणी विश्वासू मित्र मुंबईस असल्यास त्याचे मार्फत माहिती मिळ-वावी. फोटो ( तसबीर ) पहाण्याची इच्छा असल्यास पत्रोत्तरीं लिहावें ह्मणजे पुढील पत्रासोबत फोटो पाठ-

विण्यांत येईल. सुज्ञास बहुत काय लिहिणें लोभाची वृद्धि असावी हे विज्ञाप्ति.

मुंबई. { भिकाजी विसोबा, केशवजी नायकाचे चाळींत दुसरे मजल्यावर. कांदेवाडी.

हें पत्र वाचून आमचे गणपतराव लागलेच उठून आपल्या मेजावर जाऊन एक कार्ड घेऊन त्यावर मी उद्यां रविवारीं मुंबईस आपल्यास भेटण्याकरितां येतों असें लिहून तो कार्ड तावडतोब भिकाजी विसोबा यांस पाठवून दिला. या वेळीं कार्डांची पद्धत नवी निघाली होती. पोष्टांत याच दिवशीं कार्ड पाठविण्याचा प्रथम हुकूम झाला. त्या दिवशीं पुण्याच्या पोस्ट आफिसांतून कायते ६ कार्ड बाहेर रवाना झाले व एक कार्ड बाहेरून पुण्यास आला.

दुसऱ्या दिवशीं गणपतराव मुंबईस निघाले तों त्यांचा एक स्नेही तेथें आला, त्याला त्यांनीं तें मुंबईचें पत्र वाचून दाखविलें व आपला उद्देश कळविला. त्यावर त्या दोघांचा थोडा बहुत संवाद झाला.

**मित्र**—नवलाची नवलपरी, आणि कोंबड्याच्या गळ्यांत सरी. तशीच गणपतराव तुझी दशा आहे. बिचाऱ्या सरस्वतीबाई (गणपतरावाचें मृत कुटुंब) मेल्या आणि तुह्मास हा वैताग आला, तरी तुह्मी घाबरूं नका. बायका बायका ह्मणजे काय बिशाद. तुमचें वय कांहीं गेलें नाहींना? पैशा आडक्याची

तुह्मास अडचण नाहीं.—मग नरकांत घोंडा टाकून अंगावर उसळून घेण्यांत काय अर्थ?

गणपतराव—माझें वय गेलें असें मीही समजत नाहीं ह्मणून हा विचार योजला आहे. जर माझी चाळीशी उलटली असती तर लग्नाचा विचार मीं मुळींच केला नसता.

मित्र—माझ्या पहाण्यांत दोन तीन मुली आहेत, व लग्न यंदांच मार्गशीर्ष महिन्यांत करण्याचा आपला विचार असल्यास मी सर्व योग जमवून आणतों.

ग०—आपण कांहीं खटपट करूं नये; मीं विधवेबरोबरच लग्न करण्याचा निश्चय केला आहे. जर ईश्वरेच्छा असेल तर ही मुंबईकरीणच माझ्या पसंत पडून मी तिजशीं लग्न लावीन.

मित्र—गणपतराव तूं वेडा तर नाहींस? अरे पुनर्विवाहांत कांहीं मजा का आहे? आह्मीं सगळे तमाशे पाहिले आहेत; मी मुंबईस असतांना गंगाधर बाळकृष्ण कीं बाळकृष्ण गंगाधर गद्रे अशा नांवाच्या गृहस्थाचा पुनर्विवाह झालेला आहे, त्या वेळीं मीं सगळी गम्मत पाहिली. तो गृहस्थ हल्लीं गिरगांवांत प्रार्थना मंदिराजवळ विष्णु घनशामाचे चाळींत रहातो. नळावर दोन दोन तास उभा राहिला तरी त्यास पाणी भरण्यास जागा मिळत नाहीं. कोणास त्याचा स्पर्श झाल्यास लोक शिव्यांचा वर्षाव करितात, पण तो बिचारा सत्पुरुष आहे; कोणाला प्रत्युत्तर न देतां होत असलेली सर्व अप्रतिष्ठा मुकाट्यानें सहन करतो. त्या लोकांचा तो नुसता तिरस्कारही करीत नाहीं. ते

शिव्या देत असतां याचा चेहरा जसाचा तसा प्रफुल्लित असून विशेष प्रसंगीं त्यास हंसूंही येतें. माझा एक मित्र मुंबईस आहे तो या गृहस्थाचा इतका तिरस्कार करतो कीं, याचें नांव कोणी काढलें तरी त्यास तें खपत नाहीं. पण मी एक वेळ गद्र्यांकडे कांहीं कामासंबंधानें गेलों होतों; तेथें सहज मी आपल्या मित्राचें नांव सांगून ह्मणालों फलाणे गृहस्थ माझे मित्र आहेत त्यांजकडे मी रहातों; जर आपल्यास फुरसत असेल तर एकाद वेळीं तेथें आल्यास गांठ पडेल. त्यावर तो बिचारा अति नम्रतेनें ह्मणालाः—"माझ्या घरीं आपण आल्यास मी आपला ऋणी होईन. कारण माझें तेथें येणें चांगलें नाहीं. मी आलों असतों, जसे ते गृहस्थ आपले स्नेही आहेत तसे ते माझेही पण आहेत. परंतु या पुनर्विवाहापासून ते माझा तिरस्कार करतात. मी तेथें आल्यावर मजवर शिव्यांचा भडिमार होईल याकरितां मी भितों असें नाहीं, पण त्यांच्या मनास कारणाशिवाय संतप्त करण्याचें धाडस मी करूं इच्छित नाहीं." हीं त्याचीं भाषणें ऐकून मला त्याच्या वृत्तीविषयीं फार समाधान वाटलें, आणि त्याची केविलवाणी स्थिति पाहून दुःख झालें. यासाठीं तुला सांगतों कीं, जशी तूं एकदां जाहिरात पुनर्विवाह करतों ह्मणून दिली आहेस तशी पुनः करीत नाहीं ह्मणून एक दे ह्मणजे झालें.

**ग०**—मी नाहीं करीत कां ह्मणूं? तुझी इच्छा ती कांहीं माझी इच्छा नव्हे.

**मित्र**—एकूण तुला ब्राह्मणांतून उठावयाचें आहे!

पण अगोदर विनायकरावाचें मत घेतल्याशिवाय तूं या गोष्टीस प्रवृत्त कां झालास? गणपतराव तुला तुझा भाऊ या गोष्टीस अनुकूल मत देईल का?

ग०—तो देवो अगर न देवो माझें कर्तव्य कर्म मला केलें पाहिजे. जसा स्त्रीवियोग-दुःखानें पोळलेला असा मी वर आहें, तशी पतिविरहानें पोळलेली वधूच मला योग्य आहे. याप्रमाणें या उभयतांचीं भाषणें झाल्यावर गणपतराव गाडी करून स्टेशनावर गेले व आगगाडींत बसून मुंबईस पोंचले; ते इकडे तिकडे न जातां भिकाजी विसोबा ह्मणून जे गृहस्थ कांदेवाडींत केशवजी नायकांचे चाळींत होते व ज्यांनीं गणपतरावांस पत्र लिहिलें होतें त्यांचे घरीं उतरले. तेथें त्यांनीं यांचा चांगला सत्कार करून आपली स्थिति सांगितली व मुलीस हांक मारली. मुलगी लाजत लाजत दारांत उभी राहिली. तीस भिकाजीपंतांनीं आपल्या संनिध बोलावली, व ४ थ्या पुस्तकांतील एक पृष्ठ काढून तें वाचावयास सांगितलें तें तिनें घडघड वाचलें. मग भिकाजीपंत गणपतरावांस ह्मणाले आपल्यास जे जे प्रश्न करावयाचे असतील ते आपण करावे.

ग०—( मुलीकडे पाहून ) वाचन तर आपण सुरेख वाचतां. आतां पुस्तक मिटून वाचलेल्याचा भावार्थ सांगा पाहूं.

वधू भावार्थ सांगते.

ग०—शाबास, पुरे.

भि०—आतां मी एक गोष्ट फोडून सांगतों, पण

जर मुलगी आपल्या पसंत पडत असेल तर. (वधू पळून जाते.)

ग०—" आंधळा मागतो एक डोळा आणि देवानें दिले दोन " तसें मला झालें आहे. मुलगी आपण नाकाडोळ्यांनीं दहांसारखी लिहिलें होतें, पण ती फारच सुंदर आहे, वाचनामध्यें हुशार; तिनें काढलेली आपण जी पुस्ती मला दाखविली ती पाहून अक्षराविषयीं तर माझें पूर्ण समाधान आहे. तात्पर्य हें आहे कीं, ईश्वर करो आणि हें मंगल कार्य लवकर घडून येवो.

भि०—आतां माझी गुप्त गोष्ट मी आपल्यास फोड करून सांगतों. ही मुलगी माझी आहे.

हिचें लग्न झाल्यापासून २९ वे दिवशीं हीस वैधव्य आलें त्या वेळीं तिला ९ वें वर्ष लागलें होतें. तेव्हांपासून हीं पांच वर्षें मला जणूं हृद्रोग लागला आहे. हल्लीं पुनर्विवाहाची खटपट कांहीं गृहस्थांनीं चालविली आहे, पण यावें तसें त्यांच्या उद्योगास यश येत नाहीं. ही एक मोठी दुःखाची गोष्ट आहे. मी या मुलीचा पुनर्विवाह केला तर माझें पुष्कळ नुकसान होणार आहे. नाशकास थोडी बहुत वृत्ति आहे तिजवर पाणी पडणार, मुलाचें लग्न होणें आहे तें कठिण होणार. पण मी या पोरीकरितां जिवाचा धडा करून हें कृत्य करणार मग पुढें कांहीं होवो. तर आपण हीस पतकराल का?

ग०—मजकडून तयारी आहे, पण गोत्र पाहिलें पाहिजे. दोघांनीं आपापलीं गोत्रें सांगितलीं तेव्हां

त्यांस कळलें कीं, ही सर्व खटपट व्यर्थ आहे, गोत्राशीं पटत नाहीं. तरी ते विष्णु शास्त्र्यांकडे कांहीं तोड निघेल ह्मणून गेले, पण तेथेंही उभयपक्षीं निराशा झाली. तेव्हां बिचारा गणपतराव पुण्यास आला. पुण्यास आल्यावर त्याच्या मित्रांनीं प्रथम तर त्याची बरीच थट्टा केली, पण पुढें ते याच्या लग्नाची जुळवाजुळव करूं लागले.

पांच सहा दिवस झाल्यावर गणपतरावांचा एक मित्र त्यांजकडे एका ब्राह्मणास घेऊन आला त्याचें व यांचें गोत्र जमत होतें. त्या ब्राह्मणानें आपली मुलगी गहाण ठेविली होती. इंग्रजी राज्यांत मनुष्य विक्रय ज्या अर्थी नाहीं त्या अर्थी मनुष्य गहाण ठेवणें कायद्याविरुद्ध होतें खरें, पण ब्राह्मण जातींत ही नीच चाल बरीच बलवत्तर झाली आहे. व सावकार मुलीवर कर्ज देतात त्यांत असें लिहून घेतात कीं, जर मुलगी लग्नापूर्वी कदाचित् मरेल तर दुसरी मुलगी असल्यास ती गहाण समजावी, व तिही मरेल तर तिसरी. असे घाणेरडे लेख खुशाल लोक लिहून देत व लिहून घेत आहेत.

ब्राह्मणानें गणपतरावांस आपल्या घरीं येण्याची विनंति केली ती गणपतरावांनीं अमान्य केली.

तिसरे प्रहरीं तो ब्राह्मण आपल्या कन्येस गणपतरावांकडे दाखविण्यास घेऊन आला. मुलगी पाहून गणपतरावांचें मन लालचावलें, व पुनर्विवाहाचे भानगडींत न पडतां ही मुलगी करावीसें त्यांस वाटूं लागलें, तरी त्यांनीं त्याच बैठकीस लग्न न जुळवितां

आह्मी विचार करूं ह्मणून त्या ब्राह्मणास निरोप दिला.

ब्राह्मणानें परत जातां जातां गणपतरावांस सांगितलें कीं, मीं मुलीचे १,००० रुपये घेण्याचें मनांत आणलें होतें, पण आपण पतकराल तर ५०० त मी राजी आहें. आपला विचार मला लौकर कळवावा, कारण दुसरे लोक मुलीस पाहण्यास येतात त्यांस उत्तर दिलें पाहिजे, असें ह्मणून तो कन्येसह बाहेर पडला. हें ब्राह्मणाचें भाषण ऐकून गणपतरावांच्या पायांची आग मस्तकास जाऊन पोंचली. त्यांजपाशीं त्या वेळीं दुसरें कोणी नव्हतें तरी ते आपल्या मनाशींच पुढील विचार बोलूं लागले.

गणपतराव आपल्या मनाशीं जरी बोलत होते तरी त्यांच्या भाषणाचे उच्चार त्यांच्या साऱ्या घरभर वक्तृत्वोत्तेजक सभा स्थापन झाली असल्यामुळें ऐकूं जात होते. याचें कारण असें होतें कीं, पुण्यास वक्तृत्वाची लोकांस गोडी लागत चालली होती व गणपतरावांस या सभेचें एक वेळ एका विषयावर बक्षीसही मिळालें होतें, करितां ते प्रसंगविशेषीं मनांत आलेले विचार मननाबरोबर मोठ्यानें उच्चारीत असत, तेणेंकरून वक्तृत्वाचा अभ्यास त्यांचा वाढत असे.

ते ह्मणाले. इतर देशी लोकांपेक्षां आपल्या भरत खंडांतील लोक संस्कृत रीतिभातीचे आहेत. त्यांतही महाराष्ट्राची योग्यता भरत खंडांतील इतर प्रांतांपेक्षां अधिक आहे. इतर देशीं सर्व जाती ब्राह्मण सुद्धां मांसाहारी आहेत; पण महाराष्ट्रांत ब्राह्मण, लिंगाईत

गुरव, जैन वगैरे पुष्कळ जाती मांसभक्षक नाहींत.
महाराष्ट्र व तैलंगण या देशांशिवाय इतर जागीं वेदाध्ययन नाहीं. पोषागाच्या रीति महाराष्ट्राशिवाय बहुतेक ठिकाणीं मुसलमानी धर्तीवर आहेत. तैलंगण देशाच्या रीतिभाती आपल्या महाराष्ट्राशीं बहुतेक जुळतात, पण बंगाल घ्या, उत्तरहिंदुस्थान घ्या, नेपाळ, भूतान, काश्मीर, सिंध, वगैरे उत्तरेकडे अति भ्रष्टाकार आढळतो. उत्तरहिंदुस्थानांत व वर सांगितलेल्या प्रांतीं केश ठेवण्याचा सांप्रदाय जर आपले महाराष्ट्रीय लोक पहातील तर त्यांस हांसें येईल. कोणी दाढी राखतात, कोणी डोकीवर सगळे केश राखतात, कोणी युरोपियन लोकांसारखे डोक्याचे केश थोडे थोडे कोरतात तर कोणी टाळूवरची दोन तीन बोटें हजामत करतात, पंजाबांत तर कोणी अर्ध्या डोक्याची हजामत करतो व कोणी सगळें डोकें भादरून किनाऱ्यानें शिशगोळ्यां सारखे थोडे केश लोंबत ठेवतो. तो प्रकार महाराष्ट्रांत नसून सशास्त्र गाईच्या खुरा एवढी शेंडी ठेवतात; कोणी घेरे वगैरे ठेवून आपल्या सीमेचें जरी उल्लंघन करतातसें आपण पहातों, तरी इतर ठिकाणच्या लोकांस पाहून आपल्या लोकांचा प्रमाद आहे असें मुळींच वाटत नाहीं. बंगाल्यांतील बाबू लोक शेंडीची मुळींच पर्वा करीत नाहींसे झाले आहेत. हिंदुरिवाजाप्रमाणें स्त्रियांस पडदा असण्याची जरूर नाहीं; पण महाराष्ट्राशिवाय इतर ठिकाणीं ही यावनी चाल अगदीं बलवत्तर झाली आहे. स्त्रियांस बुरखा नसला तर तिच्या नजरेंत ला-

ज रहाते त्याच बुरख्यानें स्त्रिया निर्लज्ज होतात.

महाराष्ट्रांतील ब्राह्मण जातींत अक्षरशत्रु पुरुष मिळणें दुरापास्त आहे. तीन आचमनें तरी केल्याशिवाय अन्न सेवन करणारा महाराष्ट्रीय ब्राह्मण मिळणार नाहीं. इतर प्रांतीं अक्षर येत असणारे ब्राह्मणांची संख्या १/४ निघणें कठिण. उत्तर हिंदुस्थानांत जे भिक्षुकी करणारे पंडित असतात, त्यांची विद्वत्ता काय ती रामरक्षा, सत्यनारायणाची कथा, दुर्गापाठ, आणि गायत्रीमंत्र येथपर्यंत असते. इतकें ज्यानें पठण केलें असेल. त्याला तिकडे संसार चालविण्यास अडचण पडत नाहीं.

संस्कृत अभ्यास केलेले हिंदुस्थानी ब्राह्मण क्वचित् आढळतात व ते मोठमोठ्या शहरीं भागवताचा अर्थ सांगतात. ह्या वेळेस त्यांस हजारीं प्राप्ति होते. ते खेड्या पाड्यांत कथा सांगण्याच्या भरीस पडत नाहींत. हे हिंदुस्थानी पंडित तरी दक्षिणी ब्राह्मणांचेच शिष्य असतात. दक्षिणी विद्वान जे फार वर्षांपासून काशीस राहिले आहेत ते त्यांस हें विद्यादान करतात. महाराष्ट्रांत खेड्या पाड्यांत देखील दशग्रंथी, पंचग्रंथी, जटापाठी, घनपाठी विद्वान आढळतात. लहान लहान देवळांत सुद्धां चातुर्मास्यांत मूठभर तांदुळांवर आपल्यास हरिकथा ऐकण्यास मिळते. आपल्या देशीं पुराणांतील गोष्टी ज्या बायकांस अवगत असतात त्या इतर प्रांतांतील साधारण पंडितांस माहित नसतात. वटसावित्री, हरतालिका, मंगळागौरी, गणेशचतुर्थीचा गणपति, वगैरेच्या ज्या मंगळ पूजा

दक्षिणी स्त्रीपुरुषें करतात त्या इतर प्रांतीय लोकांच्या कधीं ध्यानीं मनींही नाहींत.

रामनवमी, गोकुळाष्टमी, शिवरात्र व महाएकादशी हे उपवास मात्र सर्व हिंदुस्थानभर होतात. हिंदुस्थानांत गंगास्नानाचें माहात्म्य फार आहे. पण दक्षिणी ब्राह्मण स्नान करतांना जे आपल्या नाहाणींत मंत्र ह्मणतात ते गंगेवर गंगापुत्राच्या तोंडून ऐकं यावयाचे नाहींत. तेथील मंत्र काय ते "गंगा मय्याकी जय, जजमान मय्याकी जय. गंगामय्या जजमानकी सर्व कामना पूर्ण करे." हे आहेत. कोणास तर्पण सांगणें झाल्यास हिंदुस्थानी गंगापुत्र पुढील तर्पण सांगतात. बापको पानी देव. चचाको पानी देव, पितीकों पानी देव, नानाकों पानी देव, मामाकों पानी देव, भाईको पानी देव, भवजाईको पानी देव, इनमेंसें जिंदे हो ऊनकों पानी मत देव. जजमानकी सकल कामना पूर्ण होवे. हे या लोकांचे मंत्र ऐकून दक्षिणी लोक बिचारे हांसूं आलें तरी तीर्थाचे उपाध्ये वंद्य आहेत असें समजून त्यांचा उपहास करीत नाहींत. आतां काशी, गया, प्रयाग वगैरे मुख्य मुख्य क्षेत्रीं श्राद्धें वगैरे चालविण्यास दक्षिणी ब्राह्मण असतात पण लहान लहान क्षेत्रीं या गंगा पुत्रांवरच अवलंबावें लागतें.

महाराष्ट्रेतर भागीं संपत्तीचाही अभावच आहे. खरे दागिने स्त्रियांच्या अंगावर क्वचित् आढळतात. खोट्या मोत्यांचे अलंकार मोठमोठ्या श्रीमंतांचे बायकांच्या अंगावर असायाचे; पण महाराष्ट्रांत जर को-

णी स्त्रीनें आपल्या नथेंत किंवा कोठें एकादें खोटें मोतीं घातलेलें इतर स्त्रियांस आढळलें तर त्यांत ओळखून तिचा पाणउतारा करावयास कांहीं भीड धरीत नाहींत. रेशीमकांठी धोतरें, उपर्णी, लुगडीं, जीं महाराष्ट्रांत उंची वस्त्रें वापरलीं जातात, तशीं इतर कोणत्याही दुसऱ्या प्रदेशीं पहाण्यांत येत नाहींत. तिकडे फार झालें तर मलमलीवर थोडाबहुत कशिदा केलेले कपडे किंवा विलायती चिटांचे कपड्याचे प्रकार आढळतात. स्वदेशहित तें काय हें थोडें बहुत बंगाल्यांत मात्र व्याख्यान द्वारें लोकांस कळूं लागलें आहे; पण स्वदेशाविषयीं नुसत्या बडबडीपलीकडे बंगाली लोक पोंचले नाहींत. पण महाराष्ट्रीय लोकांत हजारों गृहस्थ असे आढळतील कीं, जे परदेशी माल सहसा स्वस्त मिळाला तरी न घेतां देशी मालावर गुजारा करतात. लग्नसंबंधीं रीति तरी महाराष्ट्रीयांच्या इतर देशीयांपेक्षां चांगल्या आहेत.

महाराष्ट्रांत लग्नाशिवाय कुमारिका १४ वर्षांवर राहिलेली आढळावयाची नाहीं; पण इतर प्रदेशीं ८०।८० वर्षांच्या उंच जातीच्या ह्मणजे ( श्रेष्ठ ब्राह्मणकन्या ) अविवाहितच मरतात. उत्तर हिंदुस्थानांत अशा अविवाहित स्त्रियांची संख्या फार आहे. ज्यांस विशेष प्रतिबंध असतो त्या कशाबशा आपला जन्म काढतात; ज्यांच्यानें पतीशिवाय आयुष्य कंठवत नाहीं. त्या खुशाल बाजारांत दुष्कर्माचें दुकान घालतात. हें विवाह न होण्याचें कारण, हिंदुस्थानी बंगाली वगैरे महाराष्ट्रेतर ब्राह्मणांत उंच नीच जाती मानल्या आ-

हेत. नीच जातींतील कन्या उंच जातींत देतात पण उंच जातींतील नीच जातींत देणें त्यांस लांछन वाटतें. अर्थात् जे श्रेष्ठ कुळाचे सुकुल, दिच्छित (दीक्षित) वगैरे ब्राह्मण आहेत त्यांस मोठमोठ्या देणग्या मिळून नीच कुळांतील मुली मिळतात ह्मणून ते बरोबरीच्या कुळांतील स्त्रिया पत्करीत नाहींत. उंच कुळांतील ब्राह्मण कितीही दरिद्री असो, अक्षरशत्रु असो, चोर असो, तुरुंगांतून जाऊन आलेला असो, वयोवृद्ध असो आणि अगदीं मूर्ख असो, त्याला ते अपात्र समजत नाहींत व त्याची इच्छा असल्यास त्याच्या तितक्या अवस्थेंत त्याला दहा लग्नें सुद्धां करणें अशक्य होत नाहीं व कित्येक उंच कुलांतील लोक गरिबीस आले तर ह्मातारपणींही लग्न करतात. जेणेंकरून त्यांस सासुरवाडीहून निर्वाहापुरतें द्रव्य मिळतें. आणखी जे जे अंधेर त्या लोकांत आहेत ते आपल्याच्यानें उच्चारवतही नाहींत; पण आपल्यास फक्त महाराष्ट्राशीं तुलना इतर प्रांतांची करायची होती ह्मणून इतकें तरी बोललों. महाराष्ट्रांत अशा दुष्ट चाली नाहींत. व ज्या थोडथोड्या आहेत त्या मोडून टाकण्यास आपल्याकडील मंडळी दक्ष असते. कोंकणपट्टींत देसाई खोत वगैरे कांहीं जी गांवांतील प्रमुख मंडळी असते तिचा लग्नामागें थोडा बहुत कर असतो. राजापूर प्रांतीं कोळें ह्मणून एक गांव आहे तेथें देसायास लग्नामागें पांच रुपये मिळत असत, व ते तेलसाडी पूर्वीं त्याला देऊन पुढें तेलसाडी नेसवायाची असा त्या गांवांतील फार दिवस चालत आले-

ला देसायांचा मान असे. ही देसाई मंडळी कऱ्हाडी असून सर्व गांव कोंकणस्थांचा आहे. ही मंडळी आपला मान लोक राखतात हे उपकार न मानतां आपण आपला मान त्यांजकडून राखवितों असा अभिमान बाळगीत असे. ब्राह्मण भोजनाचे वेळीं हे देसाई फार छळीत असत. सोंवळ्यांनीं पहिल्या बोलावण्यानंतर हे स्नानास उठत. दुसऱ्या बोलावण्यापर्यंत पूजेच्या व संध्येच्या धामधुमींत देसाई निमग्न असत. तिसऱ्या बोलावण्यास येतों ह्मणून सांगत व ४ थ्या बोलावण्यास स्वारी एकदाची दुपारीं दोन वाजतां जाई. या योगें इतर ब्राह्मण मंडळी अगदीं त्रासून जाई, पण कोणाचा कांहीं इलाज चालेना. कारण फार दिवसांची पडलेली चाल मोडणें हें आपल्या लोकांच्या हातून होण्यास जरा कठिण जातें. तरी जिवबा ठाकूर देसाई यांच्या कारकीर्दीत कोलेंकर मंडळीनें ती चाल अगदीं मोडून टाकली. एका गृहस्थाकडे लग्नाची समाराधना असतां तीन बोलावणीं झालीं तरी देसाई आले नाहींत. सर्व मंडळी पात्रांवर बसली आहे व यजमान देसायांसाठीं आंतबाहेर करीत आहेत इतक्यांत ४ थें आमंत्रण करण्यास गेलेला मनुष्य परत आला व ह्मणाला जिवबाठाकूर ह्मणाले पानें वाढा मी हा आलोंच. यजमानानें त्या आमंत्रण करणारास ह्मटलें ते घराबाहेर पडले का? तो ह्मणाला अद्याप ते पूजा करीत आहेत. पूजा मात्र अर्धी झाली आहे; तरी ते अर्ध्या तासांत येतीलसें वाटतें. हें ऐकून यजमानांस राग आला. त्यांनीं बाहेर येऊन ब्राह्म-

णांस प्रश्न केला कीं, जर देसाई मागून आह्मांबरोबर बसतील तर चालेल कीं नाहीं ? त्या प्रश्नावर थोडी भवति न भवति झाल्यावर ब्राह्मणांनीं सांगितलें कीं, आपण उदक सोडाल तर आह्मांस बसण्यास कांहीं हरकत नाहीं. त्यांनीं लगेच तूप वाढण्यास सांगून संकल्प केला; उदक सोडून ब्राह्मणांस बसण्यास सांगितलें आणि देसायांकडे आपण स्वतः गेले. तेव्हां जिवबाठाकूरांची पूजाच चालली होती. यजमानास पाहून जिवबा ह्मणतात आपण स्वतः कशास आलां मी येतच होतों.

यजमान—मीं ब्राह्मणांस तर उदक सोडलेंच आहे आपण व आह्मी बरोबर बसूं. आपण स्वस्थपणें पूजा करावी.

हे शब्द ऐकून जिवबाचे पायांची आग मस्तकास गेली. तो ह्मणाला, माझ्या घरीं अन्न नाहीं ह्मणून कां मी तुमचे घरीं येऊं; माझा मान तुह्मांस माहित नाहीं का ? तुह्मांस माहित नसेल तर तुमच्या उपाध्यास तरी माहित असला पाहिजे. आणि सर्व ब्राह्मण मंडळी तरी मला घेतल्याशिवाय कशी जेवावयास बसली ? बरें तुमची शेंडी माझ्या हातांत आहे' जा तुह्मी खुशाल तुह्मांस वाटेल तें करा.

यजमान—आपण रागावण्याचें कारण विवाह न होण्याचें नाहीं, मी आपल्या करितां मागें राहिलों आहें. आपली पूजा झाली ह्मणजे बरोबर जाऊं.

देसाई—मला भोजनास येण्यास बनत नाहीं, मी घरींच जेवणार. आणि इतःपर सांगतों कीं, जर मी

पहिल्या बोलावण्याबरोबर कोणाकडे भोजनास न गेलों तर मी तेथें जाणार नाहीं ह्मणून सर्व गांवकऱ्यांस प्रसिद्धपणें सांगेन.

यजमानांनीं हीं भाषणें ऐकून ते घरीं आले त्या वेळीं मंडळी उठावयास झाली होती. विडे दक्षणा देते वेळीं यजमानांनीं सर्व वृत्तांत मंडळीस कळविला.

तो ऐकून तेथें ही शंका निघाली कीं, तेलसाडीपूर्वी जो देसायांचा मान आहे त्या वेळीं ते मंडळींस छळतील. तेव्हां त्या सभेंत सर्वानुमतें असें ठरलें कीं, हा मान कांहीं वेदोक्त संस्कार नव्हे. व देशावर तर हे ढंग मुळींच नाहींत. मग आपल्या पदरची रक्कम खर्चून देसायांचा जो रिकामा मान ठेवायाचा त्यापेक्षां हा मान न देणें रास्त आहे.

पुन्हां याच गृहस्थाकडे दुसरें लग्न लौकरच होतें, त्या लग्नाचे वेळीं तेलसाडीच्यापूर्वी सर्वांनीं येण्याचा निश्चय केला, व ती वेळ आली तेव्हां सर्व मंडळी जमली. आमंत्रणाबरोबर देसाईहि मंडपांत येऊन बसले होते; पण तेलसाडीच्या मानास जेव्हां त्यांस आंतून बोलावणें आलें तेव्हां त्यांनीं हा प्रश्न काढला कीं, आमचा मागील प्रयोजनांत अपमान झाला त्या अर्थी या मानास आह्मी उठत नाहीं. तेव्हां एक थट्टेखोर तरुण पुरुष पुढें होऊन देसायांस ह्मणाला महाराज, मागें अपमान झाला तर पुढला तरी मान संभाळा; नाहींतर मानाचा मान फुकट जाईल आणि आपली मिळकत बुडवाल.

यावर जिवबाठाकूर देसाई ह्मणतात, मान कोण

आमचा बुडवूं शकतो; अरे पिढीनपिढी चालत आलेला मान बुडविण्यास येथें असे कोण मोठे शंकराचार्य उत्पन्न झाले आहेत !

थट्टेखोर—" उथळ पाण्याला खळाळी बहू आणि दुबळया माणसाला गर्व बहू" तशी देसाई तुमची स्थिति आहे. तुमचे ते अधिकार गेले, कामें गेलीं, राजक्रांत्या झाल्या, आतां तुमच्या मानांचीं ओझीं वाहण्यास आह्मांस जरूर नाहीं. आजपर्यंत प्रसंग आला नव्हता तोंपर्यंत जर तुह्मीं डोळे उघडले असते व लोकांस छळलें नसतें तर तुमचा मान खंडन करण्याचें कोणाच्या ध्यानीं मनीं स्वप्नींही आलें नसतें; पण तुह्मीं होऊन आपल्या पायांवर दगड पाडून घेतलात.

देसाई—बरें बरें पाहून घेऊं.

यजमान व इतर मंडळी हा प्रकार पहात होती. यजमान सर्व मंडळीस हात जोडून ह्मणाले. कीं, आजपासून लग्नांतील देसायांचे मान कमी करण्याचा ठराव सर्वानुमतें झाला कीं काय ?

थट्टेखोर गृहस्थ अद्याप खालीं बसला नव्हता, त्यानें सर्वांची संमति घेतली व यजमानास सांगितलें कीं, आपण तेल्रसाडी नेसविण्यास सांगावें. मानपान सर्व बाहेरच्या बाहेर झाला. हें ऐकून यजमान घरांत गेले व देसाई संतापून सभेंतून उठून गेले. तेव्हांपासून गांवांतील सर्वांकडे तो प्रकार खुशाल सुरू झाला. तात्पर्य हें कीं, कोरल्यासारख्या शेंदीडशें घरांच्या खेड्यांत सुद्धां आपल्या स्वतंत्रतेसाठीं महाराष्ट्र देशांत

खटपट चालू असते. असें मी आजपर्यंत मानून आपल्या देशाविषयीं पूज्यता मानीत होतों; पण आज हा घाणेरडा मनुष्य-विक्रयाचा मजकूर ऐकून माझ्या अंगाचा तिळपापड झाला आहे. या अधम लोकांस असे कोणी भक्त भेटत नाहींत का ? कीं, जेणेंकरून यांस बहिष्कृत करावें किंवा सरकार दरबार करून चांगल्या शिक्षा करवाव्या.

येथें आपला वक्ता जरा थांबला व पुढें दहा पळांनीं पुन्हां बोलूं लागला.

तो ब्राह्मण--केवळ पोटच्या पोराचा विक्रय करण्यास क्रूरांनो तुह्मांस कांहींच का लाज वाटत नाहीं ? या विक्रयामुळं आपल्या देशाचें केवढं अनहित होत आहे बरें ! ज्या विधवा स्त्रिया आपण पहातों त्यांत विकलेल्या पोरींची संख्या अधिक वैधव्य दशेंत पात्र झाली आहे. विकलेल्या पोरींस चांगले तरणे ताठे वर थोडेच मिळणार आहेत, ह्मातारे कोतारे, रोगट असेच लोक पोरी विकत घेऊन लग्नें करतात, आणि त्याच्या ऐन तारुण्यांत त्यांस वैधव्य अर्पण करून स्वर्गवासी होतात. यापेक्षां जी रजपुतांत जन्मतः पोरी मारून टाकण्याची चाल होती ती एकपरी बरी ह्मणण्यास हरकत नाहीं. किंवा सतीचा प्रयोगही यापेक्षां बरा.

पण हें जाणूनबुजून आपल्या पोटांत कांटे भरण्यासाठीं उच्च जातींतील ब्राह्मणांचें कृत्य पाहून मला अति दुःख होत आहे. आजपासून पुनर्विवाह जर जारीनें सुरू होईल तर या दुष्टांचीं गिऱ्हाइकें कमी होऊन विधवांचाही उद्धार झाला असता; पण हे पो-

ह्मणाळे लोकच्च त्या मंगल कार्यास व्यत्यय आणीत आहेत. पण सरकार मार्फत या कन्याविक्रयाचा कांहीं बंदोबस्त करतां येईल कीं नाहीं बरें? नाहीं येणार, कारण ते त्यांचा विक्रय उघड बाजारांत करीत नाहींत. सर्वांस विक्रयाची हकीकत माहीत असते; पण ते लोक कन्याविक्रय अन्य जातींस करीत नाहींत यामुळें सरकारासही यांत विशेष लक्ष्य देतां येत नाहीं. जर ब्राह्मणांनीं ह्मार गिऱ्हाईक आलें तरी पैसा घेऊन मुली दिल्या असत्या, तर मात्र बंदोबस्त ठीक झाला असता. असो, आतां मी तर निश्चय करतों कीं, माझें वय ३० वर्षांचें झालें. मुलगी फुकट मिळाली तर ८ वर्षांची मिळणार. विकत घेतली तर ११।१२ ची मिळणार. विकत तर मी प्राण गेल्यासही घेणार नाहीं. ८।९ वर्षांची मुलगी केली तर तिला ऋतु प्राप्त होईपर्यंत आपण वृद्धांत जमा होणार, त्या अर्थी लग्न न करावें हा विचार बरा दिसतो. केव्हा तर पुनर्विवाह करीन.

हीं गणपतरावांचीं भाषणें त्यांचा मित्र बाहेरून ऐकत होता तो पुढें येऊन ह्मणाला वाहवा गणपतराव, हें भाषण जर इतक्या आवेशानें आपण वक्तृत्व सभेंत बोललां असतां तर खचीत बक्षीस मिळालें असतें.

ग०—अहो "वेळेवर वेळ आणि शिमग्यावर खेळ;" तद्वत् तो विषय माझ्यावरच्या प्रसंगामुळें इतका उत्तम वठला. वक्तृत्व सभेंत नेमलेला विषय असतो त्याला इतका जोर कशानें येणार!

**मित्र**—पण गड्या तूं लग्न न करण्याचें ह्मणतोस हें कांहीं ठीक नाहीं. मी दुसरी मुलगी पांहीन. तुला विकतची नको असली तर मी फुकटचीची तयारी करितों.

**ग०**—छे, छे, मी कुमारिकेस वरणार नाहीं. कुमारी जितक्या आहेत त्या सर्व मला भगिनीसमान आहेत अशी मी शपथ घेतों.

**मित्र**—राम, राम, राम, राम, छि, छि, छि, छि, वेड्या भलतेंच काय बोलतोस. अशी प्रतिज्ञा करूं नये. मी तुझें हर यत्न करून लग्न करीन.

**ग०**—आतां काय? प्राण जावो अगर राहो जे शब्द तोंडांतून बाहेर पडले ते का मी माघारे घेईन?

यानंतर गणपतरावाशीं विनायकरावांनीं पत्रव्यवहार या विषयावर चालविला. तेव्हां विनायकरावांनीं गणपतरावांस निक्षून लिहिलें कीं, आमच्या कुळाला जो डाग लागला नाहीं तो तूं पुनर्विवाह करून लावणार त्या अर्थी माझें तुझें बनणार नाहीं. एवढ्यावर ही गोष्ट संपणार नसून खुनाखुनीचा प्रकार होईल मग मला फांशीं दिलें तरी तें मला पतकरेल, पण ही अपकीर्ति मला नको. पुनर्विवाहावर ज्या मोठमोठ्या लोकांनीं अत्यंत श्रम केले त्यांनीं सुद्धां प्रसंगीं माघार घेतला. याचें बीज तूं जाणत नाहींस पण मी जाणतों. (विनायकरावांचें पाऊल सुधारणेंत बरेंच पुढें होतें, पण या विषयांत त्यांनीं विचार केला नसेल किंवा आपल्या लोकांत अर्धवट सुधारणा होते या तत्वानें ह्मणा ते पुनर्विवाहा-विरुद्ध असत.) या

शेवटच्या पत्रावरून गणपतरावांनीं पुनर्विवाहाचें पत्र आपल्या भावास न लिहितां तो नाद ते सोडून बसले. त्यावर विनायकरावांनीं लग्न करण्यास त्यास ५।६ वेळ लिहिलें; पण. गणपतराव दृढनिश्चयी असल्यामुळें त्यांनीं केलेली प्रतिज्ञा शेवटास नेली. यामुळें ते आतां सडे असून आपल्या भावजईचा संसार चालविण्यास कराचीस राहिले होते. त्यांनीं सतत विनायकरावां मागें १२ वर्षें तेथील संसार चांगल्या रीतीनें चालविला. बारावे वर्षी ते एका पुलाचें काम करित असतां उंचावरून खालीं लोखंडी सामानावर पडून तात्काल मृत्युमुखांत पडले. मग सगुणाबाईच्या जिव्हाळ्याचें सिंधमध्यें कोणी नसल्यामुळें त्यांनीं आपल्या संपत्तीची आवराआवर चालविली. पण बायकांचें कोण चालूं देतो. त्यांची पुष्कळ संपत्ति चोरापोरीं उडाली; तरी दोन लाखांची जिनगी दागदागिना सुद्धां यांचे हातीं लागली ती घेऊन त्यांनीं आपल्या बहिणीकडे जाण्याचा विचार काढला. सर्व सामानसुमानाच्या चवदा पेट्या भरल्या त्या सर्व ठीकठाक बांधून आगबोटीवर लादून कन्येसह सगुणाबाई आगबोटीवर चढल्या.

सगुणाबाईच्या प्रकृतीस विनायकरावांच्या मरणापासून जो धक्का बसला होता, त्या योगें त्या नेहेमींच नाजूक तब्यतीच्या झाल्या होत्या. त्यावर हा दुसरा दिराच्या मरणाचा प्रसंग. व लागलींच आटपाआटप सुरू झाली. त्यांत त्यांस पुष्कळ काम करावें लागलें व पैशाची धूळधाण झाली ह्मणून झालेला सं-

ताप या सर्व कारणांस आगबोटीचें लागणें पित्त व ये-त्या यांनीं त्या एकाएकीं अतिशय आजारी पडल्या. आगबोटीवर डाक्टर होता त्याजकडून त्यांस औषधोपाय सुरू झाला. पण दुसरे दिवशीं उतार न पडतां त्या अतिशय आजारी होऊन तीनसांजचे वेळीं त्यांनीं डोळे पांढरे केले. तेव्हां त्याजपाशीं सिंधू मात्र बसली होती. तिनें आपल्या आईशीं बोलणें सुरू केलें, पण लौकरच सगुणाबाईची दांतखिळी बसली व प्रहर रात्रीचे सुमारास त्यांचा अंत झाला. तेव्हां सिंधूनें तर आकांतच मांडला. आगबोटीवर दोन तीन दक्षणी गृहस्थ होते ते सगुणाबाईचे सन्निध बसले होते, त्यांनीं सिंधूचें पुष्कळ प्रकारें समाधान केलें. उजाडल्यावर प्रेतविधी कसा करावा याविषयीं चर्चा होऊं लागल्या. कोणी ह्मणे प्रेत जहाजावर ठेवल्यास जहाज बुडेल. करितां बाईस जलसमाधि द्यावी. सिंधू ह्मणाली ही जुनी समजूत आहे. आजकाल आगबोटीनें कित्येक मोठमोठ्या साहेब लोकांचीं प्रेतें विलायतेस पाठवितात; तर त्यांच्या आगबोटी कोठें बुडालेल्या ऐकिवांत नाहींत.

सात वाजल्यावर आगबोटीचा कपतान व डाक्तर हे दोघे सिंधूबाईपाशीं आले व त्यांनीं सिंधूस प्रेतविधि कसा करावा ह्मणून विचारलें त्यावर सिंधू ह्मणाली माझ्या आईचा विधि मुंबईस होईल. तें त्यांनीं मान्य केलें व तिला तिचें सामानसुमान सर्व माहीत आहे कीं काय तें विचारलें. तेव्हां सिंधूनें आपल्या १४ पेट्या व दोन बिछाने त्यांस दाखविलें. दुपारीं बारांवर दोन वाजतां आगबो-

ट मुंबई बंदरांत पोंचली. सिंधू जरी १२॥ वर्षांची मुलगी होती तरी तिच्या हयातींत तिला कधीं मुंबई दिसली नव्हती, मग ओळख कोठून असणार? तिला आईचा विचार मावशीकडे जाण्याचा होता हें माहीत होतें व मावशी ठाण्यास राहते हेंही माहीत होतें. पण प्रेतसंस्कार मुंबईसच व्हावा अशी तिची इच्छा होती. त्याप्रमाणें तिनें बरोबरच्या मंडळींस त्याविषयीं सल्ला विचारली. ते ह्मणाले मुंबईस सढळ हात केला ह्मणजे जें हवें तें मिळतें व जशी आपल्यास पाहिजे तशी सोय करून घेतां येते. सिंधूबाई आईचें प्रेत घेऊन बंदरावर उतरली. तेव्हां गाडीवाले तिच्या भोंवतीं जमले. तिनें ३ गाड्या भाड्यानें करून नारायण-भोजन-वसतिगृहाचा मार्ग धरला. तेथें थोडी हकीकत व्यवस्थापकानें ऐकून घेऊन ताबडतोब प्रेत दहनाची तयारी केली. भाड्याचे प्रेतवाहक ब्राह्मण आणवून ३ तासांचे आंत सर्व विधि उरकून घेतला व सिंधूबाईस भोजनास विनंति केली. सिंधूबाईनें थोडें भोजन केल्यावर व्यवस्थापकास आपल्या मावशीचा पत्ता सांगून तेथें आपल्यास पोंचवावी ह्मणून विनंति केली. व्यवस्थापकानें सिंधूबाईस विनंति केली कीं, आपण थकून भागून आला आहां त्या अर्थी एक दोन दिवस येथें रहावें; ठाणें दूर आहे असें नाहीं; आपण आपल्या मावशीस तार करून किंवा पत्र पाठवून ही हकीकत कळवावी, ह्मणजे तिकडून आपल्यास नेण्यास कोणी तरी येईल. ही गोष्ट सिंधूच्या मनांस आली व तिनें व्यवस्थापकाची विनंति मान्य करून ताबडतो-

व पत्र लिहून तें त्यांचे स्वाधीन केलें व तात्काळ त्यानें तें आपल्या गड्याहातीं टपालांत पाठविलें.

तें पत्र नारायण सखाराम ( सिंधूच्या मावशीचा नवरा ) यांस मिळतांच ते तें पत्र वाचीत वाचीत स्वयपाकघरांत गेले, आणि आपल्या पत्नीस सर्व मजकूर निवेदन करून ह्मणाले कीं, मी मुंबईस जाऊं का सिंधूबाईस आणायास?

लक्ष्मीबाई—कशाला जातां? ती आपोआप येथें येईल चालत. दिवस होता तेव्हां आलें का कधीं त्यांचें पत्र! आतां कराचीहून निघायाचे वेळीं मात्र काय वेणू ( सगुणाबाईचें माहेरचें नांव ) जेव्हां तिकडे नायनाट झाला, तेव्हां आमच्या उरावर बसावयास बया येत होती तीही वाटेंतच आटपली. आतां पोर येणार, जिला आह्मीं काळी कीं गोरी कधीं पाहिलीही नाहीं. जर तिजपाशीं तिच्या खर्चापुरता ऐवज असेल तर मी घरांत ठेवीन; नाहींतर जाईल भीक मागत, ती नि तिचें नशीब बरोबर.

नारायणराव—तूं जी बायको आहेस ती काय सांगूं? मी समजत होतों माहेरच्या माणसांशीं तरी तूं बरी असशील, पण जेथें तेथें तुझा कजागपणा दृष्टीस पडतो. अग वेडे, आज सतत विनायकराव २० वर्षे कराचीस आहेत, त्यांनीं मोठमोठीं हुद्याचीं कामें केलीं, ते कां भिकारी का होते. या मुलीजवळ जरूर तिच्या खर्चावेंचापुरता पैसा असलाच पाहिजे; आणि कदाचित् नसला तरी ती मुलगी १३ वर्षांची आहे. एकादा हुषारसा माधुकरी पाहून देऊन टाकूं

ह्मणजे झालं. ४।२ महिने आपल्या भाचीस पाळली ह्मणजे आपलें फारसें नुकसान होईल असें नाहीं.

लक्ष्मीबाई–तिच्या पाशीं ऐवज नसला तर का? मी आहें ती. सगळा खर्च काढून घेईन तेव्हां लग्न करीन. आजकाल सात सात वर्षांच्या मुरकुटांस पांच पांचशें रुपये लोक घेतात, आणि १३ वर्षांच्या पोरीस का मी फुकट देववीन?

नारायणराव—पुरे त्या गोष्टी सध्यां राहूंदे, मी आज मुंबईस जाऊं का?

ल०—कांहीं नलगे मुंबईस जाणें. मुंबईस जाणें ह्मणजे दोन रुपयांची चटणी करायची, तिला जरूर असल्यास येईल वर शोधीत.

नारायणरावांचें लक्ष्मीबाईपुढें कांहीं चालत नसे ह्मणून त्यांनीं मुंबईस जाण्याचा बेत रहित करून सिंधूबाईस पत्र लिहिलें कीं, हें पत्र तुह्मांस उद्यां १० वाजतां पोंचेल, व पोंचल्यावर तुह्मीं दुपारच्या गाडीनें यावें. मी स्टेशनावर तुह्मांस घेण्यास हजर राहीन.

हें पत्र सिंधूबाईचे हातीं पडतांच तिनें वसतिगृहाचे व्यवस्थापकास तें वाचून दाखवून आपली तयारी करण्यास सांगितलें. त्यांनीं आपल्या हिशेबाचा कागद सिंधूबाईपुढें ठेविला. त्यांत ठाण्यापर्यंत आगगाडीच्या तिकिटाचा सुद्धां आकार होता. त्याप्रमाणें सिंधूबाईनें हिशेब चुकवून दिल्यावर व्यवस्थापक सिंधूबाईस स्टेशनापर्यंत पोंचविण्यास जाऊन तिकीट काढून पहिल्या वर्गाच्या स्त्रियांच्या डब्यांत तीस बसवून व तिचा निरोप घेऊन तो परतला. थोड्या

वळात सिंधूबाई ठाण्यास पोंचली. तों नारायणराव आपल्या पांच वर्षांच्या मथू नांवाच्या मुलीस घेऊन तेथें स्टेशनाच्या धक्क्यावर बायकांच्या डब्यापाशीं उभे होते. सर्व उतरणाऱ्या बायका उतरल्यावर ते सिंधूबाई, सिंधूबाई, ह्मणून डब्यांत डोकावून हांका मारूं लागले. सिंधू जरी त्या तिसऱ्या वर्गाच्या डब्यांत नव्हती तरी तीस नारायणरावांची हांक स्पष्ट ऐकूं आली. कारण तिचा डबा बायकांच्या तिसऱ्या वर्गास लागूनच होता. हांक कानीं पडतांच ती दरवाजा उघडून बाहेर आली आणि मथूजवळ जाऊन तिनें तिचा मुका घेतला; तेव्हां नारायणरावांनीं सामानसुमान ब्रेकांत आहे कीं काय ह्मणून विचारलें. सिंधूनें आपलें सामान आपल्याच पाशीं ठेवविलें होतें तें तावडतोब हमालाहातीं गाड्यांवर लादून हीं त्रिवर्ग सुखरूप घरीं पोंचलीं. सिंधूस वाटलें होतें कीं मावशी मला पहातांच गळा काढून रडूं लागेल. पण ती ना रडली ना हांसली. तिनें पाण्याचा तांब्या सिंधूस पाय धुण्यास पुढें केला आणि आपण मदघरांत गेली. तेथें गाडीवाले व नारायणराव सामानाच्या पेट्या नेऊनेऊन ठेवीत होते. सगळें सामानसुमान भरल्यावर सिंधूनें आपल्या जाकिटाच्या खिशांतून दोन रुपये काढून गाडीवाल्यांस दिले.

हें लक्ष्मीबाईनीं पाहून त्या मदघरांत नारायणरावांपाशीं गेल्या आणि ह्मणाल्या गाडीवाल्यांना का दोन रुपये ठरविले होते ?

ना०—नाहीं. तर हिच्या बाईमुळें कांहींच ठराव

केला नव्हता, पण आठ बारा आणे दे ह्मणजे झालें.

ल०––पोरीनें पटदिशीं दोन रुपये काढून त्यांचे हातावर ठेवलेन. मी कांहीं बोललें नाहीं. गाडीवाल्यांची दिवाळी झाली ते गेले हंसत. आतां का ते परत देतील ? मला आधीं तिच्यापासून या पेट्यांच्या किल्ल्या घेतल्या पाहिजेत; नाहींतर ती करील 'ऊर्ध्वायै दिशे ब्रह्मणे नमः' जर त्यांत कांहीं असलें तर !

ना०––हलक्या स्वरानें. ओरडूं नको. ती कांहीं आमच्या सारखी गरीब नाहीं हो. ती हजार पांचशांची माया बाळगून असेल. ती आगगाडीच्या पहिल्या वर्गांत बसून आली आहे.

ल०––पहिल्या वर्गांत ह्मणजे ?

ना०––ह्मणजे ते साहेब लोकांचे पांढरे डबे असतात, आणि हिरवीं खिडक्यांना तावदानें असतात; ज्यांत मऊ मऊ गाद्या बाकांवर आंथरल्या असतात, व निजण्यासाठीं वर झोंपाळे टांगलेले असतात त्या डब्यांत.

ल०––आणि अशा त्या डब्यांत हिला कोणी बसविली ?

ना०––'दाम करी काम आणि बिबी करी सलाम' पैसा असला ह्मणजे या इंग्रजी राज्यांत काय हवें तें करावें. मी जर श्रीमान् असतों तर तूं सुद्धां हात जोडून मजपुढें उभी रहातीस आणि पुढें पुढें करतीस. ( हंसतात )

ल०––नाहींतर काय मीं आपलें कमी केलें आहे, असें ह्मणून रागानें मान फिरविते. आणि बाहेर ओटीवर

येऊन सिंधूस ह्मणते. सिंधू इतक्या ग पेट्या कशाला इतक्या दूर आणल्यास ह्या? सामानसुमान विकून विकून रोकड आणली असतीस ह्मणजे झालें असतें.

सिंधू--सामान अतिशय होतें तें सर्व विकलें;पण कपडे लत्ते दागदागिने जे तिकडे विकण्यासारखे नव्हते तेवढेच आईनें या पेट्यांत भरले. आणि ते विकण्याची जरूरही नव्हती.

ल०--दे पाहूं किल्ल्या त्या पेट्यांच्या.

सिंधू--तुह्मीं किल्ल्या मागण्याची फारच त्वरा केलीत मावशीबाई. जरा थांबा आमच्या तुमच्या गोष्टी होऊंद्या आणि खुणाखाणा पटल्या ह्मणजे मी किल्ल्या आपल्याच स्वाधीन करणार आहें. आपण माझ्या मावशीबाई आहां, अशी माझी अजून समजूत पडली नाहीं, याकरितां किल्ल्या देणें कसें बरें माझ्यानें होईल.

ल०—(नवऱ्यास हांका मारते) ऐकलंत का बाहेर यायचं होतं.

ना०--काय ह्मणतेस?

ल०--मला आपण कजागमावशी ह्मणतां ना? ध्या आतां भाची आली आहे तुमची साळसूद.

ना०--तुझें तोंड आहे कीं तोबरा? चल हो घरांत, पोर येऊन बसली नाहीं तों लागली तणतण करायला! मूर्ख. तिला पाणीबिणी दिलेंस का? भुकेतहानेची कांहीं केलीस का चौकशी?

नारायणरावांनीं बोलण्याचा ध्वनी बदलून नीच स्वरानें सिंधूस विचारलें; सिंधूबाई, तुला भूक आहे का?

तहान लागली आहे का? पाणीबिणी देऊं का आणून?

सिंधू—काका, मला वाटेचे श्रम झाले आहेत, यासाठीं वारंवार पाणी पितां कामा नये. ह्मणून मला जरा चहा घेतला पाहिजे.

ना०—थांब जरा, आमच्या घरांत चहा नसेल. मी आतां या समोरच्या दुकानावरून चहा आणतों आणि तुला करून देतों ( बायकोस ह्मणतात ) ऐकलंस का ! जरा चुलींत पेटूं घाल आणि बोधुण्यांत पाणी तापत ठेव पाहूं ?

लक्ष्मीबाई रागानें लाल होऊन बसली होती, तिनें तर नवऱ्याच्या सांगण्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं.

सिंधू—काका, चहा आणायास नको. सर्व तयारी मजपाशीं आहे. ह्मणून ती उठून मदघरांत जाऊन आपली फराळाची पेटी उघडून स्पिरिट( मद्यार्क ) ची बाटली, टिनाची चहादाणी, चूल, आगकाडीची पेटी, विलायती दुधाचें टिन ( डबा ), चहाचे पेले व बशा इतकें सामान त्या पेटींतून बाहेर काढून दोन खेपेंत सगळें ओटीवर घेऊन आली. चुलीखालीं जें एक मद्यार्क रहाण्यास भां॰ं असतें त्यांत बाटलींतील चमचाभर मद्यार्क ओतला व चहादाणींत पाणी भरून ती वर ठेवली, आणि काडी ओढून ती मद्यार्कास लावतांच अंधक निळी जोत चहादाणीखालीं लागली. नारायणराव, लक्ष्मीबाई व मथू हीं तिघें ही गम्मत पहात होतीं. दहा पळें झालीं न झालीं तों पाण्यास कढ आला. तें पाणी उतरून त्यांत चहा टाकला व डब्यांतील दुधाची रबडी थोडी पाण्यांत टाकून तें

दूध चहांत घालून चार पेले चहा तयार केला. एक पेला नारायणरावांपुढें ठेवला, दुसरा मावशीपुढें ठेवला व मथूस आपल्या मांडीवर घेऊन चमच्या चमच्यानें फुंकून फुंकून तीस ती चहा पाजूं लागली. तेव्हां नारायणराव हांसत हांसत ह्मणाले, सिंधूबाई मला कांहीं चहा नको; तूं अगोदर घे, उरला तर पहातां येईल.

सिंधू—हें काय काका, चहाला का कमी का आहे ? आणखी लागला तर पुन्हां करीन.

लक्ष्मीबाईंनीं ही चहा करण्याची पद्धत कधीं कानांनीं ऐकिलीही नव्हती मग पहाणें कोठून ? त्यांस या तयारीविषयीं हांसूं येत होतें; तरी त्या हंसल्या नाहींत. पण मथूस हाक मारून आपल्या पुढील पेला उचलून नेण्यास सांगितलें. तेव्हां सिंधू ह्मणाली, मावशीबाई घ्याना का चहा. त्यांत कांहीं वाईट नाहीं. तो एका पाल्याचा काढा आहे.

लक्ष्मीबाई—मथ्यें, हें घेऊन जा. काय तें. इश्श मेलें तें भांडें सुद्धां कसें हाडांचेंसें दिसतें आहे. इकडे सुद्धां मोठ्या कौतुकानें जवळ बसून तें घाणेरडें पाणी प्यावयाचें आहे वाटतें.

आगगाडीचा विटाळ तर नाहींसाच झाला.

**सिंधू**—मावशीबाई, तीं भांडीं चिनी मातीचीं असून पाणी आपल्या घरांतलेंच आहे. ह्मणून चहा घेण्यास हरकत नाहीं.

हे शब्द ऐकून लक्ष्मीबाई हांसूं येत होतें ह्मणून त्या लागल्याच उठून काय पोर चावट आहे ह्मणून

पुटपुटत घरांत गेल्या. नारायणरावांनीं लक्ष्मीबाई सो-डून गेलेला पेला सिंधूपाशीं आणला व तेही तिजपुढें येऊन बसले. आणि ह्मणाले. आधीं तूं घे, मग मथीला पाज, नाहींतर मी मथीला पाजतों.

तेव्हां त्रिवर्गांनीं चहा घेतला. सिंधूच्या मनांत मावशीनेंहि घ्यावा असें होतें पण तीं घेणार नाहीं अशी सिंधूची नारायणरावांनीं समजत घातली. नंतर नारायणरावांनीं सिंधूबाईस सर्व हकीकत विचारण्यास सुरवात केली. त्यावरून सिंधूची तर बरीच खात्री झाली कीं, लक्ष्मीबाई आपली मावशी आहे खरी, पण मावशीच्या तोंडून मावशीपणाचा एकही शब्द आला नाहीं. ह्मण आहे " माय मरो पण मावशी जगो " ह्मणून तिनें होऊन मावशीचीं आर्जवें केलीं नाहींत.

संध्याकाळीं स्वयंपाकास लागण्यापूर्वीं लक्ष्मीबाई बाहेर येऊन मोठ्यानें नारायणरावांस विचारतात. संध्याकाळीं तुमच्या भाचीसाठीं काय करूं ?

**सिं**०--मी कांहीं कोणी पाव्हणी नव्हें. जो रोजचा करायाचा स्वयंपाक असेल तो करा.

**ना**०--कर कांहीं गोड धोड.

**ल**०--मग बाजारांत जायाला हवें.

**सिं**०--काका, मला आगबोटीमुळें भोंवळ येते यासाठीं चहाशिवाय गोड पदार्थ खाणें बरें नाहीं. चहांत सुद्धां मी साखर घालीत नाहीं. ह्या विलायती दुधांत जी मूळची घातलेली साखर आहे तेवढ्यावर अधिक गोड मला आवडत नाहीं.

**ना०**—पण भाताशिवाय तुझें चालेल का सिंधूबाइ?

**सिं०**—भाताशिवाय माझें जेवण कधीं झालेलें मला आठवत नाहीं. तरी चालेल तर काय झालें.

**नारायणराव**--( बायकोस ) जा टिपरीचा भात कर ह्मणजे झालें आणि बाकी रोजचा स्वयंपाक कर.

लक्ष्मीबाईस सिंधूच्या डौलीं भापणांचा राग येई, पण किल्ल्या हातीं पडत तोंपर्यंत अधिक राग न दाखवितां थोडी गोडी दाखवावी असा तिनें मनांत निश्चय केला. आणि लौकर लौकर चुलींत पेटूं घालून भात, घोळीची पातळ भाजी आणि बाजरीच्या भाकरी इतका स्वयंपाक एका घटकेंत तयार केला.

घरची गरिबी असल्यामुळें नारायणरावांकडे दिवेजाळीत बसण्याची वहिवाट नसे; लौकर जेवणें खाणें आटोपून निजानीज होत असे. याकरितां स्वयंपाक सुरू होतांच नारायणराव संध्येस बसले. संध्या उरकल्यावर सिंधूबाईस भोजनास हाक मारली. सिंधूबाई आंत गेली पण तिनें नारायणरावांस आपण मावशीबाईंबरोबर मागून बसणार ह्मणून सांगितलें. त्यावर नारायणराव ह्मणाले पान वाढलें आहे, आतां, तूं माझ्या बरोबर बैस. व उद्यापासून तूं आपल्या मावशीबरोबर बैस.

शेवटीं सिंधूबाई नारायणरावांबरोबर जेवायास बसली, पण तिनें असें कदान्न कधीं खाल्लें नव्हतें. मोठ्या तांदुळांचा तो बटबटीत भात, ती बेचव घोळीची भाजी, आणि बाजरीची भाकरी; तरी विवेकानें तिनें थोडें अन्न खाऊन ती उठली.

सर्वांचीं भोजनें झाल्यावर सर्व मंडळी दिवा मालवून आपआपल्या बिछान्यावर ओंटीवर बसली आहेत. सिंधूबाईनें मथूस आपल्या आंथरुणावर घेऊन ती तिच्या अंगावरून हात फिरवीत आहे, अशा समयीं लक्ष्मीबाई सिंधूस ह्मणते, सिंधू, वेणूबीग कशानें प्रकृत बिघडली ?

सिंधू०—दुःख आणि श्रमच तिच्या मरणास कारण झाले.

ल०—तुझ्या लग्नाची गोष्ट तुझ्या त्या वाटग्या चुलत्यानें कधीं काढलीच नाहीं कीं लग्नाचें जमलें नाहीं ? आजकाल एवढ्या मुली ठेवण्याची का कोठें चाल आहे ?

सिं०—मावशीबाई ती गोष्ट खरी. पण बाबांच्या मृत्युपत्रांत ज्या ज्या शर्ती आहेत त्यांत काकांनीं कांहीं कमजास्त केलें नाहीं.

ल०—मृत्युपत्र ह्मणजे काय ?

ना०—मृत्युपत्र ह्मणजे मरणसमयीं मरणारा जर शुद्धींत असेल तर आपल्या इच्छा काय काय आहेत त्या वारसास लिहून देत असतो.

ल०—सिंधू, तुझ्या बापानें आपल्या काय इच्छा लिहून ठेवल्या होत्या ?

सिं०–तो कागद मी उद्यां तुह्मांस दाखवीन. त्यांत असें लिहिलें आहे कीं, " माझे बंधू गणपतराव यांनीं संसार पहावा, जर दीर भावजयीचें पटेनासें झालें तर सर्व पैका ब्यांकेंत टाकून व्याजावर बायकोनें निर्वाह करावा. ब्यांकेंतील पैशास हात लावण्यास सि-

धूच्या नवऱ्यास मात्र अधिकार असावा; तो तरी आपल्या बायकोच्या मरणानंतर. सिंधूनें आपल्याकरितां वर स्वतः पहावा. १४ वर्षें झाल्याशिवाय तिला लग्नाची घाई करूं नये. सिंधू जो वर पाहील तो चांगला आहे कीं नाहीं हें तिच्या आईनें व चुलत्यानें पाहून तिला आपले अभिप्राय कळवावे. तितकेंही करून तिला जर तिनें पाहिलेला वर पसंत पडला तर लग्न मोडण्यास कोणास अधिकार नाहीं. सिंधूच्या शिक्षणास तिच्या आईनें व चुलत्यानें अतिशय श्रम करावे. व लग्नापूर्वी ती विद्वान् स्त्रियांत बसण्यास योग्य झालेली असावी.

ल०—एकूण तुझ्या लग्नाची हेळसांड तुझ्या बापानेंच केली ह्मणावयाची; आणि आतां तूं का स्वतः नवरा बघणार सिंधू ?

( सिंधू लज्जेनें गप्प बसली. )

ना०—अग, आजकाल इंग्रजी शिकलेल्यांची अशीच इच्छा आहे. आणि ती एक प्रकारें चांगलीही आहे. यानंतर लक्ष्मीबाई व सिंधू बराच वेळ गोष्टी बोलत बसल्या व त्यावरून सिंधूची खात्री झाली कीं लक्ष्मीबाई ही आपल्या आईची वहीण आहे. तरी तिनें त्याचवेळीं लक्ष्मीबाईस किल्लया न देतां सर्वजणें झोंपीं गेलीं. सकाळीं उठून प्रातर्विधि उरकल्यावर सिंधूनें पुन्हां मावशीशीं गोष्टी चालविल्या, तेंव्हां ती चहा करण्याच्या तयारींत होती. फराळाची पेटी उघडली आहे व तींतील अर्धें सामान ती बाहेर घेऊन जात आहे, इतक्यांत लक्ष्मीबाईनें त्या पेटीस

लोंवत असलेल्या किल्ल्यांचा झुपका काढून घेतला. सिंधूनें दुसरी खेप बाहेर पोंचवून परत येऊन पाहिलें तों पेटीस किल्ल्या नाहींत. तें कृत्य लक्ष्मीबाईचेंच आहे असें समजून ती ह्मणाली मावशीबाई तेवढी पेटी बंद करा बरें.

मा०—अग किल्ल्या कोठें आहेत ?

सिं०—तुह्मीं नाहीं का घेतल्यात ?

मा०—मीग कशाला किल्ल्या घेऊं ? मला काय करायाच्या आहेत ? पोरीबिरीनें तर नाहीं उचलल्या?

सिं०—नाहीं हो, ती गरीब बापडी केव्हांची बाहेर बसली आहे. तरी लक्ष्मीबाईनें मथूस हाक मारून किल्ल्या नेल्यास का ह्मणून विचारलें, त्यावर ती नाहीं ह्मणाली.

लक्ष्मीबाई, घाबरल्यासारखें करून चोहोंकडे किल्ल्या शोधूं लागल्या? तेव्हां सिंधू ह्मणते मावशी, शोधण्याचें मिष कशाला करतां ? तुमच्या शिवाय कांहीं किल्ल्या नेण्यास कोणी बाहेरून आलें नाहीं, आणि तुह्मीं घेतल्यात त्यांत कांहीं वावगें नाहीं. मी आतां त्या तुमच्या किंवा काकांच्या स्वाधीन करणारच होतें. असें ह्मणून तिनें गळ्यांतील दोन किल्ल्या काढून पेटी बंद केली.

ल०—कांग सांपडल्या का किल्ल्या ?

सिं०—सांपडतील कोठून " मास्तरकी " नें पेटी बंद केली.

( इतक्यांत नारायणराव आंत आले.)

ल०—" मास्तरकी " ह्मणजे काय आहे सिंधू?

सिं०—" मास्तरकी " ह्मणून ही मजपाशीं किल्ली आहे. या किल्लीनें या चवदा पेट्यांचीं कुलपें लागतात व उघडतात.

नारायणराव—मग सगळीं कुलपें एका किल्लीनें उघडण्यासारखीं का आहेत ?

सिं०—भलत्या किल्ल्या या कुलपांस लागायच्या नाहींत. या चौदा कुलपांतील सुद्धां एकाची किल्ली दुसऱ्यास लागत नाहीं; पण ही सगळ्या किल्ल्यांची राणी आहे. ही मात्र एवढ्या चवदा कुलपांस लागेल. १५ वें कुलूप आपण आणाल तर त्याला ही लागणार नाहीं. जगांतील कशाही कारागिरानें केलेली किल्ली या आमच्या कुलपांस लागणार नाहीं; ह्मणून कुलपें करणारानें तशा युक्तीवर या एका किल्लीची योजना केली आहे. कारण प्रसंगविशेषीं या किल्ल्या हरवल्या तर दहा दहा रुपये किंमतीचीं कुलपें फुकट जाऊं नयेत. या नुसत्या किल्लीची किंमत ५० रुपये आहे.

ना०—पण ते कारागीर तरी अशा किल्ल्या करतीलना ?

सिं०—ते सुद्धां करणार नाहींत. ते कारागीर इमानदार असून सरकारचा त्यांस आश्रय आहे. याकरितां ज्या पायावर ते एक " पेटेंट करितात " तशा नमुन्याचें ते पुन्हां करणार नाहींत अशी त्यांनीं जणूं शपथ वाहिली असते.

ही अजब कल्पना ऐकून नारायणराव व लक्ष्मीबाई यांस आश्चर्य वाटलें. पण लक्ष्मीबाईच्या आ-

नंदांत जरा विरजण पडलें. त्यांस वाटलें कीं जरी किल्लया माझे हातीं आल्या तरी शेंडी तिनें आपल्या मुठींत ठेवलीच अखेर. लक्ष्मीबाई हांसत हांसत पुढें आल्या आणि सिंधूस ह्मणाल्या, उघड बरें सर्व कुलपें या एका किल्लीनें ? त्याप्रमाणें सिंधूनें करून दाखविलें. तेव्हां लक्ष्मीबाई ह्मणते, पाहूं तर तुझी राणी-किल्ली कशी तिची घडण आहे ती ? या मावशीच्या भाषणाचा तिला अर्थ समजला कीं, ही किल्ली मावशीच्या हातांत गेली ह्मणजे ती परत मिळणें कठिण आहे. तरी तिनें अगोदरच विचार केला होता कीं, मावशीपाशींच किल्लया देणें जरूर आहे. जळांत राहून माशांशीं वैर कामाचें नाहीं. त्याशिवाय एका पेटींत कागदपत्र व आईचे कपडेलत्ते आहेत, ती पेटी आपल्या स्वाधीन ठेविली ह्मणजे मावशीचा जरी वाईट हेतु असेल तरी तो सिद्धीस जाणार नाहीं. तशांत नारायणराव देवमाणूस आहे. तो सहसा विशेष अन्याय करूं देणार नाहीं. ह्मणून तिनें " मास्तरकी " नें पुन्हां फराळाची पेटी उघडून तींतून एक कुलूप बाहेर काढलें. त्याची किल्ली इच्या गळ्यांत मास्तरकीबरोबर होती ती काढून तें कुलूप आईच्या कपड्यांच्या पेटीस लावून त्याचें पहिलें कुलूप काढून टाकलें, आणि 'मास्तरकी' लक्ष्मीबाईचे हातीं दिली. लक्ष्मीबाईनें किल्लया हातीं पडतांच सर्व पेट्या उघडून पहाण्यास सुरू केलें. त्यांत उंची वस्त्रें, नोटांचीं पुडकीं, रुपयांच्या पिशव्या, लहान-मोठे दागिने वगैरे पाहून लक्ष्मीबाई व नारायणराव हीं दोघें चकित झालीं. त्यांस

जरी सर्व चिजांची किंमत करतां आली नाहीं; तरी सिंधूबाईनें अलोट संपत्ति आणली आहे अशी त्या स्त्रीपुरुषांची खातरी झाली. आतां सगळ्या पेट्या लक्ष्मीबाईनीं पाहिल्या; पण चवदावी पेटी जिला सिंधूनें नवें कुलूप घातलें होतें, त्यास त्यांपैकीं कोणतीहि किल्ली लागत नसून राणी-किल्ली ( मास्तरकी ) ही लागेना तेव्हां मावशी सिंधूस ह्मणाली, ती किल्ली कशाला तुजपाशीं ठेवतेस इकडे आण पाहूं ?

सिं०—ती पेटी फक्त माझ्या ताब्यांत राहील ह्मणून तिची किली मी सहसा देणार नाहीं.

ल०—ती गोष्ट होणार नाहीं. तूं हरवशील एखादी. मला आतां या सगळ्या सामानास जिवापाड जपलें पाहिजे. उद्यां कांहीं कमजास्त झालें तर मला लोक जबाबदार समजतील.

सिं०—मी पाहिजे तर लिहून देतें कीं, ही पेटी मीं आपल्या मावशीच्या ताब्यांत न देतां ती माझ्या ताब्यांत ठेवली आहे. मग तर झालें ?

ल०—त्या पेटींत असें आहे तरी काय ?

सिं०—तींत माझ्या आईचीं जुनींपानीं लुगडीं. पीतांबर, शालू वगैरे कपडे मात्र आहेत. पैसा टक्का तींत अगदीं नाहीं.

ल०—अग सिंधू, तुझ्या बापाचें ह्मणणें आहेना कीं तुला विद्या शिकविली पाहिजे; तर ती पेटी माझ्या स्वाधीन कर ह्मणजे तींतील उंची वस्त्रें विकूं; ह्मणजे तुला मास्तरीण ठेवण्यास पैसा होईल.

सिं०—तेरा पेट्यांतील पैसा संपेपर्यंत मी आईचे

कपडे विकूं देणार नाहीं. जेव्हां माझ्या आईची आठवण होते; तेव्हां मी तिचे कपडे पाहून रडतें व ते कपडे तिच्या स्मरणास मला चांगली मदत करतात.

लक्ष्मीबाई नारायणरावास ह्मणते—पाहिलीतना कारटी कशी शिरजोर आहे ती. आली आहे आमच्या उरावर खाण्यास. आणि पेटी आणली तिलाहि हात लावूं देत नाहीं.

ना०—किती हा सोस, राहीना कां एक पेटी तिच्या जवळ.

ल०—राहिली ह्मणून तिच्या पेटीशीं मला काय कर्तव्य आहे; ईश्वराच्या दयेनें आज आह्मांस कांहीं कमी नाहीं. खाणारीं सुखी असोत ह्मणजे झालें. पण कारट्यांनीं हट्ट केलेला मला खपत नाहीं.

ना०—पोर आहे. तिला काय समजतें आहे. जशी आपली सुंदरी तशी ती. ( सुंदरी ह्मणून यांची वडील कन्या एका श्रीमंतास दत्तक दिली होती. )

ल०—सुंदरीनें असें माझ्या पुढें तोंड केलें असतें तर का? मुसकुटांतच मारली असती. पण ही पडली दुसऱ्याची; तेव्हां हात लावतां येत नाहीं. ( सिंधूकडे वळून ) कां पोरी, तूं त्या पेटीची किल्ली देतेस का असाच तुला हट्ट करायचा आहे ?

सिं०—हट्ट ह्मणा कीं कांहीं ह्मणा मी ह्मणून माझ्या गळ्यांतील किल्ली तुह्मांस कधीं देणार नाहीं. हे शब्द ऐकून लक्ष्मीबाई अधिकच संतापली ती एका कोंपऱ्यांत जाऊन स्वस्थ बसली. इतका प्रकार होत आहे तों प्रहर दिवस आला होता. पण स्वयंपाका-

ची तयारी नाहीं व सिंधूनें या किल्ल्यांच्या गडबडींत आज चहाही घेतला नाहीं, तेव्हां नारायणराव बिचारे स्वयंपाकघरांत जाऊन त्यांनीं चुलीस पेटूं घालून स्नानाचें पाणी वर ठेवलें, तों सिंधू स्वयंपाकघरांत जाऊन नारायणरावांस काय करतां ह्मणून विचारूं लागली. तेव्हां ते ह्मणाले आज ती स्वयंपाक करीलसा रंग दिसत नाहीं. करितां मलाच करून तुह्मां पोरांस तर वाढलें पाहिजे; मग आमचें होईल सावकास.

सिं०—मावशी नसल्या स्वयंपाक करीत तर मी करतें. मला स्वयंपाक करण्याचा अभ्यास आहे.

ना०—पोरी तूं दमलेली भागलेली आहेस तूं बैस. स्वयंपाक स्वयंपाक तो काय मी आतां एका तासांत उरकून घेईन. तुह्मांस (मथूला आणि सिंधूला) वाढीन आणि मग संध्या पूजा करायास बसेन.

सिं०—भलतेंच. मी स्पयंपाक करतें आपण स्नान करून बसा पुजेला.

नाहीं नाहीं ह्मणतां नारायणराव स्नान करून पुजेस लागले व सिंधू स्वयंपाकास लागली. स्वयंपाक झाल्यावर नारायणराव, मथू आणि मावशी या तिघांचीं तिनें पानें वाढून आपण मागें राहिली. मावशीबाईनीं जेवायास उठण्यास तर ओढून चंद्रबळ आणलें, पण अंगावर पाणी घेऊन नारायणरावांचें अर्धें जेवण होत आहे तों येऊन बसल्या फतकल घालून जेवायास. जेवतांना नारायणराव लक्ष्मीबाईस ह्मणतात पाहिलीसना सिंधू कसा स्वयंपाक करते तो; नाहींतर तूं.

ल०—होईल तर काय झालें स्वयंपाक चांगला.

मडक्यांतलें तेल संपलें असेल. मसाला ओतला आहे धसाधसा. मग काय झालें? तिला कां संसाराची कांहीं काळजी आहे? "आयजीच्या जिवावर बायजी उदार."

ना०—मग हात का कुणाचे गोड असतात? मीठ तिखट ठीक पडणें आणि पदार्थ ठीक शिजविणें हेंच सैंपाकिणीचें काम आहे. तुला देवानें तोंड मात्र खबरदार दिलें आहे, बाकी बायकोपणा का तुझ्यांत कांहीं आहे? नाहीं ह्मणायला पोरें होतात यावरूनच तुला बायको समजायाची.

ल०—पुरुष बायकांचीं कामें करूं लागले ह्मणजे बायकांना पुरुष व्हावें लागतें.

ना०—पुरे पुरे, आयतें गिळायला मिळालें तेव्हां चालली जीभ लांब होत.

ल०—आयतें गिळायाला मिळालें ह्मणजे? आतां एवढी थोरली पोर घरांत वाळगायची ती स्वयंपाक देखील का नाहीं करणार? सगळें काम तिला केलें पाहिजे. आजपासून मी नाहींहो कामाला हात लावायची. एव्हांच बजावून ठेवल्यें. तुमची भाची लाडकी असेल तर तुह्मी कामाला बाई ठेवा.

ना०—तूं जे जे तमाशे करशील ते थोडेच आहेत. पण एवढें ध्यानांत ठेव कीं सिंधूबाईला अभ्यासास वेळ पाहिजे. मी आतां त्या मुलींच्या शाळेच्या मास्तरणीकडे जातों आणि दिवसांतून दोन तास तरी तिला सिंधूस शिकविण्याची विनंति करतों.

सिं०—काका, माझें मागणें एवढेंच आहे; मी

कामाला डगमगत नाहीं; पण माझ्या बाबांच्या इच्छे-प्रमाणें आणखी थोडा अभ्यास होणें जरूर आहे.

ना०—बाई, मला तुझी काळजी आहे. लोक मला बोल लावतील.

ल०—पुरें झालें शिकणें; शिकून शिकूनच या अशा पोरी चावट होतात. मग या चावट कारट्यांनीं खुर्चीवर बसावें, आणि नवऱ्यांनीं स्वयंपाक करावा.

ना०—तूं तरी शिकून शिकूनच आपल्या नवऱ्याला पायानें पाणी दाखवूं लागली आहेस ही!

ल०—तो कांहीं माझा वांक नाहीं. ज्या नवऱ्यांस बायका वागविण्याचें ज्ञान असतें ते आपला अम्मल बायकांवर ठेवतात. पण इकडची अक्कल मला कधींच कळली आहे.

सिं०—मावशीबाई हें काय बोलतां हें?

ल०—अग कारटे तूं मला का शिकवायला कराचीहून आलीस? आतां तर तूं हद्द केलीस. सठवी लहान तोंडीं मोठा घांस घेते. ही मला सासू का आतां होणार! हा दैवा!! म्हणून कपाळावर हात मारून घेते आणि पानावरून उठून आंचवावयास जाते. जातांना तोंड चाललेंच होतें, तें परत आल्यावरही बंद झालें नाहीं. पण आपल्या मावशीचा स्वभाव तसा आहे म्हणून सिंधूनें लक्ष्य न देतां तिनें जेवून घेतलें. उष्टें खरकटें होत आहे तों नारायणराव मास्तरणीकडून परत आले. त्यांनीं सांगितलें कीं, मास्तरीण पाहिजे तेव्हां २ तास येऊन शिकवून जाईल. पुनः संध्याकाळीं पांच वाजतां मास्तरणीस नारायणराव

घरीं घेऊन आले व सिंधूचें व तिचें भाषण होऊन दोघींच्या मतानें शिकविण्यास येण्याची वेळ ठरली. त्याप्रमाणें त्यांचा नित्यक्रम चालू झाला. तसाच लक्ष्मीबाईचाही रागाचें मिष करून आळसांत व संतापांत दिवस काढण्याचा क्रम सुरू होऊन सर्व घरांतील काम सिंधूचे माथीं बसलें. तिला फुरसत काय ती शिकण्याकरितां नेमलेले दोन तास. दुसरी एखादी मुलगी असती तर ते दोन तास आपले आहेत असें समजून मावशीच्या उखाळ्यापाखाळ्या मास्तरणीजवळ सांगून वेळ गमावला असता; पण सर्व कृत्यांत आपलें शिकणें या वेळीं फार महाग आहे, त्याला वेळ अगदीं थोडा मिळतो असें समजून सिंधू अति लक्ष्यपूर्वक अभ्यास करीत असे; व गृहकृत्यें करतांना शिकलेल्याचें मनन करी. सर्व कृत्यें ती लक्ष्यपूर्वक करी. घरांत एक गाय व तिचें वांसरूं असे. गाय तर राखणेस घातली होतीच. ती सकाळीं जाई आणि संध्याकाळीं परत येई. पण वांसरूं घरांतच असे. त्याला तहानभूक लागली ह्मणजे तें " हंबे " ह्मणून आरोळी ठोकी. त्याबरोबर हातांतलें काम सोडून सिंधूबाई आंतून जबाब देई " आलेंरे बाळा तुला पाणी घेऊन, " आणि लागलीच त्याला पाणी पाजी, चारा टाकी आणि पुन्हां आपल्या कामास लागे. तशीच मथू नेहमीं सिंधूच्या मागें मागें असे. तिचें नहाण माखण, खाणें जेवणें यांला सिंधू अगदीं पोटच्या पोराप्रमाणें जपूं लागली. मध्यंतरीं मथुरा आजारी पडली तेव्हां तिच्याजवळ आई वसे. पण आईचे

संतापानें मोठमोठ्यांनीं थोपटणें, मथुरेच्या मनास न येऊन ती तशीच तापकरीण जेथें सिंधू कांहीं काम करीत वसे तेथें जाई. सिंधूशिवाय तिला चैन पडत नसे. म्हणून नारायणरावांनीं सिंधूस सांगितलें कीं, तूं मथी वरी होईपर्यंत घरांतील काम पाहूं नको; तिच्याजवळ वसत जा. ह्याप्रमाणें तिनें केलें व लक्ष्मीबाई घरांतील थोडथोडें काम पाही; तेव्हां मथूस ३ ऱ्या दिवशीं गुण पडला. पुनः घरधंदा सिंधूच्या माथीं बसला. असे कांहीं महिने लोटले तों नारायणरावांची थोरली मुलगी आजारी पडल्याचें पुण्याहून पत्र आलें. या मुलीचें नांव सुंदराबाई असून ही एका श्रीमान् गृहस्थाला दत्तक दिली होती. ते गृहस्थ पूर्वीं ठाण्यास मामलतीचे कामावर होते. तेव्हां ते नारायणरावांच्या घरीं भाड्यानें रहात असत व सुंदराबाई त्या वेळीं तीन चार वर्षांची असून त्या गृहस्थास मुल नव्हतें म्हणून वारंवार मामलेदारीणबाई सुंदरीस उचलून आपल्या बिऱ्हाडीं नेत असे. होतां होतां त्या मुलीचा त्या दोघां स्त्रीपुरुषांस अतिशय ळळा लागला. एके दिवशीं मामलेदार नारायणरावांस म्हणाले, नारायणराव, या मुलीचें लग्न लहानपणीं करूं नका; ही मोठी झाल्यावर इच्या मर्जीस वर येईल त्याच्याशीं इचें लग्न करा. व पांच वर्षांची झाली म्हणजे, इला शिक्षण देण्यास सुरूवात करा.

त्यावर नारायणरावांनीं धर्माची व आपल्या गरिबीची सबब सांगितली. तेव्हां मामलेदार म्हणाले. मला जर मुलगी असती तर मीं खचित असें केलें असतें.

ना०—ही आपलीच आहे.

मामलेदाराचें कुटुंब दारांतून हंसत हंसत म्हणते. नारायणराव बिचारे भोळे आहेत. पण लक्ष्मीबाई म्हणतील--का कीं, सुंदरी तुमची आहे?

ना०—हो, हो, आईसाहेब ती सुद्धां म्हणते कीं, सुंदरी झाली मात्र मला, पण आहे मुलगी तुमचीच.

मामलेदार—विचारा लक्ष्मबाईना आणि दोघें अनुकूल असाल तर द्या दत्तविधान करून.

नारायणरावानीं लक्ष्मीबाईची समजूत घालून तिचा होकार घेतला; आणि मुलगी घातली मामलेदारांच्या ओटींत ! पुढें कांहीं दिवसांनीं मामलेदारांनीं पेनशन घेऊन ते पुण्यास जाऊन राहिले व तेथें त्यांनीं एक दुकान काढलें. त्या दुकानांत त्यांना चांगली प्राप्ति होत असे. मुलीस शिक्षण मिळालें असूनही मुलगी या वेळीं सिंधूबाईच्या बरोबरीची होती. ही एकाएकीं आजारी पडली व तिची प्रकृति सुधारत नाहीं असें पाहून तिच्या बापानें ठाण्यास पाठविल्यानें कदाचित् हवा पालटून ती बरी होईल; या आशेनें नारायणरावांस पत्र लिहिलें. तें पत्र पोंचतांच नारायणरावांनीं तें आपल्या पत्नीस वाचून दाखविलें. लक्ष्मीबाईनें नारायणरावांस मुलीस आणण्यास जाण्याविषयीं लागलाच हुकूम फर्मावला. व त्याप्रमाणें त्याच दिवशीं नाराणयराव पुण्यास जाऊन दुसरे दिवशींच्या गाडीनें मुलीस घेऊन परत आले.

सुंदराबाईस सिंधू आल्याची बातमी पुण्यास कळली होती. म्हणून तिनें आईस नमस्कार केल्यावर अगोदर सिंधूची आणि मथूची चौकशी केली. तेंव्हां सिंधू स्वयंपाकाच्या गर्दींत असून मथू तिच्या भोंवतीं भोंवतीं हिंडत होती म्हणून, लक्ष्मीबाईनीं सुंदरीस त्या कामांत असल्याचें सांगून आपण तिच्याजवळ बसल्या.

ल०—पोरी अगदीं ग सुकलीस ! तुला यशोदाबाई पूर्वीसारखें करताततना ?

सुं०—हो, हेंग काय आई विचारतेस, त्यांच्या घरीं मला येथल्यापेक्षां अधिक सुख आहे.

ल०—मग तुझें दुखणें बरें कां नाहीं होत अजून, तुला होतें तरी काय ?

सुं०—तें माझें मला कांहीं समजत नाहीं व वैद्यांसही कळत नाहीं. बाबा म्हणतात बापू मेहेंदळे असते तर रोगाची परीक्षा तरी होती. आतां तसा कोणी परीक्षक वैद्यच मिळत नाहीं. डाक्टरी उपाय चालतात पण गुण नाहीं. हो पण, एक गोष्ट तुला सांगावयाची आहे. तुमच्या घरची गरिबी बाबांना माहीत आहे म्हणून बाबांनीं मजपाशीं शंभर रुपये देऊन ठेवले आहेत. त्यांत रोज डाक्टर आला पाहिजे व एक बाई माझ्याजवळ नेहमीं पाहिजे. हे रुपये संपले म्हणजे बाबा पुन्हां मनीआर्डर करतील. असें त्यांनीं मला सांगितलें आहे. खर्चावेचांत काटकसर करून प्रकृति अधिक बिघडवूं नको. यासाठीं अगोदर एक बाई ठेव. डाक्टर बाबा आणतील. ( सुंदराबाई दोन्ही

आयांस आई म्हणे व दोन्ही बापांस बाबा म्हणे यासाठीं वांचकांनीं संदर्भानें कोणता बाबा व कोणती आई तें समजून घ्यावें. )

ल०—बाई काय करायाची, मी आहेंच तुझ्यापाशीं तूं घाबरूं नको.

सुं—तुलाग कुठें फुरसत आहे ? मी पगार देणार, मग बाई ठेवण्यास तुला ग काय कठिण वाटतं ?

ल०—बरें आझे बये, मी आपल्या बाळीला बाई ठेवीन हो. बाळे तिला पगार काय देशिल ?

सुं०—देईन ५ रुपये महिन्याचे.

ल०—दे ५ रुपये माझ्यापाशीं; मी आतां बाई आणून तुझ्या स्वाधीन करत्यें.

सुं०—५ रुपये काढून लक्ष्मीबाईचे हातावर ठेवते.

ल०—तुझी मावशी कराचीस होती ती, तुला आहे का ठाऊक ?

सुं०—हो, वेणू मावशीना ? तूं नवतीस का मागें तिच्या गोष्टी सांगत ? आणि माझी पुण्याची आई तर त्या मावशीची नेहमीं आठवण करते. परवां ती मेल्याचें वर्तमान बाबांनीं वर्तमानपत्रांत असलेलें वाचलें. तेव्हां आईच्या डोळ्यांतून टपाटप पाणी पडूं लागलें.

ल०—( मध्येंच ) थांबग माझें तर ऐकून घे. तिची कारटी आमच्या घरीं येऊन राहिली आहे. आतां ही चौदा वर्षांची घोडी पोसण्याचें का आम्हां-

ला सामर्थ्य आहे ? बरें झालें, तुला बाई पाहिजे हें. ते ५ रुपये तिच्या एका महिन्याची पोटगी झाली. पुढें पहातोंच आहों.

सुं०—हेंग काय आई. मावशीची मुलगी ती तुझी नव्हे का? मला बाई, ती बाई नको. मी आहें आजारी, मला राग येणार एकादे वेळीं. रागानें मी भलतें सलतें बोलणार, ती बरी घेईल सोसून ? मला पोक्त म्हातारीशी बाई पाहून दे.

ल०—ती सगळें सोसून घेते. मी दिवसभर थोडी का तिला छळतें? पण ती एकना दोन, उत्तर म्हणून देतच नाहीं. पहिल्यानें एक दोन दिवस ती पहात होती मला सासुरवास करून. ती तरी आमच्या वरच्यांच्या फुशीनें. मग जेव्हां माझा तडाखा तिला समजला तेव्हांपासून अगदीं गाय झाली आहे. तुझ्या कामांत जर ती हयगय करील तर मला सांग म्हणजे झालें. आतां तुला पोक्त बाई पाहिजे, तर ती मुलगी अगदीं पोक्त आहे. तुला ती जीव कीं प्राण करील. मध्यें मथूला दुखणें आलें होतें तें तिनेंच बरें केलें.

सुं०—माझ्यानें बाई वहिणीस कमजास्त काम सांगवणार नाहीं.

ल०—थांब जरा ( आंत जाते व सिंधूबाईस घेऊन येते व सुंदरीसमक्ष सिंधूस विचारते. ) सिंधू ही तुझी दुखणेकरीण वहीण आली आहे. हिच्या पथ्यापाण्याचें करशीलना ?

सिंधू—हो.

ल०—घरांतलें काम मी संभाळीन. रात्रंदिवस हिच्यापाशीं बसशीलना ?

सिंधू—होय.

ल०—ही रागावली तरी तूं तिचें बोलणें सोस-शीलना ?

सिं०—हो, सोशीन.

ल०—( सुंदरीकडे तोंड करून ) हिला जरी चार लाथा मारल्यास तरी ती सोशील, पोर अगदीं गरीब आहे.

सुं०—मग लाथा कशा मारीन ?

ल०—अग एक दाखला सांगतें. तूं मारणार नाहींस तें मला ठाऊकच आहे व तीही समजून आहे. मग झालीना तुला ही बाई: ( यावर सुंदरा कांहीं बोलली नाहीं, पण सिंधू सुंदरास म्हणाली मी तुमचें सर्व काम करीन तुम्हीं मला पतकरा ) सुंदरीच्या डोळ्यांस हे सिंधूचे शब्द ऐकून पाणी आलें.

हीं भाषणें व ठराव होताहेत तों नारायणरावाचें स्नान व पूजा आटोपून ते बाहेर आले व सगळीं आंत जाऊन भोजनाच्या तयारीस लागलीं.

आतां या ठरावाप्रमाणें कामें होऊं लागलीं व डाक्टराचीही नारायणरावांनीं व्यवस्था केली. डाक्टरानें सिंधूस एक स्मरणवही देऊन तिला सांगितलें कीं, ही दुखणाईत मुलगी ज्या ज्या वेळीं जें जें करील तें तें लिहून ठेवीत जा.

फलाण्या वेळीं तिनें पथ्य घेतलें, फलाण्यावेळीं औषध घेतलें, अमुक वेळीं शौचास गेली, अमुक वेळां

बाहेर बसली, जांभई, शिंक, झोंप लागणें न लागणें, कुशीस वळणें, वगैरे सर्व क्रिया टिपून ठेव. त्याप्रमाणें सिंधू सर्व टिपण ठेवीत असे. असे सुमारें १५ दिवस गेले. आणि या दोघी बेंववणींचें ( बहिणीबहिणींचें ) सख्य झालें. तेव्हां रात्रीं जिकडे तिकडे सामसूम झाली व एके दिवशीं या दोघीजणी जागत बसल्या होत्या; त्या वेळीं यांचा पुढील संवाद झाला.

**सिंधू**—सुंदराताई, मला मोठा चमत्कार वाटतो व वारंवार तुझ्याविषयीं माझ्या मनांत विचार घोळत असतात. बहुतकरून खाण तशी माती, व बीज तसा अंकुर असायाचा. पण तुझ्या स्वभावाशीं मावशीचा स्वभाव अगदीं मिळत नाहीं ह्याचें तत्व मला समजत नाहीं.

**सुं०**—सिंधू आक्का, ते नियम अक्षरशहा खरे आहेत, आणि माझा स्वभाव जरी आईच्या स्वभावाशीं मिळत नाहीं तरी बाबांच्या स्वभावाशीं मिळतो. इकडे तुझें लक्ष्य गेलें नाहीं.

**सिं०**—काकांपेक्षां तुझा स्वभाव फार शांत आणि विचारी आहे असेंही मला दिसून आलें आहे.

**सुं०**—छे, छे, बाबांसारखा संभावित गृहस्थ या गांवांत क्वचित् असेल. पण बाबांचें आईपुढें कांहीं चालत नाहीं; यामुळें गांवांत बाबांस जितकीं माणसें ओळखतात त्यापेक्षां आईस अधिक ओळखतात. केव्हां केव्हां कोठें बाबांचें नांव निघालें तर लोक विचारतात नारायणराव कोण हो ? तर त्यांस लक्ष्मीबाईचा नवरा असें विशेषण लोक लावतात. तेणेंकरून

सर्वांस माहिती होतें. असें या आईच्या स्वभावामुळें बाबांचें वजन कमी झालें आहे व यामुळें त्यांच्या नाचा मेंठेपणाही उघडकीस येत नाहीं.

सिं०—बरोबर. पण काका तरी इतके मावशीस कां भितात?

सुं०—अग ते तिला का भितात? ते आपल्या अब्रूला भितात.

सिं०—तें कांहीं असो. मला एक गुप्त गोष्ट तुझ्याशीं बोलायाची आहे; पण ती फुटणार नाहीं असें वचन देशील तर बोलतें.

सुं०—फुटेल कशी? जर फोडण्यासारखी नसेल तर.

सिं०—मला कीं नाहीं ताई, माझ्या जिण्याचा कंटाळा आला आहे. आतां १५ दिवस तूं आल्यापासून मला जरा बोला–बसायला तरी मिळतें. नाहींतर एकसारखे काबाडकष्ट करावे आणि मावशीची तणतण चाललेली आहेच. मला काम पतकरलें पण सुखाचा शब्द तर हवाना बाई?

सुं०—खरचग आक्का, पण आईच्या स्वभावापुढें कोणाचें कांहीं चालत नाहींना? तिची कितीही कोणीं खुशामत केली तरी ती कधीं प्रसन्न झाली असें होणार नाहीं. यासाठीं मी आहें तोंपर्यंत एकमेकींचा आश्रय एकमेकींस आहे. मी जातांना बाबांपाशीं व आईपाशीं चार शब्द सांगून तुझ्या खर्चाकरितां थोडे रुपये देऊन जाईन. म्हणजे तुला कांहीं जाच कमी होईलसें वाटतें.

सिं०—छे. छे. मला खर्चावेंचाला नकोग बाई तूं

देऊं ? मला जी मीठ भाकर मिळते ती बस्स आहे. आणि दुसरी गोष्ट जी मी तुला सांगणार होतें ती आतां सांगतें. तूं गेल्यावर मी येथून जाण्याचा विचार करीत आहें. या जाचांत राहून माझी बुद्धि मंद झाली, स्मरणशक्ति कमी होत आहे, शक्ति तर आजची उद्यां नाहीं, अशी माझी यांच्या घरीं दुर्दशा होत चालली आहे. मला पुढें कोणाचा तरी संसार करणें आहे. व अशानें जर मी आपली अक्कल गमावून बसलें तर माझा आणि माझ्या नवऱ्याचा संसार कसा व्हावा ? आतां मी कांहीं लहान नाहीं; मला चवदा वर्षें होत आलीं आहेत. त्या मानानें जें शिक्षण मिळालें आहे तेंही आजकालच्या काळाला कमी नाहीं. रंगरूप दहांसारखें आहे. कोणी तरी एखादा विद्वान् मला वरीलच वरील.

मी काकांना साफ सांगेन मला तुमच्या घरांत रहायचें नाहीं. म्हणजे आपोआप मला पाहण्याला लोक येऊं लागतील. बाबांनीं मृत्युपत्रांत लिहून ठेवलें आहे कीं, सिंधूनें स्वतः नवरा पहावा; तसें मी करीन. आजपर्यंत हे विचार माझ्या मनांत घोळत होते पण सांगूं कोणापाशीं? तो देवानें योग आणून दिला. तर यावर ताई तुझा अभिप्राय मला कळीव.

सुं०—बरें झालें बाई, तूं मला आपले विचार आज कळविलेस म्हणून. असें करूं नको हें माझें तुला हात जोडून सांगणें आहे. तूं ह्मणतेस त्या सगळ्या गोष्टी खऱ्या आहेत. आईचा जाच, कामकाजाचे कष्ट, शिकण्यास वेळ नाहीं, या अडचणी; व तूं सुस्वरू-

प आहेस,सुशील आहेस, विद्वान आहेस, उत्तम गृहिणी आहेस त्या अर्थी तुला विद्वान् नवरा मिळणेंही कठिण नाहीं. पण जर तूं येथें अशीच कष्टांत रहाशील तर जसा तुला वर मिळण्याचा संभव आहे तसा तूं स्वतंत्र झालीस तर मिळणार नाहीं. झांकली मूठ सव्वालाखाची. घरांत स्त्रीस जी शोभा आहे ती शोभा तिच्या स्वातंत्र्यांत नसते, ही एक गोष्ट. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, तूं जरी किती शहाणी असलीस तरी एखादा भामटचा तुला थापा देऊन वरील. आणि त्याचें काम झाल्यावर तुझी दुर्दशा होईल. आपल्या पूर्वजांनीं जें मुलींचीं लग्नें आपण करण्याचें जोखीम पतकरलें यांत कांहीं तरी त्यांचा चांगला हेतु असला पाहिजे. मुली कोंवळ्या मनाच्या असतात. त्यांनीं रूप पाहिलें म्हणजे त्यांना आपल्या वराचे कितीही दोष असले तरी दिसत नाहींत. म्हणून पोक्त माणसें पात्रापात्रतेचा विचार करण्यास अधिक अनुभवशीर असतात. आतां मीं आपल्या दुखण्याची हकीकत तुला सांगितली म्हणजे कळेल. जशी तुझी पळून जाण्याची किंवा या घरांतून भांडून निघण्याची गोष्ट मला पोटांत ठेवण्यासारखी आहे; तशी माझ्या दुखण्याची गोष्ट तूं पोटांत ठेवण्याचीच आहे. ती गोष्ट अजून माझ्या ओंठाबाहेर पडली नाहीं. पण तुझें माझें ऐक्य झालें असून तसा ओघही आला म्हणून सांगतें ऐक.

मला ज्या गृहस्थांनीं ओंटींत घेतली आहे ते पूर्वी ठाण्याम होते. पुढें पेनशन घेऊन पुण्यास जाऊन आम्ही राहिलों. तेथें बाबांनीं एक दुकान घातलें.

त्यांत बाबांच्या दुसऱ्या एका मित्राची भागी आहे. तो मित्र सुद्धां आमच्याच अर्ध्या घरांत सहकुटुंब रहातो. त्याला सदाशिव म्हणून एक वीस बावीस वर्षांचा मुलगा आहे. त्याचें रूप केवळ मदनासारखें आहे. तो कामाकाजासंबंधानें बाबांकडे वारंवार येई व केव्हां केव्हां माझ्या अभ्यासाचे खोलींतही येई. असें त्यांचें येणें जाणें बरेच दिवस झालें तरी आमच्या घरच्या नोकर चाकरांनीं व आईबापांनीं त्याला किंवा मला त्याविषयीं कांहीं म्हटलें नाहीं. पुढें त्याचें येणें मजकडे फार होऊं लागलें व एकमेकांचीं मनें मिळालीं. त्याच्या भाषणांत केव्हां केव्हां स्पष्ट अन्याय असत, पण मला जी काय मोहिनी पडली तिच्या योगें ते अन्याय सुद्धां मला न्याय वाटत. एक दिवस तो मला म्हणाला कीं, तुझ्या बापाच्या मनांत तुझें लग्न एका श्रीमान् तरुण विद्वानाशीं करावयाचें आहे, म्हणून मी जो तुझ्या खोलींत येतों तो कोणास दिसत नाहीं.

मीं अशी एक वाट मुद्दाम तयार करविली आहे ती तुला सुद्धां अजून माहित नाहीं. मीं एक पेटी करवून ती भिंतींत बसविली आहे व तिचें तोंड मला तीन ठिकाणीं फिरवितां येतें. तुझ्या खोलींत मी असल्याचा जर कोणास संशय आला तर मीं त्या पेटींत बसून दार लावून घेऊन ती फिरविली म्हणजे तिचें तोंड माझ्या निजायच्या खोलींत होतें; मग मी तें उघडल्यावर आपल्या खोलींत जातों. व तेंच तोंड शेतखान्याच्या गल्लींत मला फिरवितां येतें. या

पेटीची व्यवस्था कारागिरानें इतकी उत्तम साधली आहे कीं, ती पेटी भिंतींत आहे असें सहसा दिसण्यांत येत नाहीं. हें ऐकून मला जरा याच्या कृत्यांचा संशय आला होता ; पण तें जरी वाईट काम आहे तरी तें फक्त माझ्या भीतीकरितां आहे असें समजून मला त्याच्या कृतीचें कांहीं वेळानें कौतुकच वाटूं लागलें. मग त्यानें एके रात्रीं आपला विचार मला सांगितला कीं, आपण दोघे उघड प्रीति करूं, व जर आपल्या आईबापांस ती गोष्ट रुचली नाहीं तर मी निराळें घर करून राहीन, व संधि साधून आपण दोघें पळून जाऊं. या ह्याच्या विचारावर मीं पुष्कळ हरकती घेतल्या. पण त्याच्याशिवाय अन्य पुरुष मला भावाबापासमान आहेत म्हणून मीं त्याही कृत्यास होकार दिला. पुढें कांहीं दिवस लोटल्यावर हा माझा मित्र दुकानावर एकटा बसला असतां टपाल आलें. तें त्यानें घेऊन पत्रें फोडून सर्व व्यवस्था केल्या. आणि एक पत्र मात्र वाचून फाडून टाकलें. त्यांत असा मजकूर होता कीं, " मी फलाणा व्यापारी आपल्या पेढीवर १०,००० रुपयांचा भरणा करण्याकरितां नोटी घेऊन स्वतः येत आहें; करितां माझा हिशेब तयार ठेवावा. मी तावडतोब दुसऱ्या कामास मुंबईस जाणार आहें." हें पत्र यानें वाचून फाडून टाकल्यावर तात्या रामोशास साहाय्य घेऊन वाटेंत त्या गृहस्थाचा खून करून स्वारी लंबे झाली. ही गडबड मला मुळीं माहित नव्हती; पण मागाहून माझ्या प्रियकराकडूनच हा सर्व वृत्तांत कळला. खून

झाल्यावर तें प्रेत पोलिसांनीं पुण्यास आणलें. चौकशी होतां होतां तें पत्र सदाशिवानें वांचून फाडून टाकल्याचें पोलिसांस समजलें; तेव्हां पोलिस याचा शोध करूं लागले. आमच्या घरांत सर्व ठिकाणीं शोधून दारावर दोन शिपायांचा पहारा बसला. तेव्हां घरांतील सर्व माणसें घावरून गेलीं व सर्वांस त्यांतील अभिप्राय समजला; पण मला कांहीं समजेना. मी समजून घेण्याचा यत्न करीत असें तरी ती गोष्ट कोणीं मला सांगितली नाहीं. पण मीं एवढें ताडलें कीं, माझ्या सदाशिवावर कांहीं तरी गुन्हा आला असावा. रात्रीं मी आपल्या खोलींत तळमळत पडलें होतें. बारा वाजतां माझा जरा डोळा लागला तेव्हां सदाशिव माझ्या आंथरुणावर येऊन बसला आणि माझ्या केंसांवरून हात फिरवूं लागला; त्यासरशी मी जागी झाल्यें. पहात्यें तों माझा जिवलग घाबरलेला माझी भेट घ्यावयास आला आहे. मीं त्याला हें विघ्न काय आहे म्हणून विचारिलें, तेव्हां तो म्हणाला. माझे जिवलगे, मीं एका मनुष्याचा खून केला आहे. तें पोलिसांस कळलें आहे. माझ्या आणि तुझ्या वडिलांनीं मी घरीं असल्यास मला पोलिसांच्या स्वाधीन करण्याचा निश्चय केला आहे. तरी मी मोठ्या युक्तीनें येऊन तुला भेटलों, आतां माझें कांहीं झालें तरी हरकत नाहीं. हे शब्द त्याच्या तोंडचे निघतांना त्याच्या व माझ्या डोळ्यांतून पाणी वाहूं लागलें. [ व येथें सांगतांनाही सुंदराच्या डोळ्यांस पाणी आलें. तें सिंधूबाईनें एका स्वच्छ रुमालानें पुसलें. ]

सर्व हकीकत ऐकून घेतल्यावर मीं सदाशिवास ह्मटलें कीं, गांवाबाहेर जो रानडयांचा आगकाडयांत्रा कारखाना ओसाड पडला आहे तेथें जाऊन तूं लपून बैस. खाण्यापिण्याचा बंदोबस्त मी करीन. ही युक्ति त्याचेही मनास आली, आणि आम्हीं प्रेमाची गट्ट मिठी मारून एकमेकांच्या पाठी एकमेकांच्या अश्रूनीं भिजवून वियोगाचा अंगिकार केला. तो बाहेर जाऊन पुरतीं १० पळें झालीं नसतील इतक्यांत माझ्या दारावर बाबा हाका मारूं लागले. मी दार उघडून पहातें तों बाबा, सदाशिवाचा बाप आणि फौजदार हे तिघे दरवाज्यावर उभे. त्यांनीं मला त्याविषयीं कांहीं प्रश्न केला नाहीं; पण बाबा म्हणाले सुंदरे, तुला उद्यांपासून चार दिवस शाळेंत जावयाचें नाहीं. मीं रजा मागितली आहे. त्यावर मीं बरें म्हटलें, आणि ते सगळे निघून गेले. माझ्या खोलींत अडगळ नव्हती म्हणून त्यांस आंतही येण्याचें कारण पडलें नाहीं. त्यांच्या मागोमाग मी दार बंद करण्यास जात आहें; तों फौजदारानें आपल्या शिपायांस हुकूम दिला कीं, रानडयांचा आगपेटयांचा कारखाना ओसाड पडला आहे त्यांत बहुतकरून गुन्हेगार लपून बसतात तर तेथें जाऊन त्याचा आतांच्या आतां शोध करा.

हे शब्द माझ्या कानावर पडतांच माझ्या छातींत धस्स झालें. मी लागलींच उठून सदाशिवाच्या मागें सांगितलेल्या पेटींत बसून शेतखान्याच्या गल्लींत तिचें तोंड फिरवून जी तेथून धांवत सुटलें ती एका ता-

साचे आंत त्या ओसाड कारखान्यापाशीं जाऊन पोंचल्यें. सदाशिव सदाशिव अशा हळू हळू दोन तीन हांका मारतांच तो बाहेर आला व मला मिठी मारून म्हणाला लाडके, एवढ्या रात्रीं तूं येथें कशी आलीस? माझा जीव धांवण्यानें अगदीं थकला होता; तरी मीं अधिक कांहीं न बोलतां त्यास म्हटलें पळ, जा येथून. पोलिस येथें तुला शोधण्यास येत आहेत. हे शब्द उच्चारल्यावरोबर प्रेमजालांत आम्हीं न पडतां तो व मी बाहेर पडलों. मीं शहरचा रस्ता धरला व तो दुसऱ्या रस्त्यानें पळाला. मी अर्ध्या रस्त्यांत आलें तों ते चार पोलीसचे शिपाई यमदूतांसारखे मला वाटेंत भेटले. त्यांनीं मी कोण हें ओळखलें नाहीं तरी दरडावून तूं कोण आहेस म्हणून ते ओरडले. तेव्हां माझे पाय लटलट कांपूं लागले. व अंगास घाम सुटला. तोंडांतून शब्द येईना. तेव्हां त्यांतील एक शिपाई म्हणाला हे नूतन शिक्षणाचे परिणाम आहेत. या नव्या तरण्या पोरी आजकाल अशा रात्रीं अपरात्रीं खुशाल हिंडतात. जाऊंद्या तिला. तिच्याशीं आपलें काय काम आहे? तेव्हां एक शिपाई म्हणाला, कदाचित् त्यानेंच स्त्रीचें सोंग घेतलें नसेल कशावरून? म्हणून त्यांनीं मला मी खरोखर स्त्री कशी आहें तें सिद्ध केलें तर सोडूं. नाहींतर, चौकीवर नेऊन तिथें रात्रभर ठेवूं म्हणून सांगितलें. तेव्हां मीं म्हटलें माझ्या नाका कानाचीं भोंकें पहा, केंस पहा म्हणजे मी बायको आहें कीं पुरुष आहें तें तुम्हांस कळेल. तेव्हां, एकानें माझ्या कानावर चोर

दिव्याचा उजेड पाडून भोंकें व दागिने पाहिले आणि म्हणाला, तूं कां येथें आली होतीस ? म्हणून माझ्या तोंडांत अशी एक मारली कीं, तेणेंकरून मी लागलीच बेशुद्ध होऊन खालीं पडलें. त्यावर त्यांनीं मला उचलून एका दुकानावर आणून ठेवली व दुकानदारास मला सांभाळण्यास सांगितलें. तो गृहस्थ मला व आमच्या सर्व घराण्यास ओळखीत असे. त्यानें गाडी करून मला माझे घरीं आणून पोंचविली. घरीं आल्यावरोबर बाबांनीं डाक्तर बलाविला, व मला पहाण्यास सांगितलें. मी बिछान्यावर पडल्यें आहें, माझ्याजवळ आई बसली आहे, व खुर्चीवर डाक्तर व बाबा बसले आहेत, आईच्या डोळ्यांस पाणी आलें आहे, अशा वेळीं मी शुद्धींत आलें. तेव्हां डाक्तर म्हणाला कांहीं घाबरूं नका. ती फक्त कोठें भ्यालेली आहे.

बा०—अहो आतां आम्ही तिच्या खोलींतून येऊन पुरते दोन तास झाले नाहींत तों ही येथून कोसाच्या छटयावर पोलिसांस कशी सांपडली ?

ही कधीं पायीं गेलेली नाहीं, गेली असती तर घरांत कोणाला तरी खास विचारून गेली असती; तशांत दारावर पोलिसांचा पहारा आहे. ते घरांतील माणूस बाहेर जाऊं देत नाहींत, आणि एवढ्या अपरात्रीं जेव्हां एकाएकीं पोर इतक्या दूर सांपडली तेव्हां ही भूतचेष्टा नव्हे तर काय ? माझा भुतावर विश्वास नाहीं, पण असें अघटित कृत्य पाहिलें म्हणजे माझ्या मनाची स्थिति चमत्कारिक होते. हीं त्यांचीं भाषणें झाल्यावर मला सोडावाटरमध्यें घेण्यास एक औषध

देऊन डाक्तर निघून गेला. मला हा रुद्र [ हृद्रोग ] रोग जो लागला तो आतां कधीं जाणार नाहीं. मी पक्की समजून आहें कीं, या दुखण्यांतच माझा अंत होणार. कारण मीं जी प्रीति केली ती अयोग्यपात्रीं केली. तीच जर मीं आईबापांच्या सल्यानें केली असती तर मला खचीत सुपात्र पति मिळाला असता. पण मीं जें आपलें मन एकदां एका मनुष्यास अर्पण केलें तें केलेंच; त्यांत फरक होणार नाहीं. आणि त्याच्यापासून सुखाची यापुढें आशाही नाहीं. तो सांपडला तर फाशीची शिक्षा त्याला होईलच. नच सांपडला तर माझी भेट कशानें होणार ! भेट झाली तरी प्रसिद्धपणें लग्न तर होऊं शकतच नाहीं; मग माझें जिणें व्यर्थ नव्हे का ! यासाठीं मी तुला सांगत्यें, माझें झालें तें झालें; तूं तरी संभाळून रहा [ डोळ्यांस पाणी येतें ]

पुरुषांच्या स्वरूपाला लुब्ध होतां कामा नये. पुरुषांच्या रूपाची किंमत नाहीं. त्यांच्या गुणांची किंमत आहे. वर पाहतांना त्याचे गुण पाहतात. आणि वधूचें विशेषतः रूप पाहतात. यासाठीं तूं याच घरीं राहून अशींच दुःखें सोस. मला आराम पडो, न पडो; महिना पंधरा दिवशीं मी पुण्यास जाईन तेव्हां तुझ्याकरतां वर पाहण्यास बाबांस सांगेन. व ते हें काम मोठ्या खुषीनें करतील अशी मला उमेद आहे.

**सिंधू**—ही गोष्ट ऐकून बाई माझें काळीज जळून गेलें. ताई, तुझी त्या सदाशिवाशीं प्रीति जमली होती पण नवरेबायकोपणाचा जर कांहीं प्रकार घड-

ला नसेल तर नाहीं का तुझें लग्न होणार?

×-सुं०—अग रात्रीं वे रात्रीं जो येई तो नवरानायको च्या संबंधाशिवाय का? मी पापीण आहें ग! मला परलोकीं सुद्धां नर्कच मीं संपादून ठेवला आहे.· यापेक्षां मी तुला अधिक काय सांगूं. पण तुला उपदेश माझा जसा ठसेल तसा कोणा दुसऱ्याचा ठसणार नाहीं. ( सुस्कारा टाकते. ) ×

सिं०—मी तुझा फार उपकार मानतें. तूं आतां मला उपदेश केलास तो मी कधीं विसरणार नाहीं. ताई आज तूं अगदीं निजलीस नाहीं, नीज आतां.

सुं०—अग नीज कसली येते? एकदां ते विचार मनांत आले म्हणजे लवकर का जायचे आहेत ! ! मग त्यांनीं बोलणें बंद केलें; तेव्हां पहाटेस दोघींना जरा चुटका लागला.

दुसऱ्या दिवशीं नित्यक्रमाप्रमाणें दिवस निघून गेला. रात्रीं नारायणराव व लक्ष्मीबाई यांनीं नाटकास जाण्याचा बेत केला. नारायणरावास घरांत दुखणेकरीण पोर असतांना नाटकास जाणें योग्य नाहींसें वाटलें, पण लक्ष्मीबाईनीं फारच आग्रह केला. हातांत पैसा आला म्हणजे सगळीं ढंगे सुचतात. आजपर्यंत लक्ष्मीबाईनीं नाटक काळें कीं गोरें कधीं पाहिलें नव्हतें. पण आज तिला तें सुचलें. जेवणखाण आटोपल्यावर मथूला घेऊन नवराबायको निघालीं. जातांना वर जाऊन सुंदरास सांगितलें संभाळा, आह्मी नाटक आटोपल्याबरोबर परत येऊं. सिंधूला मावशी ह्मणाली, आह्मी येईपर्यंत तूं निजूं नको. सिंधू दरवाजा

लावून घेण्यास त्यांच्या बरोबर खालीं उतरली. यांच्या बरोबर नेण्यासाठीं नारायणरावांचे हातीं कंदील होता ह्मणून सिंधूनें दुसरा दिवा घेतला नाहीं. तीं माणसें बाहेर पडल्यावर सिंधू अंधेरांत दारास आंतून कडी लावून घेत असतां तिच्या खाकेंतून स्मरण–वही खालीं पडली, ती कडी लावल्यावर चांचपूं लागली पण तीस ती सांपडेना. तेव्हां ती म्हणाली, आतां ताई बहुतकरून झोंपीं जाईल आणखी एकाद दुसरी टिपण्या सारखी गोष्ट असेल तर ती ध्यानांत ठेवून हीं माणसें परत येतील तेव्हां वही शोधून मग टिपतां येईल; म्हणून ती वर जाऊन सुंदराबाईचे खाटेजवळ एका आराम खुर्चीवर बसली. (खुर्च्या व आरामखुर्च्या डाक्तराच्या सल्यानें आणल्या होत्या) दोघींनीं इकडच्या तिकडच्या गोष्टी चालविल्या आहेत इतक्यांत काळा पोषाग केलेला उंच पुरुष आंत आला. तेव्हां त्याच्यावर सुंदराची दृष्टि अगोदर गेली; त्याबरोबर तिनें किंकाळी फोडली कीं, माझ्या सदाशिवाचा घात करण्यास कारण जो तोच हा काळपुरुष. म्हणून तिनें जरी–तिला उठण्याचें सामर्थ्य नव्हतें–तरी त्वेषानें उठून त्याच्या कंबरेस मिठी मारली. त्याबरोबर त्यानें तिच्या पाठींत अशी जोरानें बुक्की दिली कीं, ती बहुतेक मेल्या सारखी होऊन खालीं पडली. ती खालीं पडल्याबरोबर त्यानें झटदिशीं दिवा फुंकला आणि सिंधूच्या मानेवर एक हात जोरानें मारून तिची मान घट्ट धरली आणि म्हणाला, तूं जी दोन लाखांची रक्कम आणली आहेस ती माझ्या स्वाधीन कर.

नाहीं तर सुंदरीसारखी तुझी अवस्था होईल.

सिंधू विचारी घांबरून गेली. तिच्या आंगांतून घामाच्या धारा सुटल्या. तरी तिनें प्रसंगावधान धरून त्याला म्हटलें, मीं आणलेलें द्रव्य माझ्या स्वाधीन नसून तें माझ्या मावशीपाशीं आहे.

चोर—बरें तें मी शोधून घेईन, पण तुला विनाकारण मारूं नये अशी मला तुजविषयीं कींव येते. तूं श्रीमान गृहस्थाची मुलगी असून येथें दासीप्रमाणें काम करतेस या तुझ्या सद्गुणाकरितां तुला मी जीवदान देईन; पण जर तूं माझ्या शर्ती शपथेवर कबूल करशील तर.

सिं०—हो, हो; प्राणापेक्षां अधिक प्रिय तें काय आहे ?

चो०—तूं कदाचित् माझें नांव या कारटीच्या तोंडून ऐकलें असशील व चेहराही ओझरता पाहिला असशील, याकरितां तूं हें कृत्य मीं केलें असें कोणास सांगतां कामा नये. आणि यदाकदाचित् मी पकडला गेलों, आणि तुला मला ओळखण्यास नेली तरी मला तूं ओळखतेस असें कबूल न केलें पाहिजे. तर तुला मी सोडतों.

सिं०—बरें मी नाहीं कोणाला सांगणार.

चो०—शपथ घे.

सिं०—देवाची शपथ मी तुझें नांव सांगणार नाहीं. हें ऐकून तात्यारामोशी खालीं उतरला आणि सर्व माल शोधून साथीदारांसह बाहेर पडला.

तो खालीं गेलेला पाहून सिंधूनें काडी ओढून

पुन्हां दिवा लावला व सुंदराबाईला उचलून खाटेवर ठेविली; तिच्या डोळ्यांस पाणी लावलें आणि वारा घालीत दुःखित मुद्रेनें तिच्याकडे पहात बसली आहे; इतक्यांत तशा वेदनांत सिंधूच्या गळ्यांत हात टाकून सुंदरानें तिचें आलिंगन केल्यासारखें केलें. तें पाहून सिंधूनें सुंदराचे मुके घेऊन तिचे केंस नीट केले आणि तिची नाडी पाहूं लागली. नाडी चालत होती पण तिची दांतखिळी बसली व डोळे फिरूं लागले. घरांत दुसरें कोणी नाहीं. प्रसंग बिकट तरी ती धैर्य धरून एकटी आपल्या वहिणीजवळ बसली आहे; इतक्यांत तिनें प्राण सोडल्याचीं चिन्हें सिंधूस दिसलीं. तेव्हां ती मोठमोठ्यांनीं रडूं लागली. पहांटसे चार वाजतां नारायणराव व लक्ष्मीबाई हीं दोघेजणें घरीं आलीं ! पहातात तों दरवाजा उघडा. तेव्हां नारायणराव घांबरले; पण लक्ष्मीबाई ह्मणाल्या, त्या कारटीनें उघडला असेल. ते प्रथम इकडे तिकडे न जातां लक्ष्मीबाईसह या खोलींत माडीवर आले तेव्हां त्यांना सर्व वर्तमान कळलें.

हें वर्तमान कळल्यावर मग लक्ष्मिबाई त्या ! ! प्रथम त्यांनीं जाऊन सिंधूच्या तोंडांत अशा भडकावल्या कीं, त्या त्यांच्या हातास आणि सिंधूच्या गालासच माहित. आणि मग आक्रोश आणि शिव्या यांचें तें वसतिस्थानच झालें. सकाळीं आळींतील मंडळी आली व हा प्रकार गांवभर प्रसिद्ध झाला. नारायणरावांनीं पोलिसासही या चोरीचा रपोट केला.

आतां ह्या चोराचा या घरांत प्रवेश कसा झाला ही शंका आहे; त्यास, रात्रीं नऊ वाजतां नारायणराव व लक्ष्मीबाई बाहेर जाण्यापूर्वींच चोर येऊन दरवाज्यामागें जमिनीबरोबर असलेल्या कोनाड्यांत येऊन बसला होता. हा कोनाडा घराचा दरवाजा उघडला ह्मणजे बंद होई व दरवाजा लावला ह्मणजे उघडा पडे. दरवाजा उघडा असतांना कोनाड्यांतील चोर कोणांस दिसला नाहीं व दरवाजा लावला तेंव्हां तेथें अंधार होता यामुळें तो सिंधूबाईचेही दृष्टीस पडला नाहीं. सिंधूबाईच्या खांकेंतून पडलेली वही जी तीस सांपडेना ती पडतांच या चोरानें उचलली होती.

पहांटेस प्रेतदहनाची व्यवस्था करण्यापूर्वींच नारायणरावांनीं या दुःखद वर्तमानाची तार पुण्यास सुंदराचे पालक बापास पाठविली, व त्यानें परत तार पाठविली कीं मी प्रेत नेण्यास येत आहें. तिचा अखेर संस्कार तरी माझ्या हातून घडो. व त्याप्रमाणें तो गृहस्थ निघालाही होता; ह्मणून प्रेत तसेंच घरांत ठेवण्यांत आलें. त्याशिवाय मोहल्यांतील मंडळीसही आपघातानें सुंदरा मेली असल्यामुळें प्रेत–संस्कार विचारल्या पुसल्याशिवाय करणें प्रशस्त वाटलें नाहीं. अशा विचारांत मंडळी आहे तों एक पोलिस अंमलदार. तेथें आला त्याला नारायणराव आंत घेऊन गेले. त्यानें सिंधूबाईच्या हातांतून पडलेली स्मरणवही बरोबर आणली होती.

ती वही कोणाची ह्मणून त्या अंमलदारानें पाहि-

ला प्रश्न केला. त्यावर नारायणराव ती वही आपली आहे असें म्हणाले. तेव्हां कालच्या तारखेचा लेख कोणाचा असल्याचें विचारलें. तेव्हां तो सिंधूच्या हातचा आहे म्हणून नारायणरावानीं सांगितलें. तेव्हां सिंधूस बोलावली.

**पोलिस अंमलदार**—सिंधूबाई तुमचेंच नांव काय ?

**सिं०**—हो.

**पो०अ०**—हें हस्ताक्षर तुमचेंच का ?

**सिं०**—होय.

**पो०अ०**—हें तुम्हीं केव्हां लिहिलें आहे ?

**सिं०**—काल रात्रीं.

**पो०अ०**—ही वही तुमच्या ताब्यांतून केव्हां गेली आणि कशी ?

मी दाराला कडी लावण्यासाठीं खालीं उतरलें, तेव्हां स्मरणवही माझ्या हातांत होती ती दारास कडी लावतांना मीं कांखेंत धरली पण ती खालीं पडली. कडी लावल्यावर मीं अंधेरांत आसपास चाचपून पाहिली तरी सांपडली नाहीं. ती मी ही आतां तुमच्या हातांत पहात्यें.

**पो०अ०**—मग तुम्ही रात्रीच्या चोरास ओळखाल काय ?

**सिं०**—नाहीं. मी त्यास नीटपणीं पाहिला नाहीं.

**पो०अ०**—नीटपणीं जरी तुम्हीं त्याला पाहिला नाहीं तरी ही वही त्यानें नेली हा संशय तर खरा ना?

सिं०—कदाचित् तसें असेल.

पो०अ०—मग तुम्हांस जर आम्ही तो मनुष्य दाखविला तर तुम्ही न्यायाधीशास हाच तो मनुष्य एवढें सांगाल ना ?

सिं०—ओळख जर नसेल तर तसें सांगणें माझ्यानें होणार नाहीं.

पो०अ०—बरें, त्याची व्यवस्था करतां येईल. पण तुमची साक्ष मोठी महत्वाची आहे. जर तुम्हीं कानांवर हात ठेवले तर आमच्यानें ही चोरी पकडवणार नाहीं.

पो०अ०—एवढीं भाषणें करून नारायणरावांस बरोबर घेऊन गेला. लक्ष्मीबाई सिंधूचीं भाषणें ऐकत होती ती सिंधूपाशीं येऊन म्हणतेः—कारटे ! अजून देखील का तूं आमचा सूड उगवणार ! ! पोरीला मारवलीस, घरांत चोरी करवलीस आणि चोरांची ओळख सांगायची तीही पण तूं नाहीं म्हणून त्या मोठ्या कामगाराला साफ सांगितलेंस. मी तुला निक्षून सांगतें कीं, जसें आम्ही सांगूं तसें तूं कचेरींत बोल. जो चोर पकडला आहे तो तूं जरी पाहिला नसलास तरी तो तोच आहे म्हणून तुला सांगितलें पाहिजे; नाहींतर मग तूं आहेस आणि मी आहें.

थोड्या वेळानें सुंदराचा पालक बाप पुण्याहून आला होता त्यास घेण्यास नारायणराव फौजदारासह गेले होते, ते तिघेही पावणे अकरा वाजण्याचे सुमारास घरीं आले. व प्रेत पुण्यास नेण्याकरितां स्टे-

शनावर नेलें. तेव्हां रितीप्रमाणें रडारडी व्हावयाची ती झालीच, पण सिंधूला आपला आधार तुटलासें वाटून मोठें रडें कोसळलें तें आंवरतां आंवरेना. शेवटीं प्रेत एकदांचें बाहेर काढलें. प्रेत गेल्यावर तें घर कांहीं वेळ शून्यवत् भासूं लागलें. माणसें आपापल्या दुःखांत बसलीं होतीं ह्मणून स्वयंपाकपाण्याकडे कोणी लक्ष्य दिलें नाहीं. पण शेजाऱ्यांनीं अन्न आणून त्या घरांतील माणसांस खाण्याचा आग्रह केल्यावर जेवणें उरकलीं.

दुपारून नारायणरावांकडून वकीलपत्र घेण्यास चार पांच वकील आले; पण याजपाशीं पैसा नसल्यामुळें त्यांस वकीलपत्र द्यावयाचें त्यास धाडस करतां येईना. शेवटीं लक्ष्मीबाईनें वकील लोकांस सांगितलें जर आमचा माल आमचे हातीं आला तर आम्ही तुमची फी देऊन बक्षीसही देऊं; नाहींतर फिर्यादीस लागणाऱ्या तिकिटांसहित सर्व खर्च तुम्हांस करावा लागेल. या शर्तींवर एक वकील वकीलपत्र घेण्यास राजी झाला व तें त्याच बैठकीस घेऊनही गेला.

या वकिलानें मुकदम्याचें स्वरूप सर्व जाणून नारायणरावांच्या गृहस्थितीची माहिती मिळविली. त्यांत त्याला दिसून आलें कीं, मुख्य साक्षीदार जी सिंधूबाई हिला लक्ष्मीबाईचा फार जाच आहे, यामुळें ती पोर वेळेवर काम फसवील. म्हणून थोड्या वेळानें वकील पुन्हां नारायणरावांकडे येऊन त्यानें सहकुटुंब नारायणरावांनीं येऊन माझ्या घरीं

रहावें व सिंधूस वाटेल तसें राहूं द्यावें, तिची मुलीं-शीं खेळण्याची इच्छा असल्यास आमच्या घरीं सोय आहे. एकांतीं बसण्याचें तिच्या मनांत असल्यास तसें होईल, व वाचनालेखनाकडे तिचें लक्ष्य असेल तर पुस्तकें पुष्कळ आहेत, असें सुचविलें. ती गोष्ट नारायणरावांसही मान्य झाली, व लौकरच ही सर्व मंडळी गाड्या करून त्या वकिलाकडे गेली. तेथें एका खोलींत या सर्वांचे बिऱ्हाडाची सोय करून रस्त्याच्या बाजूचा एक दिवाणखाना सिंधूच्या स्वाधीन केला. त्यांत पुस्तकांचीं कपाटें गच्च भरलेलीं होतीं. एक मध्यभागीं टेबल असून त्यावर मराठी व इंग्रजी वर्तमानपत्रें व मासिकपुस्तकें पडलीं होतीं. टेबलासभोंवार निरनिराळ्या तऱ्हेच्या खुर्च्या मांडल्या होत्या. या खोलींत लक्ष्मीबाईनीं जाऊं नये अशी वकिलानें नारायणरावांस ताकीद केली होती. सिंधूस पाहिजे तिकडे घरभर फिरण्यास मोकळीक होती, तरी ती जेवणाच्या वेळाशिवाय सर्व दिवसभर कांहीं वाचीत किंवा कांहीं लिहीत आपल्या दिवाणखान्यांतच बसे.

असे दोन दिवस गेल्यावर दुपारीं वकील, नारायराव व लक्ष्मीबाई सिंधूच्या दिवाणखान्यांत आलीं. वकिलानें एक कोर्टाचा नकाशा आणला होता तो टेबलावर ठेवून सिंधूस जवळ बलाविली आणि बोटानें नकाशा दाखवून बोलूं लागला. सिंधूबाई, हें कोर्ट आहे. ( बोटानें ) येथें वकील लोक बसतात, साक्षिदारांची जागा ही. गुन्हेगार या पिंजऱ्यांत उभा रा-

हतो. ती उंच खुर्ची न्यायाधिशाची. तेथें जज्जसाहेब बसतात. व हीं न्याय पहाण्यास आलेल्या लोकांस बसण्याकरितां बाकें ठेविलीं आहेत. तुम्हास येथें उभें रहावें लागेल, व मी येथें. मग मी प्रश्न करीनः— "हा मनुष्य (पिंजऱ्यांतील) तुमच्या ओळखीचा आहे? असेल तर कोर्टास तसें सांगा." मग तुम्हीं म्हणावें:—हो, हा मनुष्य मी ओळखतें."

मग मीं म्हणेन—तुमची व याची ओळख केव्हां व कशी पडली?

त्यावर तुम्हीं म्हणा, "माझ्या घरीं २७ तारखेस रात्रीं हा चोर चोरी करण्यास आला होता व यानें माझ्या वहिणीचा खून केला."

यानंतर न्यायाधीश किंवा दुसरा वकील जर तुम्हाला याविषयीं आडवे तिडवे प्रश्न करील तरी तुम्ही न डगमगतां आपलें म्हणणें कायम ठेवा. समजल्यातना मीं काय सांगितलें तें?

**सिंधू**—आपलें बोलणें मी सर्व समजल्यें. पण ओळख जर न पटेल तर तो मनुष्य मी ओळखत्यें असें कोर्टास माझ्यानें सांगवणार नाहीं.

**लक्ष्मीबाई**—पहा, पहा कशी द्वाड आहे ती!

**वकील**—(लक्ष्मीबाईस)बाई, तुम्ही अगदीं बोलूं नका. मला जें काय शिकवायचें आहे तें मी शिकवीन. तेव्हां त्या चूप राहिल्या.

**नारायणराव**—बाळ्ये सिंधूबाई, आम्हीं तुला छळली म्हणून का तूं असें आमच्या नुकसानीचें वर्तन करणार? पण याउपर मी तुला म्हणून अगदीं त्रास

होऊं देणार नाहीं. हें काम सर्वस्वीं तुझ्यावर अवलंबून आहे, याकरितां आतां लाज राखणारी तूं आहेस. ( नारायणरावांच्या डोळ्यांस पाणी येतें. )

**सिंधू**—काका, डोळ्यांस पाणी आणायास नको. माझा हेतु आपलें नुकसान करण्याचा नाहीं; पण पोलीस खोटे मुकदमे तयार करून एकाद्या गरिबास फाशीं देववितात तसा प्रकार माझ्या साक्षीनें न होवो म्हणून मी जपतें.

हे शब्द ऐकून वकिलास अतिशय आनंद झाला:–तो नारायणरावांस म्हणाला:—नारायणराव, आपली भाची फार चतुर आहे. तिला आतां शिकविण्याचें कांहीं कारण नाहीं. ती योग्य तें सांगण्यास भिणार नाहीं व जो पकडलेला मनुष्य मीं पाहिला आहे तोच खरोखर चोर आहे अशी माझी व सर्वांची खात्री झाली आहे. मग सिंधूस वकील म्हणतो—तो मनुष्य उंच गोरासा असून त्याचे डोळे जरा घारे आहेत. व पिंजऱ्यांत त्याच्याशिवाय दुसरा कोणी नसायचाच या खुणांनीं तूं एक वेळ त्याला निरखून पहा आणि जबानी दे.

**सिंधू**—बरें.

यानंतर सिंधूस सोडून सर्व माणसें बाहेर पडलीं. पण मावशीनें जातां जातां डोळे फिरविलेले सिंधूनें पाहिले.

हीं माणसें जाऊन सुमारें अर्धा तास झाला तों एक भिकारी तेथें आला. त्याला नेसायला एक लंगोटी असून आंगावर दुसरें वस्त्र नव्हतें. त्याची आ-

शेळी ऐकून सिंधू खिडकीजवळ गेली, पण तिजपाशीं त्यास द्यावयास कांहीं नव्हतें. त्याच्या कांखेंत दगड बांधलेला एक लाखोटा होता तो त्यानें सिंधूच्या खोलींत टाकला. तो तिनें उचललेला पाहून तो भिकारी एकदम पळत सुटला तो पहातां पहातां नाहींसा झाला.

सिंधूला या गोष्टीचा विस्मय वाटला. तिनें लाखोट्याचा खडा सोडून टेबलावर ठेवला व लाखोटा फोडून पत्र काढलें तें बालबोध सुवाच्य अक्षरांनीं लिहिलें होतें. त्यांत असा मजकूर होता कीं, मी तात्या रामोशी ज्यानें नारायण सखारामाकडे चोरी करून सुंदराचा खून केला तो पोलिसांच्या हातीं सांपडलों आहें, मीं चोरलेल्या मालाचा अद्याप पोलिसास पत्ता लागला नाहीं, पण तुझी स्मरणवही मजपाशीं पोलिसांस सांपडली. त्यावरून त्यांनीं मला पकडला आहे. जज्जाचे कोर्टांत उद्यां मुकदमा सुरू होईल तर आतां माझें जीवित्व केवळ तुझ्या हातीं आहे. तूं मला शपथ घेऊन जें वचन दिलें आहेस तें कायम ठेव. एवढें तुजपाशीं पुन्हां मागणें आहें. या पत्राचे खालीं "तुझा प्राणदाता तात्या" अशी सही होती.

सिंधूनें चांगलें मनन करून तें पत्र दोनदां वाचलें आणि तें फाडून त्याचे लहान लहान तुकडे करून ते मोरींत टाकून त्यावर तांब्याभर पाणी ओतलें, ज्या योगें सर्व तुकडे झांकलेल्या गटारांत गेले. दगड उचलून बाहेर टाकला आणि एका आराम खुर्चीवर त्या पत्रांतील मजकुरावर विचार करीत पडली आहे इतक्यांत एक दोन घोड्यांची गाडी तिच्या खिडकी-

खालीं येऊन उभी राहिली. सिंधू गाडीचा आवाज ऐकून पुन्हां खिडकीजवळ गेली आणि पहाते तों एक गृहस्थ गाडींतून उतरला. ( हाही एक मुंबईचा जाडा वकील होता. ) त्याचा सर्व पोषाग इंग्रजी पद्धतीचा असून डोक्यास पागोटें मात्र दक्षिणी होतें. डोळ्यांस आरशी लावली होती. त्यानें प्रश्न केला नारायण सखाराम येथें राहतात काय? तेव्हां शेजारचा एक मनुष्य दारावर उभा होता तो म्हणाला हो, पण ते आणि वकील साहेब नुकतेच बाहेर गेले आहेत.

**वकील**—बरें, त्यांच्या घरीं सिंधूबाई म्हणून एक मुलगी रहाते तिची आमची गांठ पडेल का?

**शे०**—ती सिंधूबाई खिडकींत उभी आहे. हें ऐकून वकील एकदम जिना चढून सिंधूच्या दिवाणखान्यांत आले. तेव्हां सिंधू एका बाजूस जाऊन उभी राहिली.

**वकील**—सिंधूबाई तुमचेंच नांव काय?

**सिंधू**—हो.

**व०**—तुमच्या घरीं चोरी झाली त्याची हकीकत तुम्हांस माहित असेलच.

**सिंधू**—होय.

**व०**—मी तुमच्याशीं चार गोष्टी बोलण्यासाठीं आलों आहें. तुम्ही या अशा पुढें आणि बसा खुर्चीवर. संकोच धरूं नका, तुम्ही मला कन्येसमान आहां. तरी सिंधू अगदीं जवळ न येतां टेबलाच्या दुसऱ्या बाजूस उभी राहिली. तेव्हां वकिलानें एक मोठें जज्ज कोर्टांतील देखाव्याचें हुबेहुब काढलेलें चि-

त्र नेऊन सिंधूपाशीं जाऊन टेबलावर त्या चित्राची वळकटी उलगडली. आणि म्हणालाः उद्यां तुमचा मुकदमा या कोर्टांत होईल तेव्हां तुम्हीं कसकशी जबाबांची योजना केली आहे ती सांगा पाहूं.

**सिंधू**–जी वेळेवर सुचेल ती योजना.

**वकील**–नाहीं पण तुम्हांस कसकसें शिकविलें आहे व तुम्ही कसकसें बोलणार तें तर कळूं द्यां.

**सिंधू**–आधीं तुम्ही कोण, येथें कां आलां आणि एकदम मुकदम्याच्या गोष्टी मजपाशीं कां काढल्या हें मला कळल्याशिवाय मीं माझ्या गोष्टी कां सांगाव्या !

**वकील**–शाबास मुली ! आहेस चतुर. मी बाई वकील आहें. आणि तात्या रामोशाकडून मीं वकीलपत्र घेतलें आहें. तुझी साक्ष काय ती या खटल्यांत महत्वाची आहे, ती कशी पडते हें पहायास मी आलों आहें. जसा तुझ्या बोलण्याचा रोंख असेल, तसा कज्जा मला तयार करावा लागेल. यासाठीं काय काय जबान्या पाठ केल्या असशील त्या म्हणून दाखीव पाहूं.

**सिंधू**–मीं कांहीं जबान्या पाठ केल्या नाहींत पण पिंजऱ्यांत असलेला घाऱ्या डोळ्याचा उंच माणूस हाच चोर असें कोर्टास सांगण्याचें माझें काम आहे.

**व०**–तूं त्याला चांगला ओळखतेस का ?

**सिंधू**–मीं त्याला त्या रात्रीं ओझरता पाहिला आहे.

**व०**–बरें, तुम्हीं त्याला कांहीं वचन दिलें होतें का?

सिंधू—हो.

व०—बरें तर, तें वचन आणि तुम्हीं घेतलेली शपथ पाळण्याचें तुमच्या मनांत आहे कीं नाहीं ?

सिंधू—तें मी सांगूं शकत नाहीं.

वकील—शपथ सहसा भल्या माणसानें घेऊं नये आणि घेण्याचा प्रसंग येऊन जर ती घेतली तर ती प्राण गेला तरी राखावी.

सिंधू—गोष्ट खरी पण कोर्टांत ईश्वरास स्मरून मी सर्व खरें सांगेन. जें म्हणणें म्हणावें लागतें ती शपथ नव्हे का ? मग एक शपथ राखावी तर दुसरी मोडते.

व०—पहिली शपथ महत्वाची असते. जर तुम्ही शपथ मोडाल असें त्यास कळलें असतें तर त्याचा परिणाम काय झाला असतां हें तुम्हीच विचार करून समजा.

सिंधू—पण चोरांस वांचविण्यासाठीं न्यायासनासमोरची शपथ मोडावी आणि त्यांची राखावी हा न्याय का ? सद्गुणी मनुष्यासाठीं कोर्टाची शपथही मोडली तरी त्यांत विशेष वाईट नाहीं; पण खुनी मनुष्य वांचविण्यासाठीं असें दुर्घट कर्म मीं कां करावें ? जर चोरांत कांहीं सद्गुण असतील तर मला सांगा.

व०—सर्व सद्गुण कोणांतच नाहींत मग चोरांत ते कोठून असतील ? जगांतील प्रत्येक मनुष्य चोर आहे, प्रत्येक खुनी आहे, प्रत्येक लबाड आहे, पण सर्वांना लोक चोर, खुनी किंवा लबाड मानीत मात्र नाहींत; बाकी ते दोष प्रत्येकांत आहेत असें विचारी मनुष्य कबूल करील. चोरीचे पेशे करणारे बिचारे बरे, ते

पकडले तरी जातात, पण दुसरे धंदे करून चोरी क-रणारे वाईट. ते पकडले जात नसून त्यांच्या चोऱ्या जन्मभर सारख्या चाललेल्या असतात. आतां दूरचें उदाहरण नको तुमच्या मावशीबाईच घ्या. यांनीं तुमच्या द्रव्याचा अभिलाष केलाच होता कीं नाहीं? (हे शब्द ऐकून सिंधूबाई चकित झाली आणि मध्येंच म्हणाली. ही गोष्ट तुम्हांस कशी कळली ) व तेंही तुम्हास मीं सांगितलें असतें पण तुम्हीं मध्येंच आठवण केलीत याकरितां तें आधीं सांगून पुढें माझा विषय मी चालवीन. लक्ष्मीबाई समजते कीं आपण जें द्रव्य गट्ट केलें, त्याविषयीं चकार शब्द बाहेर फुटला नसेल पण ती गोष्ट गांवभर लोक बोलत आहेत. आपले अवगुण आपल्यास कळत नाहींत, पण बाहेर त्यांची विपूल चर्चा चालली असते. असो. बरें दोन लाखांचा अभिलाष केल्यावर तरी खूष होऊन रहायचें होतें, पण ती सुंदरा आली तिच्या खर्चापैकींही रुपये काढण्याचा तिचा बेत होता.

नारायणराव तिचा नवरा हा गोड बोलतो ह्मणून तुम्हास चांगला वाटत असेल; पण तो द्रव्य-लोभानेंच आपल्या बायकोप्रमाणें बोलतो. नाहींतर त्यानें तुझें धन त्यांकेंत ठेवलें असतें तर नसतें का चाललें? पण त्याच्या मनांत असें होतें कीं, बायकोच्या दुष्टस्वभावामुळें माझे अपराध लोकांस न दिसतां माल आपल्या हातीं येईल. या माणसांनीं चोरीची चोरी करून पुनः तुमच्यावर त्यांचा राग आहे तो आहेच. यापेक्षां पेशेवाला चोर बरा नव्हे का, जो चोरी करून

निघून गेला, पुढें तरी त्याचा त्रास नाहीं.

**सिंधू**—ही एका व्यक्तीची गोष्ट झाली; प्रत्येक मनुष्य चोर म्हणून जें आपण बोलला तें कोणत्या आधारानें ?

**व०**—मोठे मोठे कामगार लांच खातात, व्यापारी गिऱ्हाइकांस फसवितात, राजा प्रजेच्या पैशावर आपलीं सोयरींधायरीं व इष्टमित्र पोसतो व प्रजेवर अधिकाधिक कर बसवून त्या प्रजेला लुबाडतो, साधूसंत म्हणविणारे नाना तऱ्हेच्या खोट्या थापा देऊन लोकांस फसवितात. मिळून दुनियेंत एकमेकांस फसविण्याचाच रोजगार चालू आहे. तरीहि या धंदेवाल्यांस पकडून शिक्षा देण्याचा यत्न कोणी करीत नाहींत.

दुकानावर गेलें म्हणजे दुकानदार एका रुपयाच्या जिनसेस दोन रुपये सांगतो व गिऱ्हाइकानें दोन रुपये दिले तर ते खुषीनें घेतो. गिऱ्हाईक दीड देण्यास राजी असल्यास तेवढेच तो घेतो व एक रुपयासही ती जिन्नस देतो, तर ही चोरी नव्हे का ? अशाच सर्व गोष्टी समजाव्या.

**सिंधू**—आपण फार वेळ येथें बसूं नये अशी माझी आपल्यास विनंति आहे. कारण वकील येथें येण्याची वेळ झाली आहे.

**व०**—बरें ही तसबीर तुमच्या ध्यानांत आलीना ?

**सिंधू**—हो.

**व०**—न्यायाधीश, मी, किंवा दुसरा वकील जर तुम्हास प्रश्न करील कीं तुमच्या घरीं चोरी केलेला

चोर तो हाच का? तर तुम्ही हा नव्हे एवढें सांगाल तर बरें होईल.

**सिंधू**–धडधडीत खोटें बोलणें माझ्यानें होईलसें वाटत नाहीं.

**व०**–बरें त्याची व्यवस्था मी करीन. जेव्हां मघां सांगितलेला प्रश्न तुम्हांस कोणी करील तेव्हां तुमच्या व त्या चोराच्या मध्यें मी एक मनुष्य उभा ठेवण्याची व्यवस्था करीन. प्रश्न विचारतांच तुम्हीं पिंजऱ्याकडे पाहिलेंत म्हणजे तो माणूस तुमच्या नजरेआड येऊन तुम्हास चोर न दिसतां आमचा माणूस दिसेल. व लागलींच आपण न्यायाधिशाकडे नजर फिरवून तो हा मनुष्य नव्हे एवढें म्हणावें म्हणजे झालें.

**सिंधू**–बरें पहातां येईल.

**वकील**–"बरें पहातां येईल" नाहीं कामाचें. तें काम मी करीन किंवा करणार नाहीं. असें मला स्पष्ट सांगाल तर मुकदम्यांतील प्रश्न मी त्या धोरणावर तयार करून ठेवीन.

**सिंधू**—तसें मी स्पष्ट सांगू शकत नाहीं. पण तुमचा उपदेश मला बरा वाटला आहे. पण एका गोष्टीचा खुलासा आपण सांगाल तर मी आपली आभारी होईन. आपण प्रत्येक मनुष्य खुनी आहे, असा सर्वांवर आरोप आणलात त्याचें प्रतिपादन करावें.

**व०**–ढेंकूण, पशु, पक्षी हे सुद्धां मनुष्याप्रमाणें प्राणी आहेत; ते आपल्या पिलांवर माणसांप्रमाणें प्रेम करतात. त्यांना मनुष्याप्रमाणें आहार, निद्रा,

भय, मैथुनादि विकार आहेत. त्यांच्यांत एकी आढळते. मुंग्या, मेंढरें वगैरे प्राण्यांची एकी तर स्पष्ट दृष्टिगोचर होते. मग त्या प्राण्यांस आपल्या पोटासाठीं, सूड उगविण्यासाठीं, किंवा केवळ गमतीकरितां मारणें खून नव्हेत का ? मनुष्याचे सुद्धां सवड झाल्यास खून करण्यास माणसें कमी करीत नाहींत; पण समाजाच्या, धर्माच्या, व राजपद्धतीच्या प्रतिबंधामुळें त्यांस सवड सांपडत नाहीं.

सिंधू—त्यानें विनाकारण माझ्या वहिणीस मारली व मलाहि मानेवर इतकी जोरानें थप्पड मारली कीं, मी त्या वेळीं अगदीं घांवरून गेल्यें. यांतील त्याचा अभिप्राय काय असावा ?

व०—चोर जेव्हां घरांत शिरतात तेव्हां जें जें घरांतील मनुष्य त्यांस आढळतें त्यांस एकेक थप्पड किंवा बुक्की त्यांस मारावीच लागते. तसें न केलें तर माणसें न घांबरतां त्यांना पकडण्याच्या युक्त्या लढवितील, त्यांच्या आंगावर चालून जातील, अगर शेजाऱ्या पाजाऱ्यांस हाका मारतील. पण अशी थप्पड किंवा बुक्की मारल्यानें माणसें घांवरून त्यांना कांहीं सुचत नाहीं असें होऊन तीं जागच्याजागीं थिजतात. तेणेंकरून त्यांस आपल्या कामास फुरसत सांपडते व घरांतील अशा भ्यालेल्या माणसांकडून त्यांस धन शोधण्यास थोडीबहुत मदतही होते.

हे शब्द सिंधूनें ऐकून तीस हांसूं आलें, आणि तिच्यावरोवर वकीलही हांसत हांसत वर उठले, आणि जातांना संभाळाहो म्हणून बाहेर पडले.

पुनः सिंधूबाई खुर्चीवर या गोष्टीचा विचार करीत थोडा वेळ बसली आणि तिनें शेवटीं निश्चय केला कीं, या चोरास आपल्या शपथेच्या पालनार्थ बचवावा. मला त्यानें ठार केली असतीं तर तो बचताच. हा विचार झाल्यावर तिनें एक वर्तमान पत्र टेबला-वरून उचलून वाचूं लागली. त्यांत प्रथम दर्शनीं एक जाहिरात तिचे दृष्टीस पडली. त्या जाहिरातीचे डो-क्यावर ' पाहिजे ' अशीं मोठीं अक्षरें असून मजकूर काय तो तीन चार ओळी होता. तींतील आशय मु-लांचें संगोपन करणारी स्त्री पाहिजे, ज्या बाईची इच्छा अशी नोकरी करण्याची असेल तिनें माधवराव पाटणकर यांच्या पत्नीस त्यांच्या घरीं घर नंबर ११७ येथें भेटावें.

ही जाहिरात पाहिल्यावर सिंधूबाईचे मनांत आलें कीं, जर मीं मावशीच्या प्रतिकूल साक्ष दिली तर मला त्या घरांतून हाकून देतील, त्या अर्थीं ही नोकरी आपल्यास मिळाली तर बरी. म्हणून तिनें जाऊन वकिलांच्या पत्नीस विचारलें कीं, मला एका बाईला भेटायास जावयाचें आहे. जर आपण मनुष्य बरोबर द्याल तर आतां जाऊन येईन-

**वकिलाची पत्नी**—कोणास भेटायाचें आहे, तें तर कळूंद्या.

**सिंधू**—रमाबाई पाटणकरणीस. ( हे गृहस्थ श्री-मान असून नामांकित असल्यामुळें या बाईस माहित होते. )

**व०–प०**—बरें माझी सखूताई तुझ्या बरोबर येई-

ल आणि गडी देतें झालेंना ?

सिंधू—मेहेरवानी आपली.

लागलींच वकील पत्नीनें सखूताईस ( आपल्या मुलीस ) हाक मारून गडी बरोबर देऊन यांस पाठविल्या. त्या घरीं गेल्यावर यजमानणीस कळतांच ती पुढें होऊन यांस आंत घेऊन गेली.

रमाबाई—कांग सखूताई आज कोणीकडे वाट विसरलीस ?

सखू०—आमच्या सिंधूबाई म्हणाल्या त्यांना तुम्हाला भेटायाचें आहे. म्हणून आईनें दोघींस पाठविल्या.

रमा०—बरें केलेंत दर्शन दिलेंत.

सिंधू कांहीं विशेष मजकूर बोलेना म्हणून सखूनें ताडलें कीं, हिला कांहीं गुप्त गोष्ट बोलावयाची असेल म्हणून ती रमाबाईस म्हणाली. मला आजीबाईस भेटायाचें आहे मी जाऊन येतें म्हणून ती रमाबाईची सासू परसांत होती तिकडे निघून गेली. ती निघून गेल्यावर सिंधूनें आपला विषय काढला. त्यावर रमाबाई म्हणाल्या तुम्ही अशी नोकरी कां करणार ? या कजाग मावशीकडे तुम्ही आहां हेंही आम्हास बरें वाटत नाहीं. मग अशी नोकरी तुम्हास करावी लागावी आणि आम्हीं पहावें हें ठीक नाहीं. तुम्हीं जरी आम्हाला ओळखीत नाहीं, तरी तुमच्या मातुश्री सगुणाबाई या घराण्याशीं सलूख ठेवीत असत. आम्हीही कांहीं दिवस कराचीस तुमच्या घरांत राहिलेलीं आहोंत. ज्या दिवशीं तुम्हास नारायणरा-

वांचें घर सोडणें असेल त्या दिवशीं मला निरोप पाठवा म्हणजे मी गाडी पाठवून तुम्हास आणवीन.

आपण जी जाहिरात वाचलीत ती खोटी नाहीं. एक म्हातारी बाई माझ्या मामाच्या घरीं मुंबईस पाहिजे आहे; त्यासाठीं मींच ती जाहिरात दिली होती. पण मी तुम्हांस लग्न होईपर्यंत कांहीं काम करून न घेतां वहिणीप्रमाणें पाळीन. त्यांत मला श्रेयच आहे. सिंधूनें रमाबाईचे आभार मानून सखूताईस हाक मारली. व रमाबाईचा निरोप घेऊन गड्याबरोबर दोघी निघाल्या.

**रमा०**--गाडींतून पोंचत्या केल्या असत्या; पण गाडी घेऊन फिरावयास जायचें झालें आहे. अम्मळ बसाल तर गाडी येईल.

**सखू०**—गाडी कशाला हवी? आतां जाऊन पोंचूं.

**रमा०**—हळू याहो. ( मागें फिरते. )

दोघींनीं होहो म्हणून मानेनें दाखवून त्या पुढें निघाल्या. या घरीं येऊन पोंचल्या तेव्हां आपण बाहेर गेल्याचें मावशीस समजलें तर ती चरफडेल असें सिंधूच्या मनांत आलें; तरी ती डगमगली नाहीं. कारण ती समजून होती कीं, या खटल्याचा शेवट होईपर्यंत मावशीचें कांहीं चालणार नाहीं आणि एकदांचा त्याचा शेवट झाला म्हणजे जरूर वाटल्यास आपण जाऊन रमाबाईचे घरीं रहावें. दोन कामें केलीं म्हणजे त्यांसही आपला भार होणार नाहीं.

रात्रीं जेवणें झाल्यावर नारायणराव व वकील

पुनः सिंधूचे दिवाणखान्यांत येऊन कज्जा उद्यां चालणार म्हणून सांगून गेले. रात्रीं सिंधूस लौकर झोंप लागेना. बारा वाजतां तिला झोंप लागली. सकाळीं उजाडल्यावरोबर कोर्टास जाण्याच्या तयारीची त्या घरीं घाई होऊं लागली. कोणी लौकर लौकर आंगें धुऊन सैंपाकास लागलीं. कोणी पाटपाणी करताहेत. इतक्यांत वकिलीणबाई सिंधूच्या दिवाणखान्यांत आल्या आणि म्हणाल्या. तुमचें परसाकडणें तोंडधुणें झालें का? त्यावर सिंधू " हो " म्हणाली. मग वकिलीण बाईनीं सिंधूस खालीं नेऊन तिची वेणी घातली आणि आंग धुवायास नेली. इकडे नारायणराव व वकील आपल्या कज्जाचे कागदपत्र पहात बसले होते ते उठून जेवायाला आले. तेव्हां ' सिंधूचें पान आम्हाबरोबर ठेवा ' असें वकिलाच्या सांगण्यावरून नारायणराव बोलले. जेवणें होतांच गाडींत बसून मंडळीनें कोर्टाची वाट धरली, तेव्हां घरांतलीं सर्व माणसें खिडकींतून यांस पहात उभीं राहिलीं व शेजारपाजारच्या बायाही सिंधूच्या गाडीकडे पाहून एकमेकींशीं हळू हळू बोलत होत्या. अशा गांवभर सर्व बायका व पुरुष रस्ताभर सिंधूच्या गाडीकडे पहाण्यास उभ्या होत्या. कारण संभावित स्त्रियांस बहुतकरून कोर्टांत जाण्याचे प्रसंग येत नाहींत. तेव्हां एखादी गोष्ट घडते ती सर्वांस आश्चर्यकारक वाटायचीच.

याप्रमाणें सर्व मंडळी कोर्टांत जमा झाली आणि न्यायाधीशापुढें प्रथमच हा कज्जा सुरू झाला.

त्यांत पहिली साक्ष सिंधूबाईची होती. सिंधूबाईनें नांव गांवच्या प्रश्नांचीं उत्तरें दिल्यावर न्यायाधीशानें विचारलें कीं, नारायण सखाराम यांचे घरीं झालेली चोरी तुम्हांस ठाऊक आहे का ?

**सिं०**—होय ती चोरी मी घरांत असतां झाली.

**न्या०**—चोरास तुम्ही ओळखतां काय ?

**सिं०**—त्याला मीं एक वेळ पाहिला आहे.

**न्या०**—( तात्यारामोशाकडे बोट करून ) हा मनुष्य तुम्ही ओळखतां ?

इतक्यांत संकेताप्रमाणें वकिलाचा मनुष्य सिंधूच्या नजरेआड येतो.

**सिं०**—मी यास ओळखीत नाहीं.

हे शब्द सिंधूच्या तोंडचे पडतांच कैद्याच्या वकिलास जोर येऊन त्यानें मुकदमा खारीज करविला. नारायणराव जे कज्जा ऐकण्यास बांकावर बसले होते त्यांस घेरी येऊन ते धाडकन् खालीं पडले. सिंधूची साक्ष झाल्याबरोर त्या खटल्यांत कांहीं अर्थ राहिला नाहीं, तेव्हां प्रेक्षक लोक कोर्ट सोडून चालते झाले.

सिंधूस व घेरी आलेल्या नारायणरावास त्यांच्या वकिलानें गाडींत बसवून घरीं रवाना केलें व डाक्तरास एक पत्र पाठविलें. तें पत्र डाक्तरास पोंचतांच नारायरावाची तबियत पहाण्यास डाक्तर आला. त्यानें प्रकृति पाहून लक्ष्मीबाईस घरीं चलण्यास सांगितलें. सगळीं घरीं गेल्यावर डाक्तरानें एक औषध बाटलीभर देऊन लक्ष्मीबाईस सांगितलें, या रोग्याजवळ तुम्हीं अगदीं जातां कामा नये. सिंधूबाईनें दिवसभर त्याच्या

जवळ बसावें. त्याप्रमाणें सिंधू नारायणरावांचें दुखणें काढण्यास आतां तयार झाली. पण नारायणरावांस जो दोन लाखांचा लाभ होऊन त्यांचा उपभोग घेतल्याशिवाय चोरी झाल्यानें धक्का बसला त्यांतून ते बरे न होतां आठव्या दिवशीं त्यांनीं प्राण सोडला. मग सिंधूची दुर्दशाच ती ! लक्ष्मीबाईनीं सिंधूवर शिव्यांची आणि शापांची लाखोली चालविली. प्रेतसंस्कार करून मंडळी आली तेव्हां एक वेळ घरांत रडारड होऊन ती मंडळी गेल्यावर लक्ष्मीबाईनीं सिंधूस एका वस्त्रानें दाराबाहेर करून दार लावून घेतलें.

सिंधू मुळू मुळू रडत रस्त्यावर उभी आहे. मध्यें मध्यें मावशीस दीनवाण्या शब्दांनीं हाका मारीत आहे तों तिजभोंवतीं शेंकडों मंडळी जमली व त्यांत पुष्कळ म्हणूं लागले कीं, तुम्हीं खुशाल आमच्या घरीं चलावें. तरी सिंधूनें त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष्य केल्यासारखें केलें.

अशी ती दीड तास उभी राहिल्यावर हें वर्तमान गांवभर पसरलें व माधवरावांच्या घरींही कोणीं सांगितलें. माधवरावांचें कुटुंब रमाबाई लागल्याच गाडी करून तेथें आल्या आणि सिंधूची समजूत करून त्यांनीं तीस गाडींत घेऊन, घरीं निघाल्या. त्यांनीं लक्ष्मीबाईची यथेच्छ पूजा केली असती, पण लक्ष्मीबाईवरही जबरा प्रसंग असल्यामुळें त्यांनीं लक्ष्मीबाईस हाकही मारली नाहीं. तरी सिंधूनें जरा मोठ्यानें लक्ष्मीबाईस मी माधवरावांकडे गेल्यें म्हणून जातां जातां सांगितलें व शेजाऱ्यांसही हाच निरोप

लक्ष्मीबाईस सांगण्यास सांगून गाडी हांकली. शेंपन्नास पावलें गाडी गेली तों नारायणरावांच्या वकिलांची स्त्री गाडींतून सिंधूबाईस नेण्याकरितां येत होती ती भेटली. त्यांच्या गाड्या जवळ जवळ उभ्या राहिल्यावर थोड्या गोष्टी झाल्या व बाईनें सिंधूस आपल्या घरीं चलण्यास आग्रह केला; पण रमाबाईनीं साफ नकार देऊन त्या सिंधूस आपल्या घरीं घेऊन गेल्या.

याप्रमाणें सिंधूबाई माधवरावांचे घरीं राहूं लागल्यावर त्यांस पहाण्यासाठीं व लग्नाचीं बोलणीं लावण्यासाठीं निरनिराळ्या शहरांहून माणसें व पत्रें येणें सुरू झालीं.

रमाबाईचा भाऊ लग्नाचा होता त्याचें जमलें तर बरें; म्हणून रमाबाईनीं त्यास एक पत्र पाठविलें. पत्र पोंचतांच तो गृहस्थ आपल्या वहिणीकडे आला.

हा मनुष्य सुस्वरूप असून तरुण विद्वान होता. याची बी. ए. ची परीक्षा उतरली असून इतर शास्त्रांच्या अभ्यासाकडे याचें चित्त असल्यामुळें पुढील परिक्षांचा अभ्यास न करतां शिल्पकलेंत प्रवीणता करण्याचा त्यानें निश्चय करून तो गृहस्थ चित्रकला शिकूं लागला होता. त्याचा बाप कमिसरियटमध्यें नौकर असून त्यानें पुष्कळ द्रव्य संपादन केलें होतें. त्या द्रव्याचा उपयोग आपल्या दोघां पुत्रांच्या विद्याभ्यासांत करण्याचा त्याचा मानस असल्यामुळें तो गृहस्थ जरी हल्लीं सहकुटुंब ब्रम्हदेशांत होता, तरी त्यानें आपले राम लक्ष्मण नामक दोन्ही पुत्र

मुंबईस ठेवले होते. या दोघांचीं लग्नें व्हावयाचीं होतीं. त्यांत रामचंद्ररावास आतां लग्नास सवड असून लक्ष्मणरावांचीं तीन वर्षें बाकी होतीं. कारण त्या दोघां भावांनीं बालविवाह निषेध सभेमध्यें २२ वर्षांपूर्वीं लग्न न करण्याची शपथ घेऊन त्या सभेस आपल्या सह्या दिल्या होत्या. हे दोघेहि बंधु विद्वान असून मुंबईच्या थोर थोर गृहस्थांनीं स्थापिलेल्या सभांस व समाजांस जाण्याचा व तेथें भाषणें करण्याचा दोघांसहि नाद असे. पण रामचंद्रराव आणि लक्ष्मणराव यांचा प्रत्येक विषयांत मतभेद असे. सामान्यतः दोघे सुधारणापक्षाचे असत; पण पोट विषयांत ते एकमेकांचीं न्यूनें काढण्यास अगदीं तत्पर असत, यावरून लक्ष्मणराव हे सुधारणा पक्षाचे नव्हत, असेंहि कित्येकांचें कधीं कधीं मत पडे.

रामचंद्रराव हे आपल्या बहिणीकडे आल्यावर बहिणीनें त्यांस लग्नाविषयीं विचारलें. ते म्हणाले जर गुणवती स्त्री असून १४ वर्षें पुरीं झालीं असतील तर मी लग्न करण्यास आज कबूल आहें. रमाबाईनीं सिंधूस हाक मारली. तिला पाहतांच रामचंद्रराव खुष झाले. ते मनांत म्हणालें हें रत्न जर मला प्राप्त होईल तर माझ्या जन्माचें सार्थक होईल. सिंधूबाईस पाहण्यासाठीं पुष्कळ लोक येत असत, त्यांतीलच हा एक असावा असें तिला वाटलें. पण गुणाची परीक्षा केल्याशिवाय मी रूपाला भुलणार नाहीं असा तिनें निश्चय केला होता. यामुळें तिनें आपलें मन त्याच्या रूपाच्या वर्णनांत न गुंतवितां ती आ-

पलें तेथील काम झालें, म्हणून घरांत जाऊन दुसऱ्या उद्योगास लागली. नारायणरावांच्या घरच्यासारखें येथें कांहीं काम नसे; पण ती रिकामी रहणारी स्त्री नसल्यामुळें कांहींना कांहीं करीत असे.

कांहीं वेळ वहीणभावंडांचीं भाषणें झाल्यावर रामचंद्रराव बाहेर गेले. तेव्हां रमाबाईनीं सिंधूस आपल्यापाशीं बसावली. ती बसल्यावर गोष्ट काढली कीं, हा माझा बंधू असून अविवाहित आहे हा तुझ्या मनास येत असला तर मी तुझ्या लग्नाचे जूळवितें.

**सिंधू**—हे गृहस्थ आपले बंधू आहेतना ?

**रमा०**—अग हो माझा हा सख्खा भाऊ आहे.

**सिंधू**—मग त्यांचे गुणदोष आपल्यास माहीत असतीलच.

**रमा०**— वा ! हें काय विचारतेस ? पण—

**सिंधू**—" पण " तें काय आणखी ?

**रमा०**—" पण " म्हणजे मी त्याची बहीण असल्यामुळें त्याचे दोष कधीं माझ्या कानीं आलेले नाहींत. गुण माहीत आहेत. तो इंग्रजी शिकलेला आहे. नाकीं डोळीं बरा आहे. चार लोकांत त्याची मानमान्यता आहे. नोकरी अजून लागली नाहीं तीं लागेल.

**सिंधू**—ते कांहीं दिवस येथें राहतीलना ?

**रमा०**—त्याचा काय नियम सांगावा ? हें कार्य जमेल अशी आशा असल्यास त्याला राहिलेंच पाहिजे; नाहीं तर मी तरी फुकटा आग्रह कशास करूं?

सिंधूच्या मनांत येई कीं विना परीक्षा घेतल्याशिवाय यांना होय, नाहीं, म्हणणें वाजवी नाहीं. परीक्षा घेण्यासारखी माझी तर योग्यता नाहीं. बाहेर चौकशी करावी तर तेंही नीट दिसत नाहीं. मग मी होऊन परीक्षा घ्यावी कशी, योग येतो कशानें, आणि योग आला तरी त्या गृहस्थापुढें माझ्यानें दोन शब्द निर्भिडपणें बोलवतील कीं नाहीं; याचा नियम नाहीं. अशा अनेक विचारांनीं तिचें मन कांहीं वेळ घोंटाळ्यांत पडलें. याकरितां रमाबाईस तिनें आपल्या मनाचा कल समजूं न देतां तिनें ती वेळ मारून नेली.

रामचंद्ररावांनीं जेव्हां सिंधूबाईस पाहिलें तेव्हांपासून त्यांच्या मनांत दुसरा विषय प्रवेशच करीना. आजपर्यंत स्त्रीविषयाच्या कल्पना त्यांचे मनांत जरी कधीं कधीं येत, तरी विवेकानें ते त्यांस मनांत बिऱ्हाड करूं देत नसत, पण आज त्या विचारानें रामचंद्ररावांच्या अनेक देशोन्नतीच्या विचारांस हद्दपार केलें. ते आपल्या मेव्हण्याच्या खोलींत जाऊन एक पुस्तक उघडून बसले; पण तेतें वाचीत नसून लोकांच्या समजुतीकरितां पुस्तकाच्या पानांकडे डोळे मात्र लावले होते. मनांत, काय तिची वेणी, काय ते गोंडस हात, बोलणें किती मधुर, चेहरा किती स्वच्छ हे विचार. ईश्वराचें रूप असेंच ध्यानांत येईल तर या देहाची इतिकर्तव्यता होईल असें लोक म्हणतात. पण ईश्वराचें रूप, जसें तरुण पुरुषांस स्त्रियांचें रूप ध्यानीं आणतां येतें, तसें ध्यानीं येत नाहीं.

इतक्यांत माधवराव उठून बाहेर गेले. ते गेल्या-

बरोबर रामभाऊंनीं पुढील पत्र लिहिण्यास सुरू केलें.

प्रिया सिंधू,

तुम्हांस पाहिल्यापासून माझें मन अन्य विषयांवरून तुम्हाकडे लागलें आहे. तुम्ही अविवाहित नसतां तर मीं आपल्या मनांस आकळून धरलें असतें. पण ज्याअर्थी तुम्हास लग्न करणें आहे त्याअर्थी मी जें हें तुम्हांस पत्र पाठवीत आहें हा माझा दोष नसेलसें मला वाटतें.

माझ्याविषयीं तुम्हांस ताईकडून वहुतेक माहिती मिळालीच असेल. त्याप्रमाणें आपण जर लग्नास ( माझ्याशीं ) तयार असाल तर मी आपणास मोठा भाग्यवान् समजेन. माझा हेतु तुम्हाशिवाय दुसरी कोणी पुरवील अशी स्त्री मिळणें कठिण आहे. मी बालविवाहनिषेध मंडळीचा एक सभासद आहें व त्या विषयाचा मला पूर्ण अभिमान आहे. तुम्हांशिवाय दुसरी चौदा वर्षांची मुलगी महाराष्ट्र देशांत क्वचितच आढळेल, व चौदा वर्षांच्या मुलीशींच मी लग्न करीन म्हणून कित्येक मित्रांस बोलून दाखविलें आहे.

सही रामचंद्रराव.

हें पत्र रामचंद्ररावांनीं बंद करून तें रमाबाईपाशीं सिंधूस देण्याकरितां दिलें. तें रमाबाईनीं आपल्या कशिद्याच्या गांठोड्यांत वर ठेवून, गांठोडें आपल्या बैठकीवर ठेवून त्या आंत गेल्या. सिंधूबाई यावेळीं भाजी चिरीत बसल्या होत्या; त्यांस रमाबाई म्हणतात, सिंधूबाई, आज कीं नाहीं मला एका किनतानावर लोंकरीचें मांजर काढायाचें आहे. नमुना आणून दे-

वला आहे; व त्याप्रमाणें मांजराचें तोंड काढण्यास सुरूहि केलें आहे, पण तुम्हीं तें वळण बरोबर आहे कीं नाहीं तें पाहिल्याशिवाय पुढें काम करण्यास मला धीर होत नाहीं. जा वरें बैठकींत गांठोडें ठेवलें आहे त्यांतील तो काशिदा पाहून या. मी भाजी चिरतें. म्हणून विळी रमाबाईंनीं सिंधूबाईकडून घेऊन त्या भाजी चिरूं लागल्या.

**सिंधू**—मला आपल्यापेक्षां अधिक येतें म्हणून मी वळण पाहूं. ?

**रमा०**—वा, वा, मी केवढी कुशल? जा, हो, एकदां नजर फेंकून या.

**सिंधू**—बसूं दुपारीं दोघीजणी, आणि एकमेकींच्या सल्यानें तें पुरतावूं.

**रमा**—असें हो काय करतां ? एकदां पहाना पण.

**सिंधू** उठून बैठकींत जाऊन पहाते तों बासनांत मांजर नाहीं नी नमुनाही नाहीं. पण वर एक " **सिंधुबाई** " असा पत्ता लिहिलेला लाखोटा पडला आहे; तो पाहून त्यांनीं तो फोडून आंतील हें वरील रामचंद्ररावांचें पत्र वाचलें. व त्यांस आनंद झाला कीं, आतां पत्रद्वारें आपल्या इच्छा दर्शित करण्यास विशेष लाज वाटणार नाहीं. त्यांनीं त्यांचे पत्राचे पाठीमागें पेनसलीनें पत्र लिहून तें त्याच लाखोटच्यांत बंद करून " सिंधूबाई " या पत्यावर पेनसलीच्या रेघा मारून तो खोडून टाकला. व तें पत्र तसेंच त्या बासनावर ठेवून त्या रमाबाईकडे गेल्या व त्यांस म्हणाल्या काय पण काशिदा सुरेख काढलात तो !

( दोघी हंसतात. )

रमाबाईची भाजी चिरून झाल्याबरोबर त्या उठून बैठकींत गेल्या आणि त्यांनीं तें पत्र रामचंद्रारावांचे खोलींत पोंचतें केलें.

सिंधूबाईच्या पत्राची नक्कल.

आपलें पत्र वाचून आनंद झाला पण एक गोष्ट मीं अजून कोणास सांगितली नाहीं ती आपल्यांस लिहितें, कीं आपण मला कांहीं तरी अलौकिक गुण दाखविल्याशिवाय माझ्यानें ' होय ' म्हणवत नाहीं. आपण मला इतरांपेक्षां गुणी असल्याचें समजलें म्हणून ही विनंति केली आहे. आपण माफ करण्यास समर्थ आहां.

रामचंद्रराव पत्र वाचीत असतां रमाबाई बहिणभावांच्या लडिवाळपणानें रामभाऊंस विचारतात कारे रामभाऊ, ओल आहे कीं, पोल? बहुतकरून ओल आहे. पोल नाहींसें वाटतें. त्यावर रामचंद्रराव म्हणाले पाहूं आतां ओल आहे कीं पोल तें. पत्र पाहतांच त्यांच्या चेहऱ्यावर एकदम निराशेची झांक मारली. कारण प्रारंभीं प्रियकरा, प्रियमित्रा वगैरे यांना आवडण्यासारख्या शब्दांचें संबोधन घातलेलें नव्हतें. पुढील मजकूर पाहून रामचंद्ररावांस आनंद झाला कीं, अलौकिक गुणाची जी हिला इच्छा आहे ती आपल्यास अगदीं आवडली आणि तसा कांहीं गुण हिला दाखविणें हेंच मला भूषण असून तिनें ती इच्छा दर्शविली हें तिलाही भूषणास्पद आहे.

रामभाऊंनीं तीन वेळ पत्र पुनः पुनः वाचून तें खि-

शांत टाकलें व त्याचें उत्तर लिहिण्यास टेबलाजवळ गेले. इतक्यांत त्यांचे मेव्हणे तेथें आल्यामुळें ती लिहिण्याची संधी तर मागें पडली, पण माधवरावांशीं ही एक गोष्ट काढण्यास त्यांस उत्तम संधि मिळाली व त्याप्रमाणें दोघांचीं बोलणीं होऊन तो बेत कायम झाला. त्यांतील आशय असा होता कीं, रामचंद्ररावांनीं त्याच दिवशीं संध्याकाळीं मंडळी बोलावून व्याख्यान द्यावयाचें. हीं बोलणीं झाल्याबरोबर निमंत्रण चिठ्या सर्व शहरांत पाठविण्यासाठीं माधवराव लिहूं लागले व रामचंद्रराव तेथून उठून दुसऱ्या खोलींत जाऊन तेथें सिंधूस पत्र लिहिलें कीं, माझें आज याच घरांत व्याख्यान होईल तें ऐकण्याची इच्छा आपण आपल्या ताईस दर्शविली तर स्त्रियांकरितां राखून ठेवलेल्या जागीं त्या तुम्हास घेऊन बसतील. तेणेंकरून माझा वक्तृत्वगुण आपल्या पहाण्यांत येईल. तें पत्र तावडतोब त्यांनीं नेऊन आपल्या बहिणीपाशीं दिलें, व रमाबाईंनीं सिंधूस दिलें. तें वाचून सिंधूनें नीट ठेविलें. संध्याकाळीं रामचंद्ररावांचें व्याख्यान झालें. तें ऐकून नव्या लोकांस तर आनंद झालाच पण जुन्या लोकांनीं सुद्धां त्यावेळीं माना डोलविल्या. विषय बालविवाह निषेध हा होता व या विषयावर रामभाऊंनीं कमींत कमी शेंपन्नास वेळ व्याख्यान दिलें असून हा विषय त्यांस फार आवडत असे; यामुळें तें उत्तम वठावयाचेंच; व तसें वठलेंही.

सिंधूबाई जरी विद्वानांत मोडत, तरी त्यांस भाषण समारंभ पहाण्यास कधीं मिळाले नव्हते; तरी जो

रामचंद्ररावांनीं विषय प्रतिपादन केला,—हा विषय सिंधूच्या नुसता ओळखीचा नसून तो तिच्या जणूं हाडीं खिळला होता,—त्या संबंधानें तिची मयत मातोश्री व चुलता नेहमीं सहज गोष्टीमध्यें तो विषय बोलत असत व सिंधूस एवढी मोठी करूं देणें हेंही त्यांतीलच बीज होतें. रामचंद्ररावांचें भाषण झाल्यावर मंडळी आपापल्या घरीं निघून गेल्यावर सिंधू रमाबाईपाशीं वक्त्याची तारीफ करीत आहेत तों रामचंद्रराव त्यांच्या खोलींत आले.

**रमाबाई**—रामभाऊ, तुझें भाषण सिंधूबाईच्या पसंत पडलें हो.

**रा०**—आणि तुझ्याग ताई ?

**रमाबाई**—अरे, माझ्या तर पडायाचेंच. ( डोळ्यांनीं खुणावते ) पण ज्याला पसंत पडण्याची जरूर आहे त्यास पडलें तर उपयोग.

**रा०**—( एक कागद रमाबाईच्या हातांत देऊन ) या कागदावर ताई, या पेनसलीनें दोहों बाजूंस किनाऱ्या बरोबर उभ्या अशा सह्या करून द्या पाहूं.

**र०**—सह्या रे कशाला आमच्या तुला हव्या ? कोऱ्या कागदावर आम्ही नसतों सह्या करीत. ( रमाबाई मोठ्यांनीं व सिंधूबाई लहान्यांनीं हंसतात.

**रामचंद्रराव**—अग ताई तुम्हापासून खोटा करारनामा लिहून घेण्याचा मी विचार करीत नाहीं. फक्त कागदाच्या कडेवर तुमच्या सह्या करा म्हणजे झालें. आणि त्याही या पेनसलीनें. रमाबाई हंसत हंसत सही करून तो कागद सिंधूच्या हातीं देऊन,

श्री. पुणें, २० सपटेंबर १८८८. तीर्थरूप राजमान्य राजश्री बाबा यांसः—रामचंद्राचे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार. आपलें पत्र पावलें. मजकूर ध्यानीं आला. त्यावर उत्तरादाखल मला बराच मजकूर लिहिणें आहे; म्हणून मी आजचें पत्र बालबोध लिपींत लिहीत आहें.—

मला जें आपण पैसा खर्चून शिक्षण दिलेंत त्याबद्दल आणि पुत्रधर्माप्रमाणें मला आपल्या आज्ञा शिरसा वंद्य आहेत. पण जर आपण एखादी चूक करीत असाल तर ती न होऊं देण्याबद्दल आपल्यास वडील चिरंजीव या नात्यानें मी सूचना करूं शकतों. आजकाल नौकरींत कांहीं मजा राहिली नाहीं. एक जागा कोठें खाली झाली कीं शेंकडों अर्ज येऊन पडतात. असं झाल्यामुळें ५० रुपयांची असलेली जागा आफिसरास ३० त चालविणारा चांगला हुशार ग्राज्युएट मिळतो. नोकरी लागल्यावर पुनः हालअपेष्टा असतात त्या आपण भोगीतच असाल; त्याबद्दल चर्चाच नको. आजकाल इंग्रजी अभ्यासावर जिकडे तिकडे झोड चालली आहे. त्यामुळें तेली, तांबट, लोहार वगैरे धंदेवाले आपापले धंदे विसरूं लागले. कारण त्या जातींचीं मुलें आपापले धंदे सोडून नौकरीस साधनभूत जी लेखन वाचन-विद्या तिचा मात्र अभ्यास करतात व अशा प्रकारें जरूरीच्या धंद्यांचीं आजकाल अगदीं हेळसांड झाली आहे. विलायतेंत तो प्रकार नसून तेथें सर्व धंदे यथास्थित चालले असल्यामुळें तो देश ज्या प्रमाणानें संपत्तिवान होत

चालला आहे, त्याप्रमाणानें आपला देश विपत्तिवान होत आहे. यासाठीं या देशांत कलाकौशल्याचीं कामें करणें फार अगत्याचें आहे. आपण यावर आक्षेप घ्याल कीं, ते धंदे ब्राम्हणेतर जातींनीं करावे. ही गोष्ट मलाही मान्य आहे, पण सर्व धंदेवाले लोकांस जरी किती कानीं कपाळीं सांगून कंठशोष केला तरी ते लोक ऐकत नाहींत. असें पुष्कळ वक्त्यांच्या अनुभवास आलें आहे. म्हणून ते धंदे आतां एक वेळ ब्राम्हणांनीं हातांत घेतले पाहिजेत. ब्राम्हण ही हिंदुस्थान देशांतील उंच जात असल्यामुळें त्या जातीचें अनुकरण अन्य जाती करतात. ब्राम्हण इंग्रजी शिकूं लागले तेव्हां भराभर सर्व जाती तीच विद्या चांगली समजून जसा इंग्रजीचा अभ्यास वाढला तशी धंदेशिक्षणाची पद्धत विना ब्राम्हणांनीं हातीं घेतल्याशिवाय तें कांहीं जमेलसें दिसत नाहीं. सर्व कर्मांचा गुरु ब्राम्हण आहे. चर्मकऋषीपासून चांभारांनीं शिक्षण घेऊन जोडे शिवूं लागले असें माझ्या ऐकण्यांत आहे. तसेंच कुंभारांचा गुरु कुंभऋषी होता. योद्धे बहुतेक जरी क्षत्रिय असत तरी परशुराम, द्रोण, कृप, बाळाजी विश्वनाथ, बापू गोखले वगैरे मंडळी ब्राम्हण असून ती त्या त्या कालीं योद्ध्यांस गुरुसमान पूज्य होती. शास्त्रीय विषयांवर जे संस्कृतांत ग्रंथ आहेत ते बहुतेक ब्राम्हणांनीं लिहिले आहेत. जर त्यांस असे धंदे करण्याची लाज वाटली असती तर त्यांनीं त्या धंद्यांचा अभ्यास करून त्यांवर अधिक विचार केलेच नसते. आपल्या

शास्त्रांत जे धंदे निषेध मानले आहेत ते आज कालचे ब्राम्हण का थोडे करताहेत ? गोरस विकूं नये ; पण मुंबईस तुम्ही ताकवाल्यांचीं दुकानें गल्लोगल्लीं पाहतां तीं सर्व ब्राम्हणांनीं घातलीं आहेत. अन्नविक्रय करूं नये तर खाणावळी हें काय आहे ? फार कशाला आपण काबुलाच्या मोहिमेंत होतां तेव्हां प्रयाग नारायण तिवारी, आणि गुरुप्रसाद हे दोन कानपूरचे श्रीमान ब्राम्हण आपल्या कमिसरियट मध्यें राशन खाण्यापिण्याच्या जिनसा पुरवीत असतां गाई, मेंढरें, वगैरे प्राणी सोल्जरांसाठीं पुरवीत असत ना ? गाईचें मांस सुद्धां तेच ना तोलून देववीत ? मग यापेक्षां इतर कोणते धंदे नीच आहेत ? हे गृहस्थ इतके नीच धंदे जरी करीत असत तरी त्यांस कोणी दोष दिला आहे का ? उलट त्यांच्या मुली सुकुल सदाचारी दीक्षित वगैरे श्रेष्ठ ब्राम्हण कुलांनीं पतकरून तशीं त्यांच्या मुलींचीं लग्नें उंच कुलोत्पन्न पुरुषांशीं झालीं असल्याचें आपल्या ऐकिवांत असेलच. अशा प्रकारें माझें म्हणणें असें आहे कीं, कोणताही धंदा करण्यास ब्राम्हणांस कांहीं आडकाठी फारशी कधीं कोणी केली नाहीं व हल्लींही कोणी करीत नाहींत. मग आपण माझें कृत्य वाईट असें कशावरून समजतां ? आपला समज असा असेल कीं, मला मोठी नोकरी लागून, लोकांनीं मला रावसाहेब, रावबहादूर म्हणावें व तेणेंकरून आपल्यास व मला आनंद व्हावा. पण आजकाल देशाभिमान्यास जो मान आहे तो के. सि. एस. आय. पदवी धारण केलेल्यास सुद्धां नाहीं.

अलबत त्या पदवीधारकांस सरकार मान देतें पण ज्या समाजांत त्यांचा मान व्हावयाचा त्या समाजांतील गृहस्थांच्या तो पदवी—धारी गृहस्थ परिचयाचाही नसतो. एकंदरींत माझ्या लिहिण्याचा आशय असा आहे कीं, मी आपल्या कुलास डाग लागेल असें कांहीं कृत्य करीत नाहीं आहें, याबद्दल आपण बेफिकीर असावें. वडिलांस बहुत काय लिहिणें, लोभाची वृद्धि होय ही विज्ञापना."

हें पत्र रामचंद्ररावांनीं टपालांत टाकून २ दिवस झाले तोंच मातोश्रीच्या मृत्यूची त्यांस त्यांच्या वडिलांची तार आली व जो विधि यांस करणें होता तो करण्याकरितां लक्ष्मणरावांस यानीं मुंबईस तार दिली कीं, तुम्ही येथें आल्यास ठीक पडेल. पण लक्ष्मणरावांचें मन जरा कलुषित असल्यामुळें त्यांनीं रामचंद्ररावांस नकार दिला म्हणून दोन्हींकडे क्रिया झाल्या. हें सर्व कृत्य उरकल्यावर रामचंद्ररावांस वडिलांचें पत्र आलें कीं तुमचें पत्र पोंचलें. आजपासून तुमचा आमचा संबंध राहिला नाहीं. आतां तुमचें लग्न तर झालेंच आहे. तुम्हांस दोन अक्षरें येतात तेवढ्यावर तुमचें पोट भरेल. आजपर्यंत आम्हीं तुमचें संरक्षण केलें. आतां पुढें तुम्ही आपला मार्ग पहा. तुमच्या मातोश्रीचे दागदागिने लक्ष्मणाच्या लग्नाकरितां ठेवले आहेत. तुम्हांस रानड्याकडून रक्कम उठविण्यास अधिकार नाहीं म्हणून त्यांस लिहिलें आहे. त्या अर्थी ते तुम्हास कांहीं देणार नाहींत व पुण्याच्या एका मराठी पत्रांत मीं जाहि-

रात दिली आहे कीं, आमचे चिरंजीव रामचंद्रराव यांस कोणी आमच्या सचोटीवर पैसा देऊं नये. त्या कर्जाचे देणेदार आम्ही होणार नाहीं. तर पुढील व्यवस्था काय करणें ती तुम्हीं करावी.

हें पत्र रामचंद्ररावानीं वाचलें आणि खिन्न होऊन बसले. जवळ जानकीबाई ( सिंधूचें सासरचें नांव ) उभ्या होत्या त्या म्हणाल्या, पत्र कोणाचें आहे तें ?

रा०—लाडक्ये, बाबांचें पत्र आलें.

सिं०—प्रकृत बरी आहे ना मामंजींची ?

रा०—हो. प्रकृत बरी आहे. तें घे पत्र आणि वाचून पहा त्यांत काय मजकूर आहे तो.

सिं०—पत्र वाचून पहाते. मामंजींचा राग आहे वाटतें ?

रा०—असो, मला पैसा मिळणार नाहीं याचें वाईट वाटत नाहीं पण मीं जें पत्र त्यांस लिहिलें तें वाचून तरी त्यांनीं पाहिलें कीं नाहीं समजत नाहीं. आणि एकाएकीं त्यांनीं मजवर रोष केला. असो, आपलें प्राक्तन.

सिं०—ज्या अर्थी मामंजींचा राग झाला आहे आणि ते आपल्यास पैसा देण्यास राजी नाहींत त्या अर्थी आतां हे माझ्या आंगावरचे दागिने आपण आजच्या आज व्न्संच्या हवालीं करून या. हें जोखीम आतां आपल्यास नको. ( रामचंद्ररावांचें लग्न एकाएकीं ठरल्यामुळें दागदागिन्याची सोय कर- ण्यास अवधी नव्हता म्हणून रमाबाईनीं वेळ साजरी

करण्यासाठीं आपले दागिने नवऱ्या मुलीस दिले होते. )

रा०—अहाग माझ्ये सोन्ये ! किती तरी तूं चतुर आहेस ही ! मला जें वाईट वाटलें तें हेंच कीं, ज्या अर्थी बाबांनीं मजवर असा राग केला त्या अर्थी माधवरावांचा मनुष्य बहुतकरून दागिने मागण्यास येईल व ते मी तुझ्या आंगावरून दुसरे दागिने मिळे-पर्यंत कसे काढूं याच चिंतेंत होतों.

सिं०—वा ! वा ! यांत तें काय झालें ? असलें नाशिवीं तर होतील दागिने. मला एक दागिना ( न-वऱ्याकडे बोट करून ) एवढा असला म्हणजे पुरे.

हे सिंधूबाईचे शब्द ऐकून रामभाऊंनीं आपल्या पत्नीस दृढ आलिंगन देऊन तीस मांडीवर बसाविली व एकमेक एकमेकांच्या तोंडाकडे पहात बराच वेळ बसलीं. मग कानांतून बुगड्या सिंधूबाई काढूं लाग-ली. पण रामभाऊंनीं तिचा हात धरून ते म्हणाले, पण मला सध्यां ठाण्यास जावयास वेळ नाहीं. बहुतक-रून त्याचा मनुष्य आतां येईल तो आल्यावर दा-गिने त्याजबरोबर पाठवूं म्हणजे झालें. नच आला तर रविवारीं मीच खेप करीन. एव्हांच नको बुच्ची होऊन बसूं.

अशा प्रकारचीं थोडीं या स्त्रीपुरुषांचीं बोलणीं झाल्यावर रामभाऊ बाहेर निघाले. ते घराच्या बा-हेर पडताहेत तों लक्ष्मणराव मुंबईहून पुण्यास आले. ते दरवाज्याजवळ येऊन पोंचलेच होते. त्यांस रा-मभाऊ आंत घेऊन गेले व बापाचें पत्र त्याजपाशीं

देऊन म्हणाले, बाबांचा इतका राग मजवर होण्याचें कारण कांहीं दिसत नाहीं.

लक्ष्मणराव खिशांतून पत्र काढून तें रामभाऊंच्या हातात देतात. हें पत्र यांच्या वडिलांचेंच असून त्यांत मजकूर असा होता कीं, " पुण्याचें आपलें घर भाडोत्री मिळाल्यास भाड्यानें द्यावें. भाडोत्री न मिळेल तर कुलपें घालून तुम्हीं मुंबईस यावें. रामभाऊ जर घरांत रहातील तर त्यांजपासून रीतीप्रमाणें भाडें घ्यावें. त्यांस जेवढी जागा पाहिजे तेवढीच भाड्यानें द्यावी. जेव्हां वारसांविषयीं तंटे उभे होतील तेव्हां पहातां येईल. पण सध्यां तुम्हीं हें काम बजावल्याशिवाय राहूं नये. "

पत्र वाचून झाल्यावर दोघेही उपहासास्पद मुद्रेनें हांसले. आणि रामभाऊ उठून बाहेर निघाले. तेव्हां लक्ष्मणराव म्हणाले; मी आजच्याच रात्रींच्या गाडीनें परत जाणार; यासाठीं लौकर या जरा.

रा०—हा येतों आतां. पण राहिनाम कां एक दिवस.

ल०—छे, छे, रहाण्यास सवड नाहीं.

हे शब्द रामभाऊनीं ऐकून ते निघून गेले आणि एका तासानें परत आले. रामभाऊ बाहेर पडल्यावर घरांत काय प्रकार चालला आहे तो सांगूं. रामभाऊ बाहेर जाऊन सुमारें अर्धी घटका झाली तरी दीर भावजयांचीं भाषणें नाहींत. सिंधूबाई दाराआड उभ्या असून बैठकींत लक्ष्मणराव बसले होते. सिंधूबाई जरी लक्ष्मणरावांस लग्नापासून ओळखीत होत्या

तरी आपण होऊन बोलण्याचा त्यांस धीर होईना व लक्ष्मणरावांचा तर त्यांजवर राग होता. हा राग लक्ष्मणरावांच्या मनांत कसा संचारला असावा याचें थोडें विवेचन होणें जरूर आहे. रामभाऊंच्या लग्नास लक्ष्मणराव ठाण्यास आल्याचें सांगितलेंच आहे. या लग्नामध्यें सिंधूबाईच्या मावशी लक्ष्मीबाई यांनीं लक्ष्मणरावांस एक वेळ आपल्या घरीं बोलाविल्यावरून ते त्या बाईस भेटण्यास गेले होते. आणि लक्ष्मीबाईनीं लक्ष्मणरावांस सिंधूविषयीं वाईट गोष्टी सांगून आपली लगी त्यांस देण्याविषयींची इच्छाही प्रदर्शित केली होती व त्या मुलीचें जरी वय लहान होतें तरी सुरूप असल्यामुळें लक्ष्मणरावाचेहि मनांत ती भरली होती, म्हणून हे लक्ष्मीबाईकडेस बराच वेळ गेले व ज्या ज्या वेळीं हे जात त्या त्या वेळीं मावशीबाईचा विषय काय तो आपल्या मुलीचें कौतुक आणि सिंधूबाईची निंदा हाच असे. यावरूनच लक्ष्मणराव या आपल्या भावाभावजयीविषयीं तिरस्कार करूं लागले.

प्रथम सिंधूबाईनींच शेवटीं भाषणास आरंभ केला.

सिं०—भावोजी, मामंजींचें का पत्र आलें आहे दुसरें ?

ल०—हो, हो, वहिनीबाई, आपला पायगुणच तसा आहे. आम्ही जुन्या लोकांसारखे देवभोळे नाहीं. आम्ही भुतें, दृष्ट लागणें, पायगुण म्हणणें, देव देवी अंगांत येणें, शिंकेचा व पालीच्या शब्दाचा अपशकून समजणें, बाहेर निघालें असतां विधवा स्त्री, मडकीं, लांकडें, वगैरे पुढें आलीं तर तें दुश्चिन्ह

समजणें, या गोष्टींवर बिलकूल भरंवसा ठेवीत नाहीं; पण वहिनीबाई, तुमचा इतिहास ऐकून पायगुणाविषयींचा भोळेपणा माझ्या अंगीं जणूं नवाच ठसावला आहे. बाईनें जन्मतांच बापाला यमपुरी दाखविली. पुढें चुलता पालन करूं लागला तों त्याचीहि तीच वाट. मग राहिली आई तिला सोनापूर ( मुंबईच्या स्मशानास सोनापूर म्हणतात ) चा रस्ता दाखविला. बरें, पुढें बाई आल्या मावशीच्या घरीं, तों आल्याबरोबर सुंदराचा बळी घेऊन पुढें मावशीस वैधव्यांत ढकलल्या. त्या तरी चोरी करवून चोरासारखी कोर्टांतहि जबानी देऊन तिला निर्द्रव्य करून टाकली. आतां तिला कोठें स्वयंपाकास राहिल्याशिवाय गत्यंतर नाहीं. दोन कुटुंबांचा सत्यानास करून, आतां तिसऱ्या कुटुंबांत शिरल्या तों सासूचा झाला फन्ना. बाबा ते वृद्धच आहेत, येऊन जाऊन नवरा आहे. त्याचें करा वाटोळें. आणि बसा तुळशीची माळ घेऊन जप करीत. पुनर्विवाह केलात तर त्याचीहि भट्टीच लागायाची. पण आम्हीं तुमचा अगदीं संबंध तोडला आहे एवढ्यानें तरी बचलों तर बचलों. नाहींतर माझीहि घ्या आहुती एकदांची म्हणजे सुटलों.

हीं भाषणें सिंधूबाईच्या हृदयास बाणासारखीं लागलीं; पण त्या भाषणाचा त्या माउलीनें राग बिलकूल न मानतां डोळ्यांत पाणी आणून म्हणाली—भावोजी, आपण म्हणतां त्या गोष्टी खऱ्या आहेत, पण माझा त्यांत कांहीं प्रत्येक बाबींत अन्याय नसे;

ल. पायगुणाविषयीं म्हणाल तर आपण खुशाल म्हणा ; तेथें माझा नाइलाज आहे. पण आपल्यासारख्या सुशिक्षितांनीं पायगुणाला दोष देणें हें एक प्रकारचें माझ्यापेक्षां आपल्यास दूषण आहे.

ल०—बरें, बरें, आपण बोलक्या आहां तें मला कोर्टांतल्या जबानीवरून कळलेलें आहे ; आतां बस्स.

हीं बोलणीं झाल्यावर सिंधूबाई पुढें न बोलतां स्वयंपाकास लागल्या व लक्ष्मणराव वाचीत बसले. कांहीं वेळानें रामभाऊ घरीं आले. दोघां भावांचीं कांहीं वेळ भाषणें झाल्यावर भोजनास उठले व भोजन झाल्याबरोबर लक्ष्मणराव निघाले.

रा०—कां, घाई कां? गाडी तर दोन वाजतां सुटते.

ल०—मला एका स्नेह्याकडे जावयाचें आहे व तेथून तो आणि मी बरोबर गाडीवर जाण्याचा आमचा संकेत आहे.

रा०—बरें, मुंबईस पोंचल्यावर विशेष मजकूर पत्रानें कळीव.

ल०—भाडें वसूल करण्याचा काय तो मजकूर; दुसरा मजकूर तो काय आहे?

रा०—अं! भाड्याचें काय! मला कोठें तरी रहायाचेंच; मग येथेंच भाडें द्यावयास मला काय जड जाणार आहे?

ल०—मग झालें, मी येतों आतां. म्हणून लक्ष्मणराव निघून गेले.

लक्ष्मणराव गेल्यावर या स्त्रीपुरुषांचीं सर्व भाषणें

याचसंबंधीं झाली. लक्ष्मणरावांचे सर्व बोलणें सिंधूनें रामभाऊंस सांगितले आणि डोळ्यांतून पटापट अश्रु गाळूं लागली. तिचे ते अश्रु रामभाऊंनीं आपल्या स्वच्छ उपरण्यानें पुसून तिची समजूत केली आणि म्हणाले, मी दोन शिकवण्या पतकरून आलों आहें. दोन दोन तास एकेक ठिकाणीं खर्चले पाहिजेत म्हणजे महिना २० रुपये मला मिळतील. तितक्यांत आपल्या दोघांचा निर्वाह होईल कीं नाहीं?

**सिं०**—पुष्कळ झाले. विसांत तर लोकें पांच पांच माणसांचा संसार करतात.

यानंतर हीं उभयतां निजवयास गेलीं.

दोन दिवसांनीं माधवराव (रामभाऊंचा मेव्हणा) स्वतः पुण्यास आले. त्यांनीं रामभाऊंस निमित्तें दुसरीं जरी सांगितलीं तरी ते खास दागिन्यांसाठींच आले असावेसें वाटतें. ते येऊन रामभाऊंशीं गोष्टी बोलत बसले आहेत. इतक्यांत सिंधूबाईनीं सर्व दागिने काढून त्या बाहेर आल्या आणि सुस्मित मुखानें बोलल्या "जेवायाचें मी येथेंच करतें आहें."

**मा०**—सिंधूबाई हें तर माझें घरच आहे. घर मी सासुरवाड का दोन आहेत? पण मला केरूनानाकडे अवश्य गेलें पाहिजे. ते आमचे गुरू आहेत आणि त्यांनीं मला अगोदरच सांगून ठेवलें आहे.

**सिं०**—ही सासुरवाड आहे अशा अर्थानें मी नाहीं आग्रह करीत. पण येथें येणें झालें म्हणजे मला माहेरसें वाटेल.

**रामभाऊ**—तिचें म्हणणें खरें आहे. आपण

तिला वडिलांच्या जागीं आहां.

मा०—हो, हो, आमचाही भाव तसाच आहे. पुन्हां रामभाऊंनींही जेवयास रहाण्याचा आग्रह माधवरावांस केला पण त्यांचा कल येण्याचा नाहींसें पाहून सर्व दागिने ताटांत घालून सिंधूबाईंनीं या दोघांच्या मध्यें ठेवले.

मा०—हें काय ?

रा०—हे आपले दागिने मांडवशोभेस घेतले होते ते आपण घेऊन जा.

मा०—अं: ! दागिने का कोठें पळताहेत ! असूंद्या सध्यां, जरूर लागली तर पहातां येईल. सिंधूबाई, घेऊन जा हें ताट.

सिं०—आम्हांला जरूर लागेल तेव्हां आह्मीच आपल्याकडून आणूं. सध्यां कांहीं येथें ती रक्कम ठेवण्यास आह्मांस धीर होत नाहीं.

रा०—जरा पाहून घ्या.

मा०—होय पाहून घेतों. पण एव्हांच पोरीवरचे दागिने काढावे असें मला वाटत नाहीं. असूं द्या हो चार सहा महिने आणखी.

रा०—नकोत आतां येथें. आपण अनायासें आलां आहांत, जाऊंद्या ते आपल्या बरोबर.

माधवरावांस दागिने फार सौम्यतेनें हातीं आल्याचा फार आनंद झाला. त्यांनीं सगळे दागिने मोजून घेऊन ते निघून गेले.

हे दागिने सिंधूबाईच्या अंगावरून काढले तेव्हां आतां त्यांजपाशीं कांहीं राहिलें आहे कां पाहूं. ना-

कांत नथ नाहीं, कानांत बुगड्या नाहींत, गळ्यांत सरी नाहीं, पुतळ्याची माळ नाहीं आणि ती ठुशी नाहीं; पण दोन मंगळसूत्रें मात्र गळ्यांत आहेत, एक जुन्या चालीचें व एक नव्या चालीचें. नव्या चालीचें मंगळसूत्र कसें असतें तें आमचे वाचक रामचंद्रावास किंवा सिंधूबाईस विचारण्यास जाणार नाहींत, पण ते मला विचारतीलच विचारतील. मग त्यांनीं विचारल्यापूर्वींच आपण सांगिल्यास त्यांत काय वावगें आहे.

रामचंद्ररावांच्या नव्या कल्पनेचें हें मंगळसूत्र आणि चांदीचीं वेढणीं हे दागिने रामचंद्ररावांनीं स्वतःच्या खर्चानें व स्वतःच्या मेहनतीनें तयार करून नवरीस घातले. नवें मंगळसूत्र ही एक तोळा सोन्याची सुबक तयार केलेली डबी असून त्यावर हीं अक्षरें बारीक पण स्वच्छ दिसत असत. " माझ्या अंतकाळीं ही डबी उघडावी " ही डबी डांकानें मजबूत बंद केलेली होती व तींत एक लिहिलेला पातळ कागद होता. हा कागद व त्यावरील मजकूर आजपर्यंत कोणास कळलेला नव्हता व पुढेंही कळण्याचा संभव नाहींच. पण ग्रंथकर्ते म्हणजे पात्रांच्या बोचक्यांतले उंदीर असतात त्यांस तें सर्व माहित असतें. जी गोष्ट सिंधूबाईसहि माहीत नाहीं त्या गोष्टीचें विवरण ग्रंथकर्ता खुशाल आपल्या ग्राहकांकरितां जगापुढें ठेवतो.

पत्राची नक्कल.

मी रामचंद्रराव जर आपल्या प्रिय पत्नीच्या

तारुण्यांत मेलों तर माझ्या पत्नीनें पुनर्विवाह करावा अशी माझी इच्छा आहे. सर्व सुधारकांनीं या पत्रास मृत्यूपत्र समजून माझ्या इच्छा माझ्यामागें पूर्ण कराव्या. माझ्या हयातींत जर मी क्लीब, कोडी, वगैरे दुर्दैवेंकरून होईन तर तिच्या पुनर्विवाहाची सर्व तयारी मीच करीन. पण माझ्यामागें माझी इच्छा पूर्ण करण्याचें काम माझ्या भार्येचें व मित्रांचें आहे.

सही रामचंद्रराव.

अशा प्रकारचें मंगळसूत्र जुन्या चालीचे लोक कबूल करणार नाहींत; कारण तें मंगलकार्यांत अमंगलाचा भास करविणारें आहे असें ते मानतील; यासाठीं त्यांतील मजकूर रामभाऊंशिवाय कोणास माहित नव्हता.

हीं उभयतां असेल ती मीठभाकर खाऊन चैनींत आपला काळ घालवीत असतां रामचंद्ररावांचा बाप वारला. त्यानें जें मृत्युपत्र लिहिलें त्यांत लक्ष्मणरावांस आपल्या संपत्तीचा मालक केला व घर मात्र रामभाऊचे नांवावर करून दिलें. लक्ष्मणरावांस जी मिळकत मिळाली ती सरासरीनें घराच्या किंमतीचीच होती. पण तो रोकड पैसा व दागिने होते व घरही मातीरूप संपत्ति होती. बाकी त्यानें वांटणी करणें ती बरोबरच केली. पण हें वर्तमान रामचंद्ररावांस बिलकूल कळलें नाहीं.

रामचंद्ररावांची पुढें तीन महिन्यांनीं चित्र कलेंत परीक्षा होती त्यासाठीं त्यांनीं उत्तम चित्र काढलें होतें, पण रंगविन्यास लागणारीं हत्यारें व रंग

यांचा खर्च ३०० रुपये येणार होता व ही रक्कम तर रामभाऊंपाशीं नव्हतीच. इतर उमेदवार आपापलीं चित्रें रंगवूंही लागले; पण यांस तें साधन नसल्यामुळें एक मोठी काळजी उत्पन्न झाली. ते आपल्या श्रीमान मित्रांकडे जाऊन त्यांना ती रक्कम उसनी मागितली पण जो तो आपली हालाखी सांगे. शेवटीं पुण्यांतील आपल्या बापाची जी पेढी रानडयांचें दुकान त्यावर रानडयांस भीड घातली कीं एवढें माझें काम करा. पण ते ह्मणाले मी तुमच्या वडिलांस विचारल्याशिवाय तुह्मास पैसे देऊं शकत नाहीं. आज मी त्यांस पत्र लिहीन, त्याचें उत्तर एका महिन्यांत येईल, तेव्हां एका महिन्यानें तुह्मी मजकडे पुन्हां या.

हें ऐकून रामभाऊंचें धैर्य खचत चाललें. ते चित्रशाळेंत गेले आणि तेथील व्यवस्थापक वासुदेव गणेश जोशी यांस विनंति केली कीं, मला लागणारीं हत्यारें व रंग जर आपण मला द्याल तर परीक्षा झाल्यावर मी रंगविलेलें चित्र तुह्मांस देईन. त्यावर तो गृहस्थ बोलला, हत्यारें आह्मीं कारागिरांच्या स्वाधीन केलेलीं आहेत ते देतील तर आमची आडकाठी नाहीं. कारागीर कसचे देतात, त्यांसही परीक्षेंत बक्षीस मिळविण्याची उमेद होतीच, व सर्व कारागिरांची खातरी होती कीं, हा चितारी उत्कृष्ट असून वक्ता आहे. परीक्षकाबरोबरीनें हा खुर्ची लावून बसेल. आणि सगळें बक्षीस अर्थात् याला मिळणार. ही एक ईश्वरानें आमच्यावर मोठी कृपाच के-

ली कीं अशा आणीबाणीच्या वेळीं यास दारिद्र्यानें दटावलें. तात्पर्य तेथें त्याला नकार मिळाला. रामचंद्ररावांनीं आपल्याकडून होईल तितकी मेहनत केली, पण त्यांची अक्कल तेथें गुंग झाली. ते घरीं येऊन आपल्या खोलींत चिंताक्रांत बसले. सिंधूबाई कांहीं पुस्तकें व वर्तमानपत्रें वाचून आपली कर्मणूक करीत होत्या. या वेळीं सुमारें रात्रीं १० चा अंमल होता.

सिंधूबाईस रामभाऊंच्या उद्विग्नतेविषयीं कांहींच माहीत नसल्यामुळें त्या बराच वेळ रामभाऊंपाशीं गेल्या नाहींत. त्यांस वाटलें आज सगळा दिवस तळतळ तळतळ फिरणें झालें आहे. आपण जवळ गेल्यानें गोष्टीगप्पांनीं अधिक जागरण होईल. स्वारी एकटी असल्यास झोंप तरी येईल. पण रामचंद्ररावांची स्थिति आणीकच कांहीं होती. पुढील विचार त्यांच्या मनावर खेळूं लागले.

आला आला प्राणि जन्मासि आला ॥
गेला गेला बापुडा व्यर्थ गेला ॥

त्याप्रमाणें आपली स्थिति झाली आहे. वडिलांच्या जिवावर विद्या संपादन केली तिचा उपयोग व्हावा तसा झाला नाहीं. स्वतःच्या कारागिरीनें कलाकौशल्यांत बरीच निपुणता मिळविली पण तिचाही उपयोग होत नाहीं. दांत आहेत पण चणे नाहींत, चणें आहेत तेव्हां दांत नाहींत. जगांत यावें तर नांव ठेवून जावें. मी समजत होतों कीं, या हातीं घेतलेल्या धंद्यानें माझी खचीत कीर्ति होईल, पण

पहा काय चमत्कार कीं चित्रकारास लागणारीं ह-त्यारें सुद्धां मिळण्याची मारामार. आजपर्यंत अभ्यासाचे वेळीं पुष्कळ मिळालीं; पण आज त्या तपाचें फळ मिळण्याचा दिवस जवळ आला असून आज हत्यारें मिळत नाहींत. एकून आपलें जिणें व्यर्थ आहे. या जगण्यापेक्षां एव्हां मरणें बरें. अजून माझ्या लाडकीला नाहाण आलें नाहीं तोंपर्यंतच जर मी मेलों तर तिला पुनर्विवाहाला दुसरा वर तरी मिळेल. तिला नाहाण आल्यावर वर मिळण्यास मुष्कील पडेल. आपल्यापासून तिला सुख मिळेल ही आशा नाहीं. हे विचार झाल्यावर रामचंद्ररावांनीं मरण्याचा निश्चय केला. त्यांनीं स्वतः आपल्या हातांनीं एक पिस्तूल तयार केलें होतें त्यावर त्यांनीं आपलें नांव खोदलेलें होतें. या आपल्या आवडत्या पिस्तुलाकरितां त्यांनीं लेसनही घेऊन ठेवलें असून ते केव्हां केव्हां गांवाबाहेर जाऊन निशाण मारण्याचाही अभ्यास लग्नापूर्वींच करीत असत. म्हणून त्यांजपाशीं दारू व गोळ्या सतत संग्रहीं असत. दारू ते विकत आणीत पण गोळ्या घरीं करीत.

तें पिस्तूल त्यानीं काढून बिछान्यावर ठेवलें, हळूच जाऊन दार लावलें. त्यास कडी घातली आणि परत बिछान्यावर येऊन पिस्तूल गोळी घालून ठासून भरलें. कान्यावर टोपी ठेवली आणि छातीकडे रोख धरून ते ईश्वराचें शेवटीं स्मरण करीत आहेत तों सिंधूबाईनीं दारावर थाप दिली. ती ऐकल्याबरोबर रामचंद्ररावांनीं पिस्तुलाची टोपी काढून तें

बिछान्याखालीं घालून ठेवलें आणि आपल्या प्रियेच्या दर्शनास उत्सुक होऊन त्यांनीं दाराची कडी काढली.

सिंधूबाईचे हातांत वर्तमानपत्र आणि डोळ्यांत आंसवें पाहून रामभाऊ घाबरले. त्यांस वाटलें कीं, आपण केलेलें कृत्य पाहून या साध्वीस आपल्या पुढल्या वर्तणुकीचा संशय आला असला पाहिजे ह्मणून ही रडत मजकडे येत आहे. पण सिंधूबाईस खोलींतील प्रकार मुळींच माहीत नव्हता. त्यांचें मन दुसऱ्याच गोष्टीनें दुखावलें होतें.

ती गोष्ट अशी होती कीं, त्या वाचीत असलेल्या वर्तमानपत्रांत ब्रम्हदेशांतील बंडाचा या सदराखालीं कित्येक लोकांचे मृत्यु लिहिले होते, त्यांत सिंधूबाईच्या सासऱ्याचें नांव तिच्या दृष्टीस पडतांच तिला दुःख वाटलें व तें वर्तमान रामचंद्ररावांस सांगण्यास त्या पुढें येऊन वर्तमानपत्र त्यांचे हातांत देऊन त्या विशेष नांवावर बोट ठेवून त्या ह्मणाल्या. हें मामंजींचेंच कां नांव आणि हुद्दा? रामभाऊंनीं हो म्हणून सर्व मजकूर वाचला. तेव्हां त्यांनाहि वाईट तर वाटलेंच पण आंतून एक धीर आला तो हा कीं, वडिलोपार्जित संपत्तीची आतां थोडी बहुत वांटणी आपल्यास मिळेल व आपलें चित्र एक वेळ रंगून जगापुढें जाईल. त्यांनीं सिंधूबाईस निजायास सांगून आपण पत्र लिहावयास लागले. तरी सिंधूबाई न निजतां रामभाऊंच्या मागें बसलेल्या होत्या. हें पत्र त्यांनीं लक्ष्मणरावांस लिहिलें होतें. पत्र लिहून झाल्यावर बंद

करतांना त्यांचे ध्यानांत आलें कीं, या वेळीं पत्र काम करणार नाहीं. लक्ष्मणास तार दिली पाहिजे. म्हणून त्यांनीं लगेच उपरणें अंगावर टाकून डोक्यावर एक टोपी ठेवली. दोन रुपये कडोसरीस लावून हातांत काठी घेऊन ते तडक तार घरांत जाऊन त्यांनीं तार दिली. त्या तारेंतील मजकूर ऐवढाच होता कीं, " वडील वारले. क्रियाकर्मांतराकरितां तूं येथें आल्यास दोन ठिकाणीं करावयास नलगे. "

या तारेचें उत्तर उजाडण्यापूर्वीच आलें कीं, क्रियाकर्मांतर सर्व विधि येथें आटपला. तेव्हां अर्थात रामचंद्रराव मोकळे झाले. सकाळीं स्नान संध्या करून तें वर्तमानपत्र आणि लक्ष्मणरावांकडील तार घेऊन ते तडक रानड्यांच्या वाड्यांत गेले आणि त्यांस वडील वारल्याचें वर्तमान सांगितलें. पूर्वींच त्यांस माहीत झालें होतें. पण त्यांनीं रामचंद्ररावांस साफ सांगितलें कीं, आमच्यापाशीं तुमच्या वडिलांची कांहीं जमा नाहीं. असती तर देतों. त्यावर रामचंद्रराव म्हणाले माझ्या पतीवर तरी ३०० रुपये द्या. रानडे म्हणाले तुमचा आमचा व्यवहार अजून झालेला नाहीं; याकरितां एवढी रक्कम हातावर देणें आम्हांस शोभत नाहीं. अलबत सोनें ठेवलेंत तर आम्हीं देण्यास तयार आहों. व्यवहारास चोख असलें पाहिजे. रामभाऊ नंतर चार पांच जागीं जाऊन त्यांनीं विनंत्या केल्या, पण सर्व विनंत्या व्यर्थ झाल्या. तेव्हां ते परत आले. त्यांनीं ही अडचण सिंधूबाईस कळविली नव्हती, म्हणून या संब-

घानें तिला तिळमात्र काळजी नव्हती. तो दिवस सुतकाचा होता म्हणून सिंधू म्हणाली. ".आजपासून आतां ३ दिवस स्वस्थ बसून रहा, कोठें जाऊं येऊं नका." त्याप्रमाणें रामभाऊंनीं मान्य करून ते पुढील २ दिवस घरांतच होते. तिसऱ्या दिवशीं पुन्हां ते रुपयांचा यत्न करूं लागले, पण डाळ शिजली नाहीं. तेव्हां त्यांस एक विचार सुचला कीं, वडिलांच्या मालमिळकतींतील कांहीं ऐवज लक्ष्मणाच्या हातीं आला असला पाहिजे. कदाचित् नसला आला तरी येईल; याकरितां ३०० रुपयांस कांहीं तो महाग नाहीं. आजपर्यंत वडिलांच्या धाकामुळें त्याचे जवळ मदत मागितली असती तरी तो देताना. पण आतां खचित देईल. आपण भलत्या ठिकाणीं तोंडें वेंगाडलीं त्यापेक्षां त्याजवर शब्द टाकला असता तर एकदम काम होतें. म्हणून त्यांनीं तात्डतोब लक्ष्मणरावांस मागणीचें पत्र लिहिलें. त्यावर लक्ष्मणरावांचें उत्तर आलें कीं, रोकड पैसा मजपाशीं नाहीं. दागदागिन्याचा बंदोबस्त माझ्या लग्नाकरितां परस्पर केला आहे. ( जेवणाखाणाचा,कपडचालत्यांचा व पुस्तकांचा वगैरे खर्च परस्पर ३ वर्षांचा बोर्डिंग मास्तरास भरलेला रामभाऊंस माहीतच होता. )बाकी वडिलांचें सामानसुमान व सरकारांतून येणारा पैसा अजून आला नाहीं यामुळें मी लाचार आहें.

हें पत्र आल्यावर रामचंद्ररावांचें धैर्य खचलें व पुन्हां पूर्ववत् विचार त्यांचे मनांत येऊन ते आपल्या मागील प्रयोगास प्रवृत्त झाले. पण सिंधूबाई आज

वाचीत न बसतां जेवणें आटोपल्यावर रामचंद्ररावां-च्या खोलींत येऊन बसल्या असल्यामुळें हें कृत्य करण्यास त्यांस एकांत मिळेना. म्हणून त्यांनीं सिंधूबाईस म्हटलें; कां आज नऊ वाजले नाहींत तोंच कशा कामांतून मोकळ्या झालांत ?

सिंधू०—मोकळी कसली, काम पडलें आहे, पण आतां आला कंटाळा; चूलपोतेरें करीन सकाळीं म्हणजे झालें.

रा०—सकाळीं मला जेवून लौकर बाहेर जावयाचें आहे तें नाहीं जमतसें दिसतें.

सिं०—कां ? किती वाजतां आपल्याला जावयाचें आहे ? मीं सहा वाजतां पाहिजे तरी तयारी करीन.

रा०—माझ्याकडे माझा एक चितारी मित्र येणार आहे, त्यास दहा वाजतांचा वेळ मीं सांगून ठेवला आहे. तो आल्यावर तास दीड तास तरी येथें बसेल; म्हणून मीं म्हटलें, तुम्हांस मग उठून आंत जावें लागेल; त्यापेक्षां आतांच मी विनंति करितों. तुम्हीं जर स्वयंपाक घरांत निजलां तर तुम्हांस ही तकलीफ होणार नाहीं व आम्हींहि घटका अर्धी घटका अधिक बसलों तरी फिकीर राहणार नाहीं.

सिंधूबाईची खात्री होती कीं, रामचंद्रराव दुर्वर्तनी मनुष्य नव्हत, तरी स्त्रीधर्माच्या विनयान्वयें त्या हांसत हांसत म्हणाल्या " चितारी मित्र आहे कीं, चित्र मित्र आहे ? "

रा०—म्हणजे—

सिं०—कांहीं नाहीं. तो आपला विनोद केला.

रा०-पण विनोदाचा तरी अर्थ समजणें जरूर आहे.

सिं०—मीं म्हटलें मित्र आहे कीं मैत्रीण !

रा०—जिवलगे, तुझें रूप आणि तुझे गुण पाहून मी गुंग होत असतों आणि असा अधमपणा माझ्यानें होईल वरें ?

( हे शब्द रामचंद्रराव उच्चारीत असतां त्यांचे डोळे पाण्यानें भरून आले. कारण त्यापेक्षांही अधमपणाचें काम करण्यासांठीं ते संधि पहात होते. )

सिं०-इतकें वाईट वाटायास नको. मी विनोद केला हें अगोदर बोलून चुकल्यें आहें.

रामचंद्ररावांनीं सिंधूबाईचा हात धरून त्यांस मांडीवर बसवून घटकाभर शेवटची भेट समजून सर्वांगावरून हात फिरविला. आणि ते तिच्याशीं गोड गोड गोष्टी बोलत वसले.

इतक्यांत दहांचा ठोका ऐकूं आला. ते तास दोघांनीं लक्ष्य देऊन, मोजले आणि सिंधूबाई झटदिशीं उठल्या आणि आपल्यासाठीं आंथरुणांतून चिरगुटें काढूं लागल्या.

रा०—काय वेळ गेला, मला वाटलें नऊ वाजले असतील पण दहा ते.

सिं०—तो चितारी येण्याची वेळ आहे. मी जातें आतां.

रा०—तुला भय तर नाहींना तिकडे एकटीला वाटणार?

सिं०—शेजारीं गोदूसासूबाई रात्रभर खोकत असतात तीं मला सोसतच आहे. आणि झालें मध्यें जागी तर येईन इकडे ह्मणजे झालें.

जातां जातां रामभाऊंनीं एक वेळ उठून आपल्या प्रियपत्नीस दृढ आलिंगन देऊन चुंबन घेतलें. केंसांवरून हात फिरवून हनुवटी धरून थोडा वेळ मुखावलोकन करून, शेवटीं थोडीं पावलें त्यांस पोंचवून ते परत येऊन आपल्या बिछान्यावर बसले.

थोडा वेळ गेल्यावर ते पुन्हां उठून आंत गेले. पाहतात तों सिंधूबाई निजली आहे. जवळ समई तेवते आहे. चुलींत मांजर बसलें आहे. शेजारची ह्मातारी खोकते आहे. असें पाहून हे परत आपल्या खोलींत आले, आणि दोन पत्रें खरडलीं. एक पुनर्विवाहोत्तेजक मंडळीस आपल्या पत्नीस साहाय्य करण्यास, व दुसरें सिंधूबाईस. नंतर पिस्तूल भरलेलें तयारच होतें तें हातांत घेऊन त्यावर टोपी चढविली. चापावर हात ठेवून त्याचा रोख छातीकडे करून ते ईश्वराची स्तुति करूं लागले. इतक्यांत रस्त्याकडच्या दारावर कोणी थाप मारल्याचें रामचंद्रावांनीं ऐकिलें. पुनः कानोसा दिला तों खडाखड दारावर कोणी धक्के मारीत असल्याची त्यांची खातरी झाली. मग त्यांनीं पिस्तुलावरची टोपी काढून तें त्यानीं बिछान्याखालीं घालून ठेवलें, आणि दाराकडे जाऊन दार उघडलें. दार उघडून ते बाहेर पाहतात तों एक मोठ्या पागोट्याचा उंच वृद्ध मनुष्य येथें उभा असलेला पाहिला. तो एक शब्दही न बोलतां

घरांत शिरला. रामभाऊंच्या खोलींत खुर्ची वगैरे नव्हती याकरितां तो रामभाऊपुढें उभा राहिला. रामभाऊंस मोठा चमत्कार वाटला. रामभाऊंनीं या गृहस्थास पहातांच ते आपले वडील आहेत असें त्यांस वाटलें. या गृहस्थाचें रंग रूप रामभाऊंच्या वडिलांप्रमाणें असून पोषागही तसाच होता. ह्मणून ते विस्मित झाले कीं, वारल्याची खबर जगजाहीर झाली असून हे जिवंत अजून आहेत. या विचारामुळें रामभाऊंस त्यांच्या नजरेस नजर मिळवितां येईना. कारण वडिलांचा धाक फार असल्यामुळें रामचंद्ररावांच्या डोळ्यांत त्यांजपुढें इतकी अदब नेहमीं राही.

**रामचंद्रराव**—बसा बिछान्यावर.

**नवा**—आपण बसा.

—दोघे बसले.

**रा०**—वर्तमानपत्रांत मीं ब्रम्हदेशाच्या दंग्यासंबंधीं लिहिलेल्या मजकुराकडे पाहून मला फार दुःख झालें. आणि लक्ष्मणाच्या तारेवरून माझी त्या गोष्टीविषयीं तर अगदींच खातरी झाली. ( हें पत्र आणि तार पुढें करतात. )

**नवा**—हो तें मींहि वाचलें आहे म्हणून मी आपल्याकडे आलों आहें.

हे शब्द रामचंद्ररावांनीं ऐकून ते आपले वडील नसल्याचें त्यांच्या ध्यानांत आलें. पण खातरी होईना म्हणून ते म्हणाले मला आपण बाबाच आहां असें वाटलें.

**नवा**-गोष्ट खरी. माझा चेहरा आणि आपल्या

वडिलांचा चेहरा सारखा असून पोषाग व वय हीं साधारणतः सारखीं असल्यामुळें पुष्कळ लोक तुम्हांप्रमाणें फसले आहेत. तुमचे वडील माझे परम मित्र असून आम्ही दोघे एकाच दप्तरांत काम करीत होतों. मला नुक्तेंच पेनशन मिळालें म्हणून ब्रम्हदेशाची सफर चुकली. पण आम्हां उभयतांची ४ वर्षांत भेट नसून ते परलोकवासी झाल्याचें ऐकून मला वाईट वाटलें. म्हणून त्याची जी प्रत्यक्ष प्रतिमा आपण आहां तिचें तरी अशा प्रसंगीं दर्शन व्हावें म्हणून मी मुद्दाम आलों आहें.

**रा०**—मोठी मेहेरबानी केलीत.

**नवा**—अहो, तुमची आमची ओळख नाहीं म्हणून तुम्ही मेहेरबानी समजतां. पण जर का तुमचे वडील असते तर आम्ही दोघे कडकडून भेटलों असतों, आणि मागल्या गोष्टी आठवून हांसलों असतों रडलों असतों, दोघांच्या चेहऱ्यांवर भयंकर परिणाम झाले असते. ते तुम्हांस म्हणजे ज्या लोकांस त्या गोष्टी माहीत नाहींत त्यांस चमत्कार वाटून तुम्हीं पोटें धरधरून हांसलां असतां. पण काय करूं ईश्वरानें तो योगच आणला नाहीं.

**रा०**—नशीव आमचें ! ! त्या ईश्वराच्या सत्तेपुढें आमच्या इच्छा त्या काय बापड्या ! ! !

**नवा मनुष्य**—अहो तुम्हास एक लहानशी गम्मत सांगतों त्या गृहस्थाची. तो शूर खरा. जनरल रॉबर्टबरोबर आफगाणिस्थानांत आम्ही दोघे होतों एके दिवशीं साहेबानें ५ लाख खजिना उंटावर भ-

रून ते स्वतः बरोबर असून त्या खजिन्याच्या संरक्षणाकरतां १०० हत्यारबंद माणसें होतीं. बरोबर आम्ही कमिसारियटचे दोघे कारकून व कांहीं मजूर वगैरे सर्व संख्या २०० चे आंत होती. इतक्यांत ५०० हत्यारबंद पठाणांचा घाला त्या खजिन्यावर पडला. पुढून पठाण येतात हें पाहून त्या चतुर साहेबानें एकदम हुकूम दिला कीं, खजिन्याच्या थैल्या सोडून रुपये पसरून टाकावे व सर्व माणसांनीं खजिन्यापासून दूर चालतें व्हावें. त्याप्रमाणें भराभर पिशव्यांचीं तोंडें सोडून रुपये जमिनीवर ओतून सर्व लोकांनीं मागें पळ काढला. तेव्हां तुमचे वडील सर्वांस हाक मारून म्हणाले आम्ही जगलों कीं मेलों ? तेव्हां मला हांसूं आलें. मी म्हणालों ही कां थट्टेची वेळ काहो ? त्यावर तुमचे वडील म्हणाले आपल्या आयुष्याचा ज्याला विमा उतरणें असेल त्यांनीं तो उतरण्यास ही वेळ उत्तम आहे. मी प्रत्येक प्राण्याचा शंभर रुपयांस विमा घेतों. जितके लोक जगतील त्यांनीं मला उद्यां १००।१०० रुपये द्यावे आणि जितके मरतील तितक्यांच्या वारसास मी १००।१०० रुपये देईन. त्यावर मीं म्हटलें तुम्हीच मेला तर ही देव घेव कोण करील ? तेव्हां सर्वजण हांसूं लागले. इतकीं आमचीं हीं भाषणें चाललीं आहेत इतक्यांत रॉबर्ट साहेबांनीं शिपयांस उभें रहाण्यास हुकूम दिला आणि त्यांचीं तोंडें मागें फिरविलीं. पाहतों तों तेथें त्या रुपयांवर सर्व पठाणांची टोळधाड पडली होती. ते मूर्ख लोक लोभांत येऊन आपल्या शत्रूंस मारण्याचें

सोडून, ते रुपयांवर पडलेले पाहून रावर्ट साहेबांनीं गोळ्या सोडण्यास आपल्या शिपायांस हुकूम दिला. चमत्कार काय झाला, १० मिनिटांत एक पठाण जिवंत राहिला नाहीं. आणि ते सर्व रुपये जसेचे तसे पुन्हां पिशव्यांत भरून आम्हीं आपल्या मुक्कामीं सुरक्षित पोंचलों. रुपयांचा रंग मात्र बदलला होता. कारण पठाणांच्या रक्तानें ते भरले होते. ते ठिकाणावर पोंचतांच तेथें धुण्याचा कारखाना सुरू झाला. धुवून मोजून पैसा खजिन्यांत टाकतांना प्रत्येक माणसास रावर्ट साहेबानें १००।१०० रुपये बक्षीस दिलें. तेव्हां तुमचे वडील सर्वांस थट्टेनें म्हणाले हे शंभर शंभर रुपये सर्वांबद्दल साहेबांनीं मला द्यावे. मीं सगळ्यांचा विमा घेतला होता. त्यावर साहेब हांसले. पुढें कांहीं दिवसांनीं बोलानांतून आम्हीं जात असतां आमचीं तट्टें बरींच मागें राहिलीं. आम्हांस साहेबाचा हुकूम होता कीं, पलटण सोडून दूर कोणी राहूं नये. पण आपले वडील मोठे गमती होते. ते नकला करीत करीत चालले असल्यामुळें पलटण बरीच पुढें गेल्याचें आमचे ध्यानीं आलें नाहीं. वेळ तीनसांजची आणि रस्ता लहानशा एका नदीच्या कांठावरून जात होता. तेव्हां आपले वडील मला म्हणतात, ही नदी, स्नानसंध्येस किती उत्तम आहे. स्वच्छ दगडांवरून निवळ पाणी कसें खुळखुळ वाजतें आहे, चला आपण या पवित्रस्थानीं बसूं. मीं म्हटलें, गृहस्था हें का इंग्रजी राज्य आहे ? कीं हिंदुधर्म संरक्षक क्षत्रियांचें राज्य आहे ? एखादा पठाण

आला कीं वळेल बोबडी ! त्यावर त्यांनीं आपला आग्रह चालविला. पण मीं त्यांचा आग्रह चालूं न देतां त्यांच्या घोड्यास दोन आणि माझ्या घोड्यास दोन कोरडे मारून पळ काढला. पण वाट वाईट वेळ संध्याकाळची, यामुळें घोड्यास वारंवार ज्या ठोंकरा बसत तेणेंकरून आम्हांस पडण्याचें भय वाटूं लागलें; तरी आम्हीं घोड्यांची किंवा आमच्या पडण्याची काळजी न करतां टप्पा गांठण्याचा निश्चय केला. तुमच्या वडिलांचें घोडें पुढें असून माझें त्यांच्या मागोमाग होतें. त्यांच्यापाशीं चाबूक नव्हता. घोडें हाकण्याचें काम वारंवार मलाच करावें लागे. माझ्या चाबकाची वादी तुटून कोणिकडे उडाली कोण जाणें. तेव्हां चाबकाची लहानशी मूठ घोडा हांकण्यास अगदीं निरुपयोगी झाली. तुमचे वडील माझ्या अंगावर ओरडत कीं, माझ्या घोड्यास लगवा कोरडे. तेव्हां मीं ती मूठ त्यांचे हातीं देऊन दोघे हांसूं लागलों. तेव्हां तुमचे वडील मला पहा म्हणाले. मग नदींत उतरून एखादी कण्हेरीची छडी तरी काढा. त्या बोलान रस्त्याचे डोंगरावर कोठकोठें कडव्या बदामाचे मात्र वृक्ष आढळतात. बाकी गवत व झुडपें डोंगरांवर बिलकूल नाहींत. पण नदींत कोठें कोठें कण्हेरीचीं झुडपें आढळतात. शेंपन्नास पावलें आह्मी पुढें गेलों तों एक झुडूप आमच्या दृष्टीस पडलें. त्याबरोबर तुमच्या वडिलांनीं मला म्हटलें घोडा उभा करा मी दोन काठ्या जाऊन आणितों. म्हणून मीं घोडें

उभें केलें. आणि ते झुडपाजवळ जाऊन पहातात तों तें झुडूप १० पावलें मागें हटलेलें. माझ्या लक्ष्यांत आलें म्हणून दगा रे दगा म्हणून मी मोठ्यानें ओरडून भरलेल्या बंदुकीवर टोपी चढवून घोड्याखालीं उतरलों. तुमचे वडील जागच्याजागीं उभे राहिले. इतक्यांत त्या झुडूपानें एक गोळी माझ्यावर टाकली ती ही माझ्या दंडांत भरली. ( रामचंद्ररावांस वण दाखवितात ) त्या बरोबर त्या झुडपावर तुमचे वडील तलवार घेऊन धांवले. इतक्यांत मला लागलेल्या गोळीची पर्वा मीं न करतां झुडपावर बंदूक सोडली. पण आमचें दुर्दैव पुढें उभें राहिलें. तितक्या संधींत तुमचे वडील माझ्या गोळीच्या आणि झुडपाच्या मध्यें असून त्या झुडपास तर त्यांनीं छाटलें; पण माझी गोळी तुमच्या वडलांच्या मांडींत घुसली. आणि ते खालीं पडले. मी तलवार उपसून जों पुढें गेलों तों तुमच्या वडिलांचा आवाज ऐकिला. ते म्हणाले पठाणास मीं मारला आणि आतां तुम्ही मला माराल. मीं त्यास हाक मारून त्यांच्या सुखरूपतेविषयीं प्रश्न केल्यावर त्यांनीं उत्तर दिलें कीं, तुमची गोळी माझ्या मांडींत लागून मी जखमी झालों आहें. मींही आपल्या हातांत गोळी लागल्याचें त्यांस सांगितलें आणि त्यांच्या अंगावर मी डोकें टेंकून पडलों. माझ्या हातांतील रक्तस्त्रावानें मी थोड्याच वेळानें बेशुद्ध पडलों. पण तुमचे वडील बडे हुशार. त्यांनीं मांडी पूर्वींच घट्ट बांधली होती. त्या प्रमाणें माझ्या हाताची जखम

चांचपून तीहि बांधली. पहाटेस मी शुद्धींत आलों आणि दोघेजण बोलत पडून राहिलों होतों. बंदुकांचा आवाज झाल्यामुळें आमची गवती तट्टें कोणीकडे उडालीं आणि त्यांची काय वाट झाली कोण जाणे. सकाळीं झुंजूक झुंजूक दिसूं लागलें तेव्हां वाटेवरून चार पांच झुडपें चालतांना आमच्या दृष्टीस पडलीं; पण त्यांची नजर आम्हांवर गेली नाहीं. झुडपांचा अर्थ तुमच्या ध्यांनात आलाना ?

रा०—झुडपें असें तुम्हांस अंधेरांत भासे पण तीं माणसें असत असें मी अनुमान करतों.

नवा०—गोष्ट सत्य. अंधेरांतच आम्ही त्यांस झुडूप म्हणत नव्हतों तर चांदण्या रात्रीं सुद्धां आमचें मत तेंच असे. कारण हे पठाण इंग्रजी पलटणीस फसविण्याकरितां अंगाला डाहाळ्या बांधून झुडपाचें रूप धारण करतात आणि मोका पाहून गोळी सोडतात. ही गोष्ट सर राबर्ट साहेबांनीं आम्हांस पूर्वींच सांगून ठेविली होती. आम्ही दुसरा दिवस तेथेंच पडून राहिलों होतों. पाण्याची विपुलता होती पण अन्न नाहीं. टाहळे बांधलेला पठाण आमच्या जवळ मरून पडलेला असल्यामुळें आम्हांस तेथें राहणें भयंकर वाटूं लागलें. म्हणून आम्ही त्याच्या प्रेतापासून शंभर पावलें दूर जाऊन पडलों. दुसरी रात्रही निघून गेली. थंडी फार, बर्फ पडतें आहे, चंद्रोदय नुकताच होऊन त्याचे किरण नदीच्या स्वच्छ पाण्यावर परिवर्तन पावून आमच्या डोळ्यांस आनंदवीत आहेत, या वेळीं पहाटेचे पांच

वाजले. मजपाशीं आंधेरांत आंकडे दिसणारें घड्याळ होतें. तें काढून पाहतां पांच वाजून दोन मिनिटांवर कांटा होता. तेव्हां आम्ही एका मोठ्या दगडास टेंकून बसलों होतों, इतक्यांत बंदुकीचे दोन आवाज आमच्या कानावर व गोळ्या छातीवर येऊन पडल्या. तुमचे वडील गमतीच होते. असें नाहीं, तर ते मोठे युक्तिवान असत. त्यांनीं एक पिशवी शिवून त्यांत पोळ्या भाजण्याचा तवा घालून ती पिशवी ते गळ्यांत घालीत असत व त्याप्रमाणें पुष्कळ लोकांनीं जाड जाड तवे तसे बांधण्याचें सुरू केलें. या तव्यांचा उपयोग दुसऱ्या कोणास केव्हां व कसा झाला हें माझ्यानें सांगवत नाहीं, पण या वेळीं ज्या गोळ्या आमच्या छातीवर बसल्याचें सांगितलें त्या या तव्यांमुळें संभाळल्या गेल्या. गोळ्या लागल्यावरोबर आम्ही चुपचाप राहून मुद्दाम मेल्याचें मीष करून खालीं पडलों, इतक्यांत १० असामी आमच्या सभोंवार जमले. तेव्हां फटफटीत उजाडलें होतें. त्यांत जो मुख्य होता त्यानें येऊन माझ्या छातीवर आपल्या बंदुकीचा कुंदा मारला. तेव्हां त्या तव्यावर तो पटकन् वाजला. तेव्हां तुमचे वडील म्हणाले—काय लवंडीचे मराठे ! मुडद्यांची शिकार करताहेत हे ! तेव्हां नाईक म्हणतो अरे वामन रे वामन. हे आपल्या साहेबांचे ज्या वामनांच्या छातीवर तवे बांधलेले असतात. तींच हीं बामनं

दुसरा म्हणाला—काय राव, विरामन् ? आनि

त्यांसनी काय झालंय्? ते कसे इथ आल्यात?

तेव्हां त्या लोकांनीं आम्हांस नीट बसवून आमची हकीकत ऐकल्यावर आमच्या डोक्याचे रुमाल घेऊन त्यांच्या झोळ्या करून डोलीप्रमाणें त्यांचा उपयोग करून प्रहर दिवसास शारीघच्या छावणींत सर रावर्ट साहेबांच्या तंबूत नेऊन पटकले. मग डाक्तरी उपायांनीं आम्हां दोघांसही आराम पडला. असे असे वाबा आम्हांवर शेंकडो प्रसंग गुदरले, पण आमची प्रत्येक प्रसंगीं एकी असे. तीं ही चार वर्षें आम्ही वेगळे झालों. मला बायका मुलें कांहीं नाहींत. घरांत एक संन्यासी ठेविला असून मी त्या सत्पुरुषाच्या सेवेंत आयुष्य घालवीत आहें. म्हणून मला दिवसा वेळ वाहेर जाण्यास मुळींच मिळत नसून जर तुमच्या सारख्यांस भेटणें असेल तर महाराज निजण्याचें वेळीं त्यांची आज्ञा घेऊन मी वाहेर जात असतों. त्याप्रमाणें मी आज आपल्या भेटीस आलों आहें. यासाठीं तुम्हीं सर्व स्थिति मला कळवावी, अशी माझी आपल्यास विनंती आहे. आपण कलाकौशल्याचें काम चांगलें करतां असें माझ्या ऐकण्यांत आलें आहे. तर आपली हकीकत मला कळवून माझें समाधान करावें.

रा०—आपण माझ्या बाबांच्या जागीं मला आहां त्या अर्थीं मीं आपल्यास एक दिवस येथें रहाण्याचा आग्रह केला तर आपण नाकारणार नाहीं अशी मला उमेद आहे. मी एका सद्गुणी स्त्रीशीं लग्न केलें आहे त्यावेळीं आपली मला माहीती नव्हती;

नाहींतर लग्नास आपणास बोलाविलें असतें. पण उद्यांचा दिवस आपण येथें राहिल्यास सर्व वृत्तांत आपल्यास ओघाओघानें कळेल.

**नवा**—रामचंद्रराव, आपलें घर मला बिलकूल परकें नाहीं. मी येथें नेहमीं सुद्धां राहिलों असतों; पण विठ्ठलवाडी हें गांव कसें आहे तें आपण जाणतांच तर तेथें त्या संन्याशांस ठेवून मीं येथें राहणें चांगलें नाहीं. तें जरी पुण्याहून दूर नाहीं तरी महाराजांस एकाद्या वस्तूची जरूर लागल्यास ते संकोच करतील. आणि माझी त्यांस जरूर पडल्यास ते येथें मनुष्य तरी पाठवितील कीं नाहीं, याचा मला संशय आहे; करितां स्वामी उठण्यापूर्वीं मला त्यांच्या पायांपाशीं पोंचलेंच पाहिजे.

**रा०**—आपण काढलेलीं चित्रें, आडकित्ता, पिस्तूल, तांब्यापंचपात्री, एका मळसूत्रानें जोडतां येण्यासारखें एक भांडें, एक दुपाती चाकू, एक आगकाड्यांची पेटी, व एक पंखा इतकें सामान त्या म्हाताऱ्यास दाखवून हें सर्व मीं घरीं केलें आहे असे ते म्हणाले. तेव्हां म्हातारा फार खूष होऊन त्यांतील कांहीं चित्रें त्यानें निवडून घेतलीं आणि हीं मला पाहिजेत असें तो बोलला.

**रा०**—आपल्यास मीं या सर्व चिजा देण्यास खूष असून आणखीही उद्यां एक चित्र काढून देण्याचें योजिलें आहे.

**नवा०**—तें कसलें ?

**रा०**—जी आपण बोलून रस्त्यावरील आपल्यावर

व माझ्या बापावर प्रसंग गुदरल्याची गोष्ट सांगितली तिचें.

**नवा०**–हां हां ! वारे वा ! धन्य आहां तुम्ही आणि तुमच्या कला ! !

हीं भाषणें होत असतां एका कागदावर रामभाऊंचा पेनसलीचा हात सारखा चालू होता. पण म्हाताऱ्याच्या लक्ष्यांत असें आलें कीं, हाताचे चाळे करण्याचा जसा कित्येकांस नाद असतो तशा प्रकारची या गृहस्थास खोडी असावी. पण थोड्या वेळानें तें चित्र रामभाऊंनीं आपल्या पूज्य म्हाताऱ्यापुढें करून दिल्याची वात सारली. त्यानें पहातांच त्याची खात्री झाली कीं, त्या प्रसंगाचें चित्र यानें १० मिनिटांत काढलें हें चित्रही त्यानें आपल्याजवळ घेतलें आणि खिशांतून एक हजार रुपयांची नोट काढून ती त्य सर्व चित्रांची किंमत म्हणून रामभाऊंच्या हातांत दिली.

**रा०**–हें काय ?

**नवा०**–अहो, ही या चित्रांची किंमत समजून मीं आपल्यास दिली आहे.

**रा०**–वा ! वा ! मीं आपल्यापासून किंमत घेणें वाजवी नसून चित्रांची किंमत फार तर १ रुपया होईल न होईल ! !

**न०**–छे, छे, छे, छे, या चित्रांची किंमत याहूनही अधिक आहे. पण माझी योग्यता पाहून मी ती अगदीं स्वस्त किंमतीस घेत आहें.

**रा०**–ती माझी फक्त दोन तासांची मेहनत आहे. आणि त्या माझ्या दोन तासांस आज एक रुपया

किंमत पुरती येत नाहीं.

न०—गोष्ट खरी, पण शिकण्याच्या मेहनतीची व शिकण्यास लागलेल्या वेळाची किंमत काय बरें आहे? डाक्तरलोक एक पैशाच्या तुरटीचें घागरभर पाणी करून त्या पाण्याच्या एका बाटलीस १ रुपया किंवा दोन रुपये घेतात ते कांहीं त्या तुरटीची किंवा त्याच्या त्या मिनिटांची किंमत नव्हे; तर शिक्षणाला लागणाऱ्या श्रमाची व काळाची ते ती किंमत घेतात. त्यांस पुष्कळ तरी तशीं गिऱ्हाइकें मिळतात. म्हणून त्यांची तृप्ति २ रुपयांत होते. जर त्यांस गिऱ्हाईक क्वचित् मिळतें तर त्या बाटलीभर तुरटीच्या पाण्यास त्यांनीं १,००० रुपये घेतले असते तरी अन्याय म्हणतां आला नसता.

रा०—पण मला त्या चित्रांची आपल्याकडून किंमत नको.

न०—मी आतां माझें धन देऊं तरी कोणास? माझ्या पोटा पुरतें पेन्शन सरकार मला देत आहे. माझ्यामागें खाणारा कोणी नाहीं. त्यापेक्षां तुह्मीं जीं माझ्या जीवलग मित्राचीं तीन मुलें तीं मीं माझीं समजून मीं आपली शिल्लक तुम्हांसच देण्याचा निश्चय केला आहे. पण त्यांत विचाराविचार म्हणून काय तो एवढाच आहे कीं, तुम्हां तिघांस मिळून मी दहा हजार रुपये देणार, पण ज्याच्याजवळ माझ्या पैशाचा खरा सदुपयोग होईल त्यांस ८,००० देईन आणि बाकी दोघांस एकेक हजार देईन. यासाठीं तुम्हांस चित्रांच्या मिषानें मी १००० रुपये देऊन

चुकलों. बाकी रकमेचा आतां लवकरच विचार करीन.

रामभाऊंनीं परीक्षेकरतां काढलेलें चित्र आणून त्या गृहस्थापुढें ठेवलें आणि म्हणाले—ज्या अर्थीं आपण हजार रुपयांचा संकल्प मला पूर्वींच केला आहे, त्या अर्थीं मी आपली हकीकत तुम्हांस थोडक्यांत सांगतों. या चित्रास रंगविणें ३०० रुपयांचें काम होतें, पण ती रकम मला मिळत नसल्यामुळें तें रंगविण्याचें तसेंच राहिलें आहे. आज आपण ज्या अर्थीं मला ही देणगी दिली त्या अर्थीं मी हें चित्र पांचशें रुपये लावून उत्तम रंगवीन आणि तें पुण्यास आक्टोबरांत प्रदर्शन होणार आहे तेथें नेऊन ठेवीन आणि आपलें नांव मोठ्या अक्षरांनीं त्या चित्राच्या डोक्यावर रंगवून आपल्या साहाय्यानें तें चित्र तयार झाल्याचें जगास कळवीन.

न०—शाबास पुत्रा, धन्य तुझ्या मोठेपणाची; तुला आपल्या नांवापेक्षां माझें नांव प्रसिद्ध करण्याची इच्छा झाली याबद्दल मी तुझा आभारी आहें. मी तुला आजपासून पुत्र समजेन. मला अपत्य नसल्यामुळें माझ्या मागें चार दिवस सुद्धां माझें नांव राहील अशी मला उमेद नव्हती. पण तूं या कृत्यानें तें नांव मागेंही ठेवशीलसें दिसतें. (डोळ्यांस पाणी येतें.)

रा०—काका, पुण्याच्या प्रदर्शनानंतर तें मी हिराबागेंतील पदार्थ—संग्रहालयास बक्षीस करीन; तेणेंकरून आपलें नांव सतत कायम राहील. आणि आपली इच्छा असल्यास मी आपल्या मागें श्राद्धें वगे आपल्या धर्माप्रमाणें करून मी आपलें नांव माझ्या ह-

यातींत संभाळीन.

हे शद्ब त्या म्हाताऱ्यानें ऐकून रामभाऊंच्या गळ्यांत त्यानें मिठी मारून रामभाऊंची पाठ आपल्या डोळ्यांतील उष्ण पाण्यानें भिजविली. रामभाऊंनाही यावेळीं पुत्ररहित बापाच्या मनाची स्थिति कशी होते याचें पूर्ण ज्ञान होऊन त्यांचें मन द्रवलें आणि त्यांच्या डोळ्यांस पाणी आलें. हा प्रकार चालला आहे तों सिंधूबाई तेथें आल्या; पण दुसरा पुरुष रामभाऊंच्या खोलींत असलेला पाहून त्या तशाच मागल्या पायीं मागें गेल्या. त्या आल्याचें या दोघांच्याही पाहण्यांत आलें नव्हतें. त्या आपल्या बिछान्यावर जाऊन बसल्या, पण विचार करीत होत्या कीं, हा इतका जिवलग कोण आला, लक्ष्मणभावजी तर खास नव्हत. हा अगदीं म्हातारासा वाटला. असो. सकाळीं समजेल म्हणून त्या पुन्हां आंथरुणावर पडल्या. झोंप लागली नाहीं. या दोघांची मिठी सुटली आणि म्हाताऱ्यानें ९,००० रुपयांच्या नऊ नोटा काढून रामचंद्ररावांचे हवालीं केल्या आणि म्हणाला. यांपैकीं १ हजार दे तुझ्या भावाला आणि एक हजार वहिणीला; बाकी ८ हजार रुपये तुमचे आहेत.

रा०—माझ्या बोलण्यावर भरंवसा ठेवून आपण न्याय करूं नये. लक्ष्मण आणि ताई भेटल्यावर आपण या रकमेचा निकाल करावा अशी आपल्यास माझी विनंति आहे. बोलून गोड पुष्कळ कठ असतात पण आपण गुणाची परीक्षा रक्कम देण्यापू-

वीं केली पाहिजे आहे; याकरितां या नोटा सध्यां आपल्याचपाशीं राहूं द्याव्या. मी आपल्या दोघां भावंडांस आपण मागाल त्या दिवशीं येथें किंवा आपल्या घरीं विठ्ठलवाडीस आणण्याची तजवीज करतों.

नवा०—छे, अरे तूं रामचंद्राचा प्रत्यक्ष अवतार आहेस. तूं जें बोललास तें सर्व मी तुझ्याच बोलण्यावरून खरें समजतों असें नाहीं; मी तुझ्या गुणांविषयीं फार लोकांकडून ऐकून घेतलेलें आहे. मी येथें येण्यापूर्वीं रानड्यांकडे गेलों होतों, मीं तेथें तुमची बरीच चर्चा ऐकिली. आहे. आतां मीं तुला पुत्रवत् मानून सर्व भरवंसा तुजवर ठेविला आहे. आतां तूं २,००० रुपये तुझ्या भावंडांस दिल्याचें जितकें मला लौकर कळेल तितकें बरें. मी आतां निरोप घेतों.

रा०—आतां तीन वाजले असतील, उजाडल्यावर आपण जाण्याचें करावें जर खरोखर रहाण्यास सवड नसेल तर.

नवा०—छे, छे, भलतेंच; स्वामीमहाराज उठण्यापूर्वीं मला अवश्य गेलेंच पाहिजे.

रा०—बरें तर मी आपल्यास पोंचविण्यास येतों.

नवा०—नको बाबा तुला झालें आहे जागरण, तूं आतां नीज; वाटेंत जरी थोडें जंगल लागतें तरी आजकाल कांहीं भय नाहीं. मी आत्तां जाऊन पोंहोचेन. त्यांत आतां चंद्रोदय झालाच आहे. वाट दिसण्यासही हरकत नाहीं; असें म्हणून म्हातारा उठून उभा राहिला. रामचंद्ररावांनीं त्याचे पायांवर मस्तक ठेवून नमस्कार केला. त्या म्हाताऱ्यानें रा-

मचंद्ररावांस नमस्कार न करितां त्यांचे पाठीवरून पुत्रभावाच्या प्रीतीनें हात फिरवला आणि डोळ्यांतील आसवें पुशीत त्यानें रामचंद्ररावांस " संभाळ हो' असें म्हटलें. रामचंद्ररावांनीं खालीं पडलेलें आपलें आवडतें पिस्तूल ४ काडतुसें व ६ टोप्या त्याजपुढें करून ही माझी आठवण आपल्याबरोबर असूंद्या. म्हणून त्यास त्या जिनसा घेण्यास आग्रह केला. म्हाताऱ्यानें त्या न घेण्याचें पुष्कळ प्रकारें सांगितलें; पण रामभाऊंनीं आग्रह धरला कीं, मीं पेंचवायास जर येऊं नये असें आपलें मत असेल तर हें माझें मित्र पिस्तूल तरी आपण बरोबर नेलें पाहिजे. उद्यां दिवसां याचें काम नीट निरखून पाहिल्यावर जरी परत पाठविलेत तरी चालेल. शिवाय आपल्या व आपल्या गुरूच्या दर्शनास मी लौकरच सहकुटुंब येईन तेंव्हां तें हवें तर परत आणीन.

तेंव्हां ती गोष्ट म्हाताऱ्यास मान्य होऊन तो त्या जिनसा घेऊन बाहेर पडला. शेंपन्नास पावलें रामभाऊंनीं त्यास पेंचवून ते परत आले. आणि आनंदानें उड्या मारीत ते आपल्या प्रियेकडे गेले. ती तर जागीच होती. तीस मोठ्या लाडानें आलिंगन देऊन व कडेवर घेऊन ते परत आपल्या खोलींत आले. प्रियेस नोटा दाखवून झालेलें वर्तमान सांगितलें. या गोष्टीचा चमत्कार तीं उभयतां बोलत आहेत तों बंदुकीचा आवाज त्यांच्या कानावर आला. तेंव्हां तीं दोघेंही चपापलीं आणि रामभाऊ म्हणाले म्हाताऱ्यावर तर कांहीं जोखीम नाहीं-

ना! इतक्यांत दुसरा आवाज त्यांच्या कानावर आला. त्या उभयतांनीं त्या आवाजावरून त्याची दिशा विठ्ठलवाडीचा रस्ता बरोबर ताडली.

रा०.—प्रिये आतां मी कसें करूं ? इकडे आड आणि इकडे विहीर असें मला झालें आहे. त्याच्या साहाय्यास जाणें जरूर आहे. आणि गेलों तर तुझ्या सोबतीस घरांत कोणी नाहीं.

अहाहा ! चतुर आणि शूर सिंधू ती; ती या प्रश्नाचें उत्तर काय बरें देते. ती म्हणाली माझी काळजी करण्याचा हा प्रसंग नव्हे. मी वस्तींत आहें. मजवर प्रसंग आल्यास शेंकडों मनुष्यें माझ्या साहाय्यास येतील. पण तो म्हातारा रानांत एकटा जर सांपडला असेल तर त्याच्या पुत्रवत् मानलेल्या मित्रानें यावेळीं त्यास साहाय्य न देणें लाजिरवाणें आहे. हे शब्द उच्चारतांना सिंधूबाई उभी नव्हती, तर ती घरांत धांवत जाऊन वाक्य पुरें करीत करीत एक धुणी वाळत घालण्याची लांब काठी घेऊन आली आणि ती रामचंद्ररावांच्या हातांत देऊन धांवा धांवा म्हणूं लागली, आणि रामभाऊंनींही अशी जोरानें धांव ठोकली कीं त्या मैलभर जाग्यावर ते १० मिनिटांचे आंत दाखल झाले. पहातात तों रस्त्यावर म्हाताऱ्याचें प्रेत पडलें असून पिस्तूल त्याच्या मुठींत आहे. पिस्तुलांत गज घालून पाहतां त्यांचे ध्यानांत आलें कीं, पिस्तुलांतील गोळी सुटलेली आहे. मग रामभाऊंनीं म्हाताऱ्याचें प्रेत खांद्यावर टाकून घराचा रस्ता धरला. पुरतीं पांच पावलें ते चालले नाहींत

तों पुढें कांहीं माणसें येत असल्याचें त्यांस भासून निरखून पाहिल्यावर ते पोलीसचे शिपायी असल्याची त्यांची खात्री झाली. त्यांनीं पोलीस येतात हें पाहून प्रेत जमिनीवर ठेवलें आणि ओरडले. खूनरे खून ! धांवा खुनी पकडा म्हणून पिस्तुलांत दुसरें काडतूस घालूं लागले. इतक्यांत पोलीस जवळ येऊन रामचंद्ररावांचा हात धरला.

रा०—खुनी कांहीं मला सांपडले नाहींत पण ते कोठें तरी आसपास असतील त्यांचा आधीं शोध करूं या, मग मला पकडा.

पो०—कोठें खुनी आहेत दाखीव.

रामचंद्ररावांची जरी शूरांत गणना करणें योग्य आहे तरी अशा प्रसंगीं ते शूर नसत. ते " इंग्रजी शूर " होते. वाचक मला प्रश्न करतील कीं इंग्रजी शूर, गुजराथी शूर, मराठी शूर असें शुरांचे सुद्धां का वर्ग तुम्ही करणार? त्यांस उत्तर—अलबत. मराठे, रजपूत, शीक, पठाण, वगैरे विशेष जाती लढाऊ शूर बंगाली हल्लींचे इंग्रजी शिकलेले दक्षिणी ब्राम्हण हे लेखणीचे व व्याख्यानें देण्यांत शूर. गुजराथी जेवणावळी व इतर धर्म कृत्यांत शूर. याप्रमाणें व्याख्यानें देणें व लिहिणें यांत आमचे रामचंद्रराव शूर होते खरे, पण जेव्हां पोलीस हातकडी घालूं लागले तेव्हां त्यांचा रावपणा जाऊन ते मांजर झाले. पोलिसांनीं तें प्रेत व त्याची जखम पाहिली आणि प्रेतास व पिस्तुलासहित रामभाऊंस ते पुण्यास फौजदारीमध्यें घेऊन गेले. त्येथें जें जें विचारायाचें तें तें त्यांस वि-

चारलें गेलें व यांस सांगावयाचें तें यांनीं सांगितलें.

पुढें पोलिसांस खवर पोंचली कीं, त्या मेलेल्या मनुष्यापाशीं .१०,००० रुपयांच्या नोटा असून तो रामचंद्ररावांचे घरीं त्या रात्रीं पुष्कळ वेळ जाऊन वसला होता. त्याप्रमाणें पोलिसांनीं रामभाऊंच्या कुटुंवास विचारतां ती गोष्ट खरी ठरली व रामभाऊंच्या घराचा झाडा झाला, तेव्हां त्या सर्व नोटा सांपडून त्या गृहस्थाच्या सह्याही नोटांवर त्यानें केलेल्या पोलिसांस दिसल्या. मग काय विचारतां ! पोलिसांनीं सर्व मुकदमा उत्तम तऱ्हेनें रामभाऊंवर शावीत होण्यासारखा वनावला. रामभाऊंवर खुनाचा खटला होऊन ते पोलिसांनीं कैद केल्याचें सिंधूस समजतांच ती पोलिसांच्या दुष्टपणाविषयीं संशयी होऊन शेजाऱ्यांच्या वायकांस त्या मुकदम्याचें स्वरूप सांगून रडूं लागली. पोलिसांनीं सिंधूस कांहीं प्रश्न केले, पण त्या प्रश्नांचीं उत्तरें त्यांस मुकदम्यास बळकटी आणण्यासारखीं नसून मुकदमा सुटण्यासारखीं दिसल्यामुळें तिच्या साक्षीची त्यांनीं पर्वा केली नाहीं. सिंधूच्या घरांत पुष्कळ शेजारणी व शेजारी पुरुष जमले होते, त्यांस पोलिसांनीं एकीकडे समजून सांगितलें कीं, ही मुलगी कदाचित् आपल्या जिवास कांहीं अपाय करून घेईल करतां सर्वत्रांनीं जपलें पाहिजे. त्याप्रमाणें तिच्या जवळ दोन चार वाया सतत वसल्या असत. सिंधूबाईस शेजारीणी वायांनीं वाढून आणलें पण तिचें जेवण्यास मन होईना. नवऱ्याचें काय होतें या काळजीनें ती अगदीं अशक्त झाली.

दुपारीं २ वाजतां एक गृहस्थ कोर्टांतून आला त्यानें मंडळींस सविस्तर मजकूर सांगितला तो येणेंप्रमाणें.

डाक्तरानें प्रेतांतील गोळी काढून ती. पोलिसांचे हवालीं करून हा मनुष्य गोळी लागून मेल्याचें सांगून प्रेतसंस्कारास हुकूम दिला होता. ती गोळी, रामचंद्ररावांच्या हातांतील पिस्तूल, पाठीवर त्या गृहस्थाच्या सह्या असलेल्या त्या नोटा, काडतुसें, बंदुकीच्या टोप्या इतक्या वस्तु टेबलावर पडल्या होत्या. साक्षीदार पोलिसचे चार शिपाई असून रामचंद्ररावांस वकील नव्हता.

न्यायाधीश—तुमचें नांव काय?

रा०—रामचंद्रराव, पण ज्या गृहस्थाला मारल्याचा आरोप मजवर आला आहे तो गृहस्थ माझा रावणराव नसून विभीषणराव आहे. ( हंशा )

न्यायाधीस—तुह्मी जातीचे कोण?

रा०—मी मनुष्य जातीपैकीं पुरुष वर्गांतला आहें ( हंशा )

पोलीस अंमलदार दरडावून ह्मणतो. ही जागा चावटपणा करण्याची नाहीं. कोर्ट विचारील त्यांचा योग्य जवाब द्या.

रा०—हो, तुह्मास अनुकूल असे जवाब मीं द्यावे आणि चोर सोडून संन्याशास सरकारानें फांशीं द्यावें एवढ्यासाठींच तुमची योजना आहे. पण एवढें पक्कें समजा कीं, मला एवीं तेवीं तुम्हीं मारण्याचा यत्न करीत आहां, मग मी आतां तुमच्या दरडावण्यास कां भिणार आहें? यावेळीं काय पाहिजे तें बोलण्यास

मला लायसन्स ( पट्टा ) आहे असें मी समजतों.

( हंशा ) तुम्ही मला सांगाल अमुक गृहस्थास मीं ठार मारला असें म्हण पण तसें मी कसें म्हणूं? शब्द-दोषाचेंहि मला भय वाटतें. असो. पोलिस हें सरकारचें हलकट खातें आहे. त्यांच्याशीं बोलण्यास ही जागा योग्य नाहीं. येथें जे जे लोक जमले आहेत त्यांतील बहुतेक संभावित व सदाचारी आहेत. याकरितां त्यांस व आपल्यास योग्य असें भाषण न्यायाधीशास उद्देशून बोलावें हा उत्तम पक्ष. ( सरकारतर्फे न्यायाधीश व इतर न्यायाधीश म्हणजे इतर लोक. प्रत्येक मनुष्यास न्यायान्यायाचा विचार आहे.) घरांतील बायकामुलेंहि अमुक गोष्ट बरी व अमुक गोष्ट वाईट असा न्याय करीत असतात. यासाठीं मी सर्वांसच न्यायाधीशाची पदवी देऊन चार गोष्टी बोलतों तिकडे सर्वांचें अवधान असावें.

कोर्टांतील एक कामगार—येथें भाकड कथा ऐकण्यास वेळ नाहीं. सवालायोग्य जबाब द्यावयास पाहिजे.

रा०—तुम्हीं जे मला हुकूम फर्मावितां याला असेल का सरकारची परवानगी? आणि मला पकडल्यापासून मी जर निरपराधी ठरलों तर माझ्या वेळाची किंमत सरकार देईल का? आणि मनुष्याच्या वेळाची नक्की किंमत कोणी करूं शकतें का? तुमच्या सारख्या विकलेल्या माणसांची ( नौकरांची ) किंमत काढतां येईल पण आम्हासारख्या स्वतंत्र मनुष्याची किंमत करणें मोठें धाडस आहे; त्याअर्थीं तुम्हीं

मला कोर्टाच्या वेळाबद्दल अगदीं बोलूं नये. ( हंशा )

न्या०—साक्षीदारांच्या जबान्या घेऊन जुरीचा अभिप्राय घ्यावा म्हणजे बस्स. कैद्याला बाहेर घेऊन जा.—

त्याप्रमाणें बिचाऱ्या रामभाऊंस बाहेर नेल्यावर पोलिसांचें पिकलें. त्यांनीं जसा मुकद्दमा रचविला होता तसा तो होऊन रामचंद्ररावांस फांशीची शिक्षा असावी असा जुरीचा ठराव झाला. रामचंद्ररावांचे मित्र व इतर मंडळी उठून गेली. पुणेंभर रामभाऊंच्या शिक्षेविषयीं चर्चा सुरू झाली. मित्र हळहळले, शत्रूंस आनंद व्हावयाचाच पण यांचे शत्रु फार कमी होते त्या अर्थीं पुष्कळ सख्या दुःखी झाली. ही बातमी सिंधूबाईपर्यंत आली. मग काय विचारतां. जन्मापासून पुष्कळ माणसें मेल्याचें सिंधूबाईनें ऐकलें व पाहिलें; पण हा दुःखाचा डोंगर अतिशयच मोठा. शेजारणी पाजारणी सिंधूबाईचे सभोंवार जमल्या, त्यांनीं नाना तऱ्हांनीं या बाईचें शांतवन करावें ; पण तें सर्व व्यर्थ. तो दिवस त्या बायकांच्या समजावणींत व सिंधूबाईचे आक्रोशांत गेला. रात्रीं शेजारणी जवळ बसून होत्या, इतक्यांत घराच्या मागची भिंत कोणी फोडीत असल्याचा आवाज त्या सर्व बायकांनीं ऐकिला. तेव्हां त्या अधिकच बावरल्या; पण सिंधूबाईचे जीवास थोडा धीर आला. त्यांस वाटलें रामचंद्रराव कोण्या हिकमतीनें सुटले असून जर मला भेटण्यास आले असतील तर दारांतील गर्दी पाहून ते मागून घरांत येण्याचा विचार करून भिंत फोडीत

असावे. नाहींतर चोर असतील. चोर असले तरी बरेंच. द्रव्य दाखविण्यासाठीं जेव्हां ते आपल्यास धमकी देतील तेव्हां दोन शब्द जरा कठिण बोललें तर ते आपला प्राण घेऊन या दुःखांतून मुक्त तरी करतील. हे दोन विचार तिच्या मनांत आल्यावर ती त्या बायांस म्हणाली मी जरा आंत जाऊन येतें तुम्ही येथें बसा. त्यावर एक बाई म्हणाली मी येऊं कां तुझ्या सोबतीला ?

**सिं०**—नका येऊं तुम्ही. आणि ती आंत अंधेर असतां एकदम गेली. बायकांचा घोळपा "उई मला बाई भय वाटतें"

दु०—काय पोर धीट ही !

**ति०**—धीट कसची धट्ट आहे. नवऱ्यावर प्रसंग काय! रडली लोकापवादाकरितां! घरांतलें कोणी चोरील म्हणून एकटी पुढें झाली. भिंतीवर कुदळीचे घाव पडतांना आम्हीं ऐकल्याबरोबर आमची तर बाई गाळण होऊन गेली.

**चौथी**—प्रसंग पडून पडून ती घटली आहे.

**पहिली**—काय बाई तुम्ही खोंचून बोलता ह्या ! ती तशी नव्हे हो.

**ति०**—आतां रामभाऊंवर आलेल्या प्रसंगामुळें ती वेडी किंवा विरक्त झालेली आहे. तिला आतां जिवाची का परवा आहे ?

सिंधूबाई ज्या आंत गेल्या तो तेथें अंधार होता म्हणून समईजवळील काड्यांची पेटी उचलून त्यांनीं तेथें दिवा लावला; तेव्हां घरांत कोणी दिसलें नाहीं.

मात्र एका मनुष्यापुरती भिंतींत वाट झाली होती. त्या भगदाडांतून कोणी तरी खचित आंत येईल म्हणून त्या तशाच उभ्या आहेत तों एक दांडगा मनुष्य आंत आला. त्याची दृष्टि सिंधूबाईकडे गेली नसावी किंवा त्यानें त्या बाईची पर्वा केली नसावी. तो आंत आल्यावर हूं म्हणतांच त्या भोंकावाटें एक पेटी बाहेरल्या माणसानें ढकलली ती आंतील माणसानें आंत ओढून भिंतीबरोबर लावून ठेवली; इतक्यांत दुसरी आंत आली तिचीहि त्यानें सदहूप्रमाणें व्यवस्था केली. अशा एकामागून एक चौदा पेट्या आंत आल्यावर एक पुरुष आंत आला; तरी सिंधूबाई डगमगल्या नाहींत. पण त्यांतील लक्षण त्यांस समजलें असावें म्हणून सर्व पेट्या येऊन बाहेरचा मनुष्य आंत येईपर्यंत त्या जशाच्या तशाच उभ्या होत्या. जो मनुष्य पेट्यांच्या मागून आंत आला त्यानें येतांच सिंधूबाईस लवून रामराम केला आणि म्हणाला, तुम्हावर जो प्रसंग आला आहे तो मला ठाऊक आहे. या तुमच्या चौदा पेट्या ज्या मीं नारायण सखारामाचे घरांतून ठाण्यास चोरल्या होत्या त्या ह्या. ( किल्या पुढें टाकून ) ह्या त्या पेट्यांच्या किल्या. आपलें सर्व सामानसुमान तपासून घ्या. रामचंद्ररावांविषयीं आपण तिलप्राय काळजी करूं नका. मी जोंपर्यंत जिवंत आहें तोंपर्यंत तुम्हास मनुष्यकृतीचें संकट भोगूं देणार नाहीं. सृष्टिक्षोभ झाला तर माझा नाइलाज आहे.

सिं०—फांशीची शिक्षा जुरीनें मंजूर केल्याचें

ऐकतें. ( डोळ्यांस पाणी )

**तात्या**---मातोश्री आपण दुःखी होऊं नये. फांसाच्या ठिकाणाहून सोडवून मी त्यांस व तुम्हांस अभयस्थलीं नेऊन ठेवीन, पण इंग्रजी न्याय कसकसा होतो त्याचा शेवट पाहिल्याशिवाय मध्यें गडबड करण्याचा माझा मानस नाहीं.

**सिं०**---मला आपण मातोश्री म्हणूं नये. मी आपली धर्मकन्या आहें असें आपण समजून माझी पाठ राखाल अशी आशा करून आहें.

**तात्या**---मातोश्री म्हटलें काय आणि ताई म्हटलें काय एकच. माझा प्राण आपण वांचविला म्हणून मीं आपल्यास मातोश्री म्हटलें तरी चालेल असें समजून मीं तशी हांक मारली; पण आपलें वय माझ्यापेक्षां कमी आहे. म्हणून मीं तसें म्हणूं नये असें आपण म्हणतां, तर मी आजपासून ताईसाहेब म्हणून बहिणीचें नातें समजेन.

**सिं०**---मला आपण वारंवार दर्शन दिल्यानें संतोष वाटेल; तर कृपा करून केव्हां केव्हां भेटत जा. माझ्या काळजीचें कोठें कोणी नाहीं. पण ईश्वरानें आपल्यासारखे न्यायी व पराक्रमी बंधू मला दिले तेणेंकरून मी आपल्यास कृतकृत्य समजतें.

**तात्या**---बरें मला आतां वेळ नाहीं. हें पाडलेलें भोंक मी बाहेरून बंद करतों. येथें चोरी कोणी चोर म्हणून करणार नाहीं. मला निरोप असावा.

**सिं०**--बरें तर. यावें.

तात्या बाहेर पडून गेला आणि सिंधूबाई पुढल्या

ओसरीवर आल्या. तेव्हां बराच वेळ लागल्या कारणानें बाहेरील स्त्रियांनीं सिंधूस पुष्कळ संशयाच्या गोष्टी विचारल्या, तरी सिंधूबाईच्यानें त्यांचें समाधान होण्यासारखें उत्तर देववलें नाहीं. पुढें कित्येक दिवस अशा स्थितींत गेले, तरी सिंधूस कांहीं विशेष दुःख नव्हतें; रामचंद्रराव मात्र संकटांत असतील तर त्यांचें समाधान करण्यास मुळींच मार्ग नाहीं; या विचारांनीं मात्र केव्हां केव्हां ती दुःखी होई. पण शेजारींपाजारीं नवें कवित्व होऊन तेथें तर या बाईच्या वर्तनाविषयींच्या संशयांचें भरतें पिकलें होतें. सिंधूच्या घरांत कोणी भिंत फोडून शिरला असतां ती त्याला भेटण्यास गेली. त्याच्याबरोबर ती पुष्कळ वेळ बोलत राहिली. त्याचें नांव सांगत नाहीं. त्या अर्थीं त्यांत कांहीं तरी काळेंबेरें जरूर असलें पाहिजे, असा चांगल्या संभावितांसही विश्वास आला, आणि तशा प्रकारच्या टीका सर्व शहरभर लोक करूं लागले. मुंबईस लक्ष्मणरावांच्याही कानीं ती बातमी गेल्याशिवाय राहिली नाहीं. लक्ष्मणरावांस तें वर्तमान समजतांच ते आपल्या घराचा कबजा घेऊन सिंधूस हांकून लावण्याकरितां पुण्यास गेले. ते आपल्या घरीं उतरले नाहींत. ते दुसऱ्या शेजारच्या घरीं उतरून तेथें खबर विचारली, तेव्हां लोक जें जें बोलतात तें तें त्या घरच्या माणसांनीं सर्व लक्ष्मणरावांस निवेदन केलें. तें ऐकल्यावर मग काय विचारतां ! ! ! अधींच स्वारी तापट. तशांत भावाभावांमध्यें आलेला द्विभाव, त्यावर सिंधूबाईविषयीं तिच्या मावशीनें

सांगितलेलीं गाऱ्हाणीं आणि रामचंद्ररावांवर असा प्रसंग आल्यावर सिंधूच्या वर्तनाचा संशय. तेव्हां लक्ष्मणराव आपल्या घरांत गेले. ते लक्ष्मणराव नव्हत तर प्रत्यक्ष अग्निनारायणानेंच त्या घरांत प्रवेश केला म्हणावयाचें !

आजकाल सिंधू विशेष दुःखी नसून तिची वर्तणूक वाईट असल्याचा संशय आल्यापासून शेजारणींनीं तें घर जणूं वर्ज्यच केलें होतें. सिंधू कांहीं कामधंदा करीत एकटी घरांत बसे.

ती ओटीवर पुस्तक वाचीत बसली असतां लक्ष्मणराव तिच्यापुढें जाऊन उभे राहिले. त्याबरोबर सिंधू पुस्तक मिटून उठून उभी राहिली.

ल०---वा, ग, तूं बया, मोठी लाजणारी, हो घराबाहेर.

सिं०---भावजी आलेत ते बसा तरी अंमळ! पाणी बा हावें का ?

ल०---( धिक्कारयुक्त शब्दांनीं ) जळो तुझें पाणी बा. तूं चांगलें नांव केलेंस. आतां पुरे. घरांतून बाहेर पड म्हणजे मला तुझें सगळें पोंचलें.

सिं०---भावजी पण असा तुम्ही मला विनाकारण जाच कां करतां ? मजकडून कांहीं अन्याय झाला असल्यास सांगावा. जेव्हां जेव्हां तुम्ही येतां तेव्हां तेव्हां कांहीं तरी वाग्बाण मजवर सोडल्याशिवाय रहात नाहीं; आणि त्यांतील अभिप्राय तर मला समजत नाहीं.

ल०---चिप् बाजारबसव्ये. लांब जीभ करूं

नको. तूं जे जे दिवे लावते आहेस ते ते सर्व आम्हांस कळतात. तुझ्यासारखी चांडाळीण या सृष्टींत एक तूंच असशील.

सिं०—पण मीं केलें तरी काय ?

ल०—गेल्याच्या गेल्या रविवारीं भिंत फोडून कोण ग घरांत भरला ? आणि तुजवर प्रसंग काय आणि तूं करतेस काय याचा कांहीं तुला विचार? दादावर प्रसंग आणण्यासही तूंच कारण असशील अशी आतां माझी खातरी झाली. तूंच त्याच्या हातीं त्या गरिबाचा खून केला असला पाहिजेस. माझ्यासारख्यास जर अधिकार असून मजपुढें त्या खुनाची चौकशी होती तर मीं आधीं तुला शिक्षा ठोठावली असती आणि मागून तुझ्या नवऱ्यास. सठव्ये तुझ्या लग्नाला पुरते चार महिने झाले नाहींत तों हे धिंडवडे. मग पुढें काय नवऱ्याचा संसार करणार होतीस तो दिसतोच आहे. झालें तें उत्तम झालें. आतां आमची पाठ सोड म्हणजे झालें.

सिं०—आपण मजवर रागावूं नका. मी आपल्यास सर्व वृत्तांत कळविणार आहें.

ल०—मला तुझा वृत्तांत ऐकण्याची जरूर नाहीं. मी घरास कुलूप लावून जाणार. तूं घरांतून बाहेर हो कशी.

सिं०—भावजी असें काय करतां ? मी सांगतें तें तर ऐका.

ल०—नाहीं, नाहीं, मी ऐकत नाहीं आणि तूं बोलूं नको. ( बुटाची ढुंगणावर ठोकर देऊन ) होनेस

कीं नाहीं चालती घरावाहेर. कीं ओढून घातली पाहिजे.

सिं०—भावजी मी वडील भावजय आहें आणि मला बुटाच्या लाथा मारतां ना ?

ल०—हो, हो, आणखी अश्शी गचांडी देतों. ( गचांडी देतो )

सिं०—मला वाटतें तुम्ही शुद्धीत नाहीं.

हे शब्द लक्ष्मणरावांनीं ऐकल्याबरोबर त्यांनीं सिंधूस दोन लाथा मारून दारावाहेर ढकलून दिली. ती बाहेच्या बाजूस दाराशीं उभी आहे इतक्यांत लक्ष्मणराव आंत जाऊन एक तपेली घेऊन आले आणि ती रस्त्यावर सिंधूबाईचे पुढें टाकून दिली, टाकतांना म्हणाले. कीं ही घे भीक मागण्यास तपेली; आणि आतां तुला दाही दिशा मोकळ्या आहेत. लक्ष्मणरावांनीं विचार केला कीं, अवदसा तर बाहेर पडलीच. आतां घरांतील सामानसुमान पाहून दारास कुलूप लावावें म्हणजे झालें ? म्हणून ते आंत घरांत गेले तेथें पहातात तों सुंदर खाशा सागवानी लांकडाच्या मजबूत १४ पेटचा ठेवल्या असून त्यांपैकीं एका पेटीवर एक किल्यांचा जुडगा पडला आहे. त्यांनीं तात्काल त्या किल्या घेऊन ते एकेक पेटी उघडूं लागले. त्यांतील ऐश्वर्य पाहून त्यांस संपत्तीचा तर लोभ झालाच, पण सिंधूच्या दुर्वर्तनाचा पुरावा झाल्याचें समाधान होऊन रागाची एक पायरी वाढली. ते मनांत म्हणाले या सठवीच्या नादीं कोणी मोठाच श्रीमान् गृहस्थ लागला आहे. थोडच्या दिव-

सांच्या सहवासानें त्यानें काय आपलें सर्वस्व लुटून दिलें कीं काय हें ? लग्नांत दागिने होते उसने आणि तेही चौघांच्या रीतीचे. आणि हे दागिने ( जर खरे असले तर ) आहेत राजेलोकांच्या बायकांचे. दिसण्यांत तर खरे दिसतात. उचलून पहातां वापरलेलेहि दिसले. मग खोटे कसे म्हणावे. पुढें पहातात तों नोटांचीं पुडकीं सोन्याच्या लडी व रोख रुपये आढळले. तें सर्व लक्ष्मणरावांनीं पाहून, घेण्यासारिखा नगद माल एकीकडे निवडून काढला. आणि तो उपरण्यांत बांधून ते बाहेर निघाले. पहातात तों सिंधूस जी बाहेर हांकून दिली होती ती पुन्हां आंत येऊन उभी राहिली आहे. तेव्हां ते तिला दरडावून विचारतात तूं आंत कोणाच्या हुकुमानें आलीस ?

त्यावर सिंधू कांहीं बोलली नाहीं. पुन्हां लक्ष्मणरावांनीं त्याच आवाजानें तोच प्रश्न केला तरी ती बोलेना. म्हणून ते रागानें पुढें जाऊन तिला लाथा मारून बाहेर घालवूं लागले. ती कांहीं बोलेना आणि जाग्यावरून हालेना. डोळ्यांत आलेलें पाणी मात्र वारंवार पुशीत होती. लक्ष्मणरावांच्या छड्यांचा व लाथांचा वर्षाव चालला आहे इतक्यांत दहा बारा सुशिक्षित मित्रांसहित रामचंद्रराव जे कैदेंत होते ते सुटून घरीं आले. घरांत शिरतांच सिंधूबाईनें नवऱ्याचे चरणीं मस्तक ठेवून ती एका बाजूस झाली.

लक्ष्मणरावांनीं नमस्कार केला नाहीं. पण सिंधूबाईपासून कांहीं अंतरावर उभे राहिले. तेव्हां रामभाऊ लक्ष्मणरावांस विचारतात—काय झालें रे लखू ? त्यावर

कोणीच कांहीं उत्तर दिलें नाहीं. तेव्हां मित्र मंडळी म्हणाली असेल कांहीं गृहकृत्याचें कुलंगडें; त्याचें काय? आपण सुटून आलां ही लाख रुपयांची गोष्ट झाली.

ल०—सुटून आल्याचें कसचें सुख? घरच्या दुःखापेक्षां माझे बंधू फांशीं गेले असते तर उत्तम होतें असें मी समजतों. (सिंधूकडे हात करून) या आवदसेनें घरांत शिरून आमचें वाटोळें केलें आहे, आणि पुढें करील. यावेळीं शेजारी पाजारी पुरुष, बायका, मुलें व शहरांतील दूरदूरचेही मित्र रामभाऊंस भेटण्यास येत होते त्यांनीं घर गच्च भरून गेलें होतें व रस्त्यावरही गर्दी झाली होती.

एक स्नेही—लक्ष्मणराव वेळ कोणती आणि आपण हें यावेळीं उपस्थित केलें काय याचा कांहीं विचार? आधीं मंडळी आली आहे यांचा समाचार घेणें, रामभाऊंची हकीकत विचारणें, तें दिलें सोडून, आणि बसले वाद घालीत नाहीं तो. अहो चुका या घरोघर होतातच आहेत, म्हणून कां कोणी भावजयीवर हात कां उचलतो. झाला असेल कांहीं अपराध. तशांत ती पोर आहे. आणि मोठी असली तरी तिचा नवरा असतांना आतां तुम्हास ती तिची कां काळजी? तो तुमचा राग जाऊंद्या. मंडळीस आज पेढे वांटले पाहिजेत. मंडळी गेल्यावर मग बसा त्रिवर्ग आपलीं गृहछिद्रें काढीत.

ल०—मी इतक्या मंडळी देखत आणि तिच्या नवऱ्या देखतही तिला बाहेर घालवून देतों. मला

कोणाचें भय नाहीं. म्हणून तिला गचांडी देऊन पुरुषांच्या दारांतील गर्दीवर ढकलून दिली.

रामचंद्ररावांस या रागाचें कारण वगैरे कांहीं माहीत नव्हतें. ते लक्ष्मणरावांस म्हणाले लखू हेंरे काय वेड्यासारखें ? स्त्रियांला बाहेर घालवून पुरुषांनीं रे काय घरांत राहून करायाचें ? सिंधू बाहेर गेली नव्हती; तिनें रामचंद्ररावाकडे दीन वदन करून पाहिलें तेव्हां ते म्हणाले काय झालें ?

सिं०—काय झालें तें मलाही अजून कळलें नाहीं.

रा०—पण लखूचें म्हणणें काय आहे ?

सिं०—१५ दिवसांपूर्वीं आमची आंतघराची भिंत फोडून आंत चोर घुसला होता. त्याच्या बरोबर मीं १०।१५ मिनिटें बोलत उभी राहिल्यें होत्यें. तेव्हां बाहेर शेजारणी होत्या, त्यांना माझ्या वर्तणुकीचा संशय आला असेल, व त्यावर पुढें कल्पित गोष्टी रचून जसा आपल्यावर खुनाचा गुन्हा शाबीत केला होता, तसा मजवर दुर्वर्तनाचा आळ ठेठावला असावा असें मीं भावजींच्या बोलण्यावरून ताडलें आहे.

रा०—बरें तुला त्या चोराशीं बोलत उभें रहाण्याची जरूर होती कीं काय ? आणि त्याची तुझी कांहीं ओळखदेख होती कीं कसें ?

सिं०—हो, त्याची माझी ओळख असून मला त्याच्याशीं बोलण्याचेंही अगत्य होतें.

रा०—त्याचें नांव गांव तुला माहीत आहे ? असेल तर सांग.

सिं०—माहीत आहे पण इतक्या लोकांत मी तें

सांगूं शकत नाहीं; आपल्यास जरुरच असेल तर मी तें नांव एकांतांत सांगेन.

ल०—घ्या आतां, हा नवऱ्याचा बोज!

रा०—असें काय करावें बरें वेडे, चोर ह्मणजे आपला संभावितांचा शत्रु. त्याचें नांव पुढें करून तो सांपडल्यास पोलिसाच्या स्वाधीन करावा आणि त्याला शिक्षा मिळाल्यास आपण आनंद मानावा.

ल०—दादा तूं काय तिच्या नादीं लागला आहेस; ती कांहीं कबूल करणार नाहीं. तिला तुह्मीं घालवून देणेंच रास्त आहे.

रा०—अरे, बाबा, न्याय महा सूक्ष्म आहे. घरोघर सर्व माणसें आपापल्या विचारांप्रमाणें प्रत्येक बाबतींत न्याय करीत असतात; पण बहुतेकांचे न्याय एकपक्षीय असतात. एखाद्या माणसानें दुसऱ्याची तिसऱ्यापाशीं निंदा केली तर तो तिसरा दुसऱ्यास एकदम वाईट समजतो अशी जनरूढी आहे. पण मार्मिक लोक निंदा ऐकतेवेळीं ती सर्व खोटी आहे असें समजून ऐकून घेतात, व प्रसंगीं दुसऱ्या पक्षाचा त्याच विषयांतील अभिप्राय ऐकून घेऊन मग त्या गोष्टीचा उलगडा करतात. तसें तुझें बोलणें मी खोटें समजून हिला प्रश्न करून त्यावरून मी काय तें सार निष्पन्न करीन. तिनें लग्नापूर्वीं माझी परीक्षा घेतली आहे व त्या परीक्षेंत मी पसार असल्यामुळें तिनें मला वरलें. ह्मणून ती बहुधा दुर्वर्तन माझ्या हयातींत करणार नाहीं अशी माझी खात्री आहे. पण न जाणों मनुष्य आहे कोणत्या वेळीं काय घडेल याचा नेम नाहीं.

( सिंधूस उद्देशून ) बरें तूं दुर्वर्तनी स्त्री नव्हेस असें मला व या मंडळीला खात्री होण्यासारखें तुझ्यानें कांहीं सांगवेल? जर तूं याच वेळीं आह्मां सर्वांची तुझ्या वर्तनाविषयीं खात्री करून देशील तर बरें होईल.

सिं०—माझ्या वर्तणुकीची खात्री पुढल्या माझ्या रहाणीवरून आपल्यास होण्याचा संभव आहे, पण सर्वांची खात्री मी करून देईन असें मजपाशीं कांहीं साधन आहे असें मला वाटत नाहीं.

रा०—मग जी गोष्ट लोकांना वाईट ह्मणून समजली आहे ती त्यांच्या मनांतून जावी कशी? तूं चतुर बायको आहेस हें मी पक्कें समजून आहें, व तुझा त्याग करणें हें मला मरणप्राय दुःखद होणार आहे; तरी निरुपायानें ती गोष्ट कदाचित् मला करावी लागेल. जी काय गोष्ट, लक्ष्मणाच्या म्हणण्याविरुद्ध तुला सांगणें असेल ती तूं या चौघांत सांगून आलेल्या आरोपांतून मोकळी हो.

यावर सिंधूबाई कांहीं बोलली नाहीं, पण तिला नवऱ्याला आपल्या विषयींचा संशय आल्याचें कळल्यावरून तिच्या नेत्रांतून अश्रू पटापट पडूं लागले. त्या अश्रूंनीं रामचंद्ररावांचें व इतर मंडळीचें हृदय द्रवलें; तरी लक्ष्मणरावांचा राग मुळींच कमी झाला नाहीं. त्यांनीं सिंधूबाईचे मुखांतून शब्द निघत नाहीं असें पाहून ते पुढें सरले.

ल०—( रामभाऊंस उद्देशून ) मी हिला आतां घरांतून घालवून देणार. तुम्हांस बायको पाहिजे असल्यास चला तिच्या मागून, मला तिची जरूर नाहीं

व तुमचीहि नाहीं. ( सिंधूस ) चल हो ग बाहेर.

**सिं०**—भावजी, मी नाहीं हो बाहेर होणार. आतां माझें दैवत येथें असतांना मला बाहेर जाण्याचा प्रसंग येणार नाहीं. रामभाऊंची मित्र मंडळी लक्ष्मणरावांची वारंवार समजूत करण्याचा यत्न करी, पण रामभाऊंनीं चालेलें आहे तें ठीक आहे अशा प्रकारची त्या मंडळीस खुण केल्यावरून सर्व प्रेक्षक मंडळी गप्चिप् राहून तमाशा पहात उभी होती.

लक्ष्मणराव सिंधूस हात धरून बाहेर ओढूं लागले तेव्हां सिंधू खालीं बसली आणि रागानें लक्ष्मणरावांस म्हणाली, भावजी तुम्हीं अधिकाराबाहेरची गोष्ट इतक्या समाजांत करूं नये. मी साफ बाहेर जात नाहीं. हे शब्द तिनें उच्चारल्यावर लक्ष्मणरावांच्या अंगाची आग होऊन त्यांनीं सिंधूच्या पाठीवर बुटाची ठोकर देऊन तिला उपडी पाडली. हें पाहून रामभाऊ लक्ष्मणरावांचा हात धरून त्यांस मागें ओढूं लागले व दुसरी मंडळीही सिंधूच्या व लक्ष्मणरावांच्या मध्यें आली. इतक्यांत गर्दींतून एक धष्टपुष्ट मनुष्य पुढें सरसावला आणि त्यानें मोठ्यानें टाळ्या वाजविल्या. त्याबरोबर त्याच गर्दींतून चार मनुष्य बाहेर आले. पैकीं एकानें गर्दी हटवून लक्ष्मणरावांस हात धरून आपल्या यजमानापुढें उभा केला. यजमान म्हणजे ज्याला आपण तात्या रामोशी म्हणत आलों तोच हा गृहस्थ. आणि दुसरे गृहस्थ हे त्याचे साथीदारच, किंवा नोकर होते.

**तात्या**—( लक्ष्मणरावांस ) तूं दुष्ट मनुष्य आहेस

म्हणून तुला या सृष्टींत पुष्कळ दिवस जगणें म्हणजे सृष्टीचें केवळ नुकसान आहे. तुझे अन्याय अगोदर तुझे पदरांत घालून मग तुला मी शिक्षा करणार आहे.

तूं सिंधूबाईवर जो आरोप आणला आहेस तो तूं स्वत: पाहिला नाहींस. त्या सर्व ऐकीव गोष्टी आहेत. त्यांतून जर त्या तुला खात्रीच्या मनुष्यानेंच सांगितल्या असल्या तरी त्यांचा खरेपणा किती आहे याचा शोध करायचा होतास. बरें सिंधूबाई कदाचित् दुर्वर्तनी ठरली तरी तिचा तुला कांहीं कोणी कधीं पालक किंवा अधिकारी नेमला नाहीं. त्या उपर तिचा पति येथें समक्ष असतां तूं तिला लाथा देत होतास ! बरें तिनें जें द्रव्य दुर्वर्तनानें मिळविलें अशी तू कल्पना करून पेटचा उघडतांना पुटपुटत होतास, तें दुर्वर्तनाचें द्रव्य हरण करणारा तूं आपल्याला सद्वर्तनी कां समजतोस? असें म्हणून त्यानें लक्ष्मणरावांच्या अंगावरचें उपरणें हिसकून तें सोडून आंतील माल सर्वांस दाखविला. आणि रामचंद्ररावांस उद्देशून तो म्हणाला, मागल्या रविवारीं मागील भिंतीस भोंक पाडून घरांत धरलेला जो चोर तो मी. तेव्हांपासून माझा या घरावर पहारा आहे. ज्या ज्या गोष्टी येथें घडल्या त्या सर्व मीं पाहिल्या आहेत. सिंधूच्या मावस वहिणीचा खून मीं केला. सदाशिवाबरोबर एका सावकारास मीं मारला. तो सावकार दुष्ट होता व सुंदरानें लग्न होण्यापूर्वीं ती पुन्हां दुसऱ्यास उपयोगीं न पडे अशी प्रीति सदाशिवावर केली होती त्या अर्थी तिचें जिणें तिला दुःखद झालें असतें म्हणून तिला मीं

मारली. मी अन्याय पहातों तेथें तुटून पडतों. वेश्या, जुगारी, अपहारी, अति कृपण अशा लोकांच्या घरीं मी चोऱ्या करतों. लोकांना छळणारे, रक्तपितीनें कुजलेले, अनीतीनें बिघडलेले अशा लोकांचे मीं पुष्कळ खून केले आहेत. आणि तसा तुझा खून करून मी मंडळीची रजा घेतों म्हणून त्यानें खिशांतून पिस्तूल बाहेर काढलें. मंडळी पुष्कळ होती; पण कोणाच्यानें त्याचा हात धरवला नाहीं. सर्व जन त्या वक्त्याकडे चित्रासारखे पहात होते, पण पिस्तूल काढल्यावर सिंधू गप्प राहिली नाहीं. तिनें उठून झट्दिशीं त्याच्या हातांतील पिस्तूल काढून घेतलें आणि म्हणाली दादा, मला माझे भावजी तुम्ही दान द्या!

तात्या—बरें आहे ताई एक गोष्ट मी तुझी मान्य करतों; पण त्याला कांहींना कांहीं शिक्षा केल्याशिवाय माझ्यानें रहावणार नाहीं. आपल्या नोकरांकडून लक्ष्मणरावांचे हात धरवून त्यांच्या पाठीवर बारा वेत मारले. आणि पुन्हां सिंधूस किंवा कोणत्याही निरपराधी माणसास न छळण्याबद्दल रामभाऊंस जामीन घेतलें.

आणि पांचही असामी त्या गर्दींत शिरून पार झाले. पण जातांना एक हातानें बाळबोध सुवाच्य अक्षरांनीं लिहिलेलें पुस्तक रामभाऊंचे हातांत दिलें. तें पुस्तक या तात्याचें चरित्र होतें. तें मोठें रसिक आहे, पण हा ग्रंथ बराच मोठा झाला असल्यामुळें तें पुस्तक यांत सामील करतां येत नाहीं. तो निराळाच ग्रंथ करतां येईल.

ही तात्याची मंडळी बाहेर पडून गेल्यावर सिंधू-बाईनें रामचंद्ररावांची व इतरांची आपल्या सुवर्तनाविषयीं खात्री होण्यासारखें भाषण केलें. तें ऐकून सर्वांचीं मनें शुद्ध झालीं व सिंधूबाईची जनांत वाहवा झाली. पुढें थोडा वेळ मंडळीची आपसांत थट्टा चालली.

**एक**—कांहो शामराव तुम्ही पोलिसांत नौकरी करतां ना ? आणि तुमच्यानें इतक्या समाजांत धा-दांत चोर येऊन, आपले अपराध कबूल करून एक अपराध नवा केला तरी तुम्ही स्वस्थच ! !

**शा०**—मी पडलों एकटा. तुम्हीं सर्वांनीं मिळून त्याला धरला असता तर नसतें कां चाललें ?

**सिं०**—अहो आम्हांत एकी नाहीं म्हणून भल-ताच येऊन तोंडांत मारून जातो. पण धन्य त्या सिंधूची, तिनें लक्ष्मणरावांचा प्राण तरी वांचविला. नाहीं तर येथें खून होता तरी कोणी पुढें सरतें ना ;

**चौथा**—हो खून करता ! त्याची काय बिशाद होती कीं इतक्या मंडळींत तो खून करता, मार चोपून काढला असता. मी जरा मागें होतों म्हणून ; नाहीं तर पाहिला असता त्याचा तमाशा.

**प०**—बिशाद राहिली खिशांत. लक्ष्मणरावांच्या पाठीचीं सालें निघालीं तरी यांची बिशाद अजून सुटतच नाहीं.

**रा०**—बरें असो झालें तें उत्तम झालें, त्यांत ल-क्ष्मणाला मार बसला एवढेंच काय तें वाईट.

**ए० शे०**—रामचंद्रराव सुटले कसे तो प्रकार ऐक-

ण्याची सर्वांची इच्छा असली पाहिजे. तेवढें ऐकून मग मंडळी आपापल्या धंद्यास जाण्यास मोकळी होई-ल. हें बोलणें पुष्कळांना मान्य झाल्यावर रामचंद्र-रावांनीं व्याख्यान रूपानें त्यांस पकडल्यापासूनचा वृत्तांत कळविला. त्यांतील सारांश असाः—मला पो-लीस घेऊन गेले तेव्हां मीं त्यांस खरा वृत्तांत सांगि-तला. पण तो ते खरा न मानून शेंकडो वेळां मला खरें बोलण्याचा आग्रह करीत. कोणी मला पुढें तुला हुद्याचें काम देऊं बक्षीस देऊं, वगैरे थापा मारून मृदु भाषणांनीं माझें मन वळवीत. कोणी धमक्या देत. बुक्या मारीत. कान धरून उठाबशा काढण्यास लावीत, तरी मीं तो खून केला असे शब्द माझ्यानें उच्चारवले नाहींत. ते मला मीं कोर्टांत काय काय बोलावें तें शिकवीत असत, पण मी तिकडे विशेष लक्ष देत नसें. त्यांनीं शिकविलेलें मीं म्हणून दाख-विण्यास प्रत्येक मनुष्य मला सांगे, पण मी सर्वांस एकच उत्तर देत असें. शिकविलेली सामग्री बाबा किती वेळ टिकेल ? मला वाटेल तें मीं बोलेन. सा-क्षिदारांना वाटेल तें ते बोलतील. त्याप्रमाणें मीं ‘ म-नःपूतं समाचरेत् ’ हवें तें बोलत असें; म्हणून माझी जवानी कायद्याप्रमाणें मिळाली नाहीं. पोलिसांतील लोक साक्षीदार मिळाल्यावर मग त्याच्या सारखाच खटला व्हावयाचा, व तसा तो झाला व ज्युरीचें मत फांशीं देण्याबद्दल पडलें. पुढें फांशीचें सांक्शन माग-विण्यास कागद हायकोर्टांत गेले तेथें अपराध्याचें म्हणणें काय आहे तें त्या कागदांवरून चांगलें सम-

जेना. साक्षिदार सर्व काय ते पोलिसचे शिपाई म्हणून हायकोर्टानें माझें पिस्तूल व प्रेताच्या अंग तून डाक्तरानें काढलेली गोळी व माझी साफ जबाब या तीन गोष्टी मागितल्या. पुण्याच्या कोर्टानें एक माझी जबाबी घेतली ती मीं योग्य रीतीनें दिली. त्यांत तो खून मीं केला नाहीं असा आशय होता. ती जबानी व वरील वस्तु हायकोर्टांत गेल्यावर हायकोर्टाच्या न्यायाधिशानें प्रेतांतून काढलेली गोळी माझ्या पिस्तुलांत घालण्याचा यत्न केला; पण पिस्तुलाच्या तोंडापेक्षां गोळी मोठी असल्यामुळें आंत जाईना तेव्हां तेथील दोघे न्यायाधीश व सर्व वकील हांसूं लागले. ते म्हणाले बिचारा कैदी विनाकारण मारला जात होता. त्यांनीं तावडतोब मला सोडून देण्याचा हुकूम केला. तो हुकूम पोंचतांच मी हा आज आपल्या मंडळींत येऊन मिसळलों.

हा भाषण समारंभ पुरतावल्या बरोबर टाळ्यांचा गजर होऊन गर्दी मोडूं लागली. थोड्या वेळानें रामचंद्ररावांचे दोन स्नेही, लक्ष्मणराव, सिंधूबाई व रामचंद्रराव एवढीं माणसें घरांत राहिलीं. त्यांचीं मग बोलणीं चालणीं खाणींपिणीं होऊन दौलतीचा हिशेब झाला. दहाहजार रुपयांच्या नोटा ज्या सरकारांत जप्त होत्या त्या जरी यांच्या हातीं आल्या नव्हत्या तरी जमेस घेतल्या. व हीं तीनही माणसें गुण्यागोविंदानें नांदूं लागलीं आहेत. आतां यांस सुख होवो एवढें चिंतून ग्रंथ पुरा करतों.